CMYK

सोलापूर
# तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा

छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर | शनिवार, दि. १४ फेब्रुवारी २०२६ | वर्ष – ३ रे | अंक ३०८ | पाने : ८ | किंमत रु. ६/– | dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# अत्याधुनिक सुविधांनी सज्ज असलेल्या 'सेवा तीर्थ'चे पंतप्रधानांच्या हस्ते उद्घाटन

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था:** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शुक्रवारी (१३ फेब्रुवारी) अत्याधुनिक सुविधांनी सज्ज असलेल्या सेवा तीर्थ संकुलाचे उद्घाटन केले. या संकुलामध्ये पंतप्रधान कार्यालयासह (पीएमओ) राष्ट्रीय सुरक्षा परिषद सचिवालय आणि कॅबिनेट सचिवालय देखील आहे. नवीन संकुलात सेवा तीर्थच्या फलकाचे मोदींनी आज अनावरण केले.

या संकुलाच्या भिंतीवर देवनागरी लिपीत नावे लिहिली असून त्याखाली 'नागरिक देवो भव' (नागरिक देवासारखे आहे) हे ब्रीदवाक्य कोरलेले आहे. पंतप्रधान कार्यालय रायसीना हिलवरील साउथ ब्लॉकमधून सेवा तीर्थ येथे हलवले जाईल, ज्यामुळे वेगवेगळ्या ठिकाणी असलेली कॅबिनेट सचिवालय आणि राष्ट्रीय सुरक्षा परिषद सचिवालयाची कार्यालये एकत्र येतील.

या इमारतींची रचना ४-स्टार ऋछखक- मानकांनुसार केली आहे आणि त्यात अक्षय ऊर्जा प्रणाली, जलसंवर्धन उपाय आणि डिजिटली एकात्मिक कार्यालये समाविष्ट आहेत. मोदींनी नवीन इमारतीचे उद्घाटन केले तेव्हा गृहनिर्माण आणि शहरी व्यवहार मंत्री मनोहर लाल, पंतप्रधान कार्यालयातील राज्यमंत्री जितेंद्र सिंह आणि पंतप्रधान कार्यालयातील अधिकारी उपस्थित होते.



२०१४ पासून, मोदी सरकारने भारताच्या वसाहतवादी भूतकाळातील प्रतीकांपासून दूर जाण्यासाठी आणि मानसिकतेत बदल घडवून आणण्यासाठी सातत्याने पावले उचलली आहेत, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. त्यांनी निदर्शनास आणून दिले की पंतप्रधान कार्यालयाला आता सेवा तीर्थ असे नाव देण्यात येईल, केंद्रीय सचिवालयाच्या इमारतींना कर्तव्य भवन असे नाव देण्यात आले आहे आणि राजपथाचे कर्तव्य पथ असे नाव देण्यात आले आहे. त्याच भावनेने, पंतप्रधानांचे अधिकृत निवासस्थान असलेल्या रेसकोर्स रोडचे नाव बदलून लोक कल्याण मार्ग आणि राजभवन आणि राज निवास यांचे नाव अनुक्रमे लोकभवन आणि लोकनिवास असे करण्यात आले आहे. दशकांपासून, सेंट्रल व्हिस्टा परिसरातील अनेक ठिकाणी पसरलेल्या तुटलेल्या आणि जुन्या पायाभूत सुविधांमधून अनेक प्रमुख सरकारी कार्यालये आणि मंत्रालये कार्यरत होती.


## ... तर मी राजीनामा देणार; मंत्रालयातील लाच प्रकरणाने खळबळ उडताच नरहरी झिरवळ यांचं मोठं वक्तव्य

नवी दिल्ली: लाचलुचपत प्रतिबंध विभागाने गुरुवारी मुंबईत केलेल्या कारवाईने राज्यात खळबळ उडाली आहे. कारण एसीबीच्या कारवाईत गुरुवारी संध्याकाळी सहाच्या सुमारास अन्न व औषध प्रशासन विभागाच्या क्लार्कला अटक करण्यात आली. राजेंद्र ढेरंगे असे या क्लार्कचे नाव असून ३५ हजार रुपयांची लाच स्वीकारताना त्याला पकडण्यात आलं. मंत्रालयात दुसऱ्या मजल्यावर ही कारवाई करण्यात आली. ज्या खात्यातील क्लार्कवर ही कारवाई करण्यात आली त्या अन्न व औषध प्रशासन विभागाचे मंत्री नरहरी झिरवळ हे या घटनेमुळे अडचणीत आले असून आज त्यांनी याप्रकरणी आपली बाजू मांडत लाच घेणाऱ्या क्लार्कवर योग्य ती कारवाई करण्यात येईल, असं म्हटलं आहे.तुमच्या मंत्र्यालयातील हा क्लार्क होता, तर ही जबाबदारी तुमच्यावरही येत नाही का? असा प्रश्न आज नवी दिल्ली इथं पत्रकारांकडून मंत्री नरहरी झिरवळ यांना विचारण्यात आला. त्यावर झिरवळ म्हणाले की, ही जबाबदारी आहेच, नाही म्हणून चालणार नाही. त्याने जे कृत्य केलंय, त्याला आम्ही पाठीशी घालणार नाही, हे मी खात्रीने तुम्हाला सांगतो. या प्रकरणाची चौकशी व्हावी. चौकशीत जर या लाच प्रकरणाची लिंक माझ्यापर्यंत जोडली गेली, तर मी मंत्रिपदाचा राजीनामा देईन, असं झिरवळ यांनी स्पष्ट केलं आहे.

# शेअर बाजारात मोठी घसरण, एका झटक्यात सात लाख कोटींचे नुकसान

**तभा वृत्तसेवा**

**मुंबई, दि. १३ फेब्रुवारी :** AI चे वाढते महत्त्व, अमेरिकेच्या शेअर बाजारांमध्ये झालेली घसरण आणि डॉलरच्या तुलनेत वाढत असलेले सोन्याचांदीचे महत्त्व यामुळे गुंतवणूकदारांमध्ये भीतीचे वातावरण आहे. अनेक बड्या कंपन्यांच्या शेअरमध्ये शुक्रवारी घसरण झाली. आयटी कंपन्यांचे शेअर आपटले. या घडामोडींचा एकत्रित परिणाम दिसून आला. मुंबईचा शेअर बाजार अर्था बीएसई आणि निफ्टी फिफ्टी अर्थात राष्ट्रीय शेअर बाजार या दोन्हीत घसरण झाली. बीएसई सेन्सेक्स ८२,७२६.७६ वर बंद झाला. घसरणीमुळे बीएसई सेन्सेक्स १०४८.१६ अंशांनी अर्थात सुमारे सव्वा टक्याची घसरण झाली.



निफ्टी ५० मध्ये बीएसई सेन्सेक्स प्रमाणेच घसरण झाली. दिवसअखेर निफ्टी ५० हा २५,४७१.१० वर बंद झाला. निफ्टी ५० मध्ये ३३६.१० अंशांनी अंशांनी अर्थात सुमारे १.३० टक्क्यांची घसरण झाली. बॅंक निफ्टी ५५३ अंशांनी घसरला. सुरुवातीला आयटी शेअरच्या दरांमध्ये घसरण झाली. हळू हळू इतर उद्योग क्षेत्रांतील शेअरमध्येही घसरण झाली. मोठ्या प्रमाणात शेअरची विक्री झाली.

बीएसईच्या टॉप ३० शेअर्सपैकी, बजाज फायनान्स आणि एसबीआय वगळता सर्व शेअर्स तोट्यात गेले आणि बंद झाले. सेन्सेक्समधील २८ शेअरना मोठा मोठा तोटा झाला. हिंदुस्तान युनिलिव्हर, इटरनल, टायटन, टाटा स्टील आणि टीसीएसमध्ये सर्वात जास्त घसरण झाली, जवळजवळ ५% घसरण झाली. आयटी व्यतिरिक्त, धातू, ग्राहक उत्पादने, रिअल इस्टेट, ऊर्जा, बॅंकिंग आणि वित्तीय सेवांनीही घसरणीला हातभार लावला. यावरून स्पष्ट होते की ही घसरण व्यापक होती.

'एआय'च्या प्रगतीमुळे आयटी कंपन्यांच्या अर्थकारणावर प्रतिकूल परिणाम होण्याची भीती तज्ज्ञ व्यक्त करत आहेत. आयटी क्षेत्राची तांत्रिक प्रगती होईल पण रोजगारांच्या संख्येवर प्रतिकूल परिणाम होईल अशी भीती व्यक्त होत आहे. यामुळेच आयटी कंपन्यांच्या शेअरमध्ये घसरण झाली आहे. गुरुवारी बीएसई मार्केट कॅप ४७२.४८ लाख कोटी होता, जो ६.८३ लाख कोटींनी घसरून ४६५.३१ लाख कोटींवर आला. एका अहवालानुसार, तीन दिवसांत अंदाजे ९० लाख कोटींचे नुकसान झाले आहे.

# मुंबईतील इंग्रजी माध्यमाची शाळा बंद करण्याचा निर्णय

## ६०० विद्यार्थ्यांचं भविष्य टांगणीला; पालकांची मनसेकडं धाव

**तभा वृत्तसेवा**

**मुंबई, दि. १३ फेब्रुवारी :** नव्या शैक्षणिक वर्षासाठी विद्यार्थ्यांच्या प्रवेश प्रक्रियेला शाळांमध्ये सुरुवात झाली असतानाच मुंबईतील जोगेश्र्वरमधील एका इंग्रजी माध्यमाच्या शाळेनं विद्यार्थ्यांना दाखले घेऊन जाण्याचे सांगितल्याने पालकांमध्ये खळबळ उडाली आहे. शहरातील जोगेश्र्वरी पश्र्चिम परिसरात सिटी इंटरनॅशनल शाळा अचानक बंद करण्याचा निर्णय घेण्यात आला. शाळा प्रशासनाकडून शाळा बंद करण्यासाठी शाळेत शिकणाऱ्या ६०० विद्यार्थ्यांच्या पालकांना नोटीस देण्यात आली आहे. मात्र, अचानक शाळा बंद करण्याच्या निर्णय घेतल्यामुळे शाळेत शिकणारे विद्यार्थ्यांचे पालकांमध्ये मुलांच्या भविष्याच्या काळजीने भीतीच्या वातावरण पसरले आहे. तर, मनसेनं याची दखल घेत शाळेत धाव घेतली.

जोगेश्र्वरी येथील सिटी इंटरनॅशनल स्कूल (शाळा) बंद करण्याच्या निर्णयावर पालकांनी काळजी बाळगून मनसे नेत्यांशी संपर्क साधला असता, मनसे नेते आक्रमक झाल्याचं दिसून आलं. मनसे वर्सोवा विधानसभा विभाग अध्यक्ष संदेश देसाईंकडून शाळा बंद होऊ देणार नाही, असा म्हणत शाळा प्रशासनाला इशारा देण्यात आला आहे. ओशिवरा परिसरातील ही शाळा, सिटी इंटरनॅशनल स्कूल नावाने मागील २५ वर्षापासून सुरू आहे, येथील शाळेत ६०० पेक्षा जास्त विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. मात्र, शाळा भाडे तत्त्वावर असल्यामुळे जागा मालकाकडून महिन्याचे भाडे ३५ लाख रुपयांच्या जागेवर आता ५० लाख रुपये भाडे आकारणी करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यामुळे, या भाडेवाढीला विरोध करत शाळा प्रशासनाने चक्क शाळाच बंद करण्याचा निर्णय घेतल्याने शाळेच्या भूमिकेवरही प्रश्र्न उपस्थित होत आहेत.

शाळा प्रशासनाला हे भाडं परवडत नसल्यामुळे शाळा प्रशासनाने शाळा बंद करण्याचे निर्णय घेतला आहे. मात्र, अचानक शाळा बंद करण्याचे निर्णय घेतल्यामुळे पालकांमध्ये मोठ्या प्रमाणात गोंधळाचे आणि भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. शाळा बंद करण्याची माहिती मिळतच मनसेकडून शाळा प्रशासनाला निवेदन देण्यात आले आहे. शाळा प्रशासनाकडून जर शाळा बंद करण्याची भूमिका ठाम राहिली आणि विद्यार्थ्यांचे शैक्षणिक वार्षिक नुकसान झालं तर शाळेविरोधात मनसे तीव्र आंदोलन करणार असल्याचा इशारा देण्यात आला आहे. मनसे वर्सोवा विधानसभा विभाग अध्यक्ष संदेश देसाई यांच्या शिष्टमंडळाकडून आज शाळा व्यवस्थापकांसोबत भेट घेऊन चर्चा करण्यात आली.

## सरकार्यवाह दत्तात्रेय होसबाळे यांच्या हस्ते 'श्रीगुरुजी' पुरस्कारांचे वितरण

**तभा वृत्तसेवा**

**पुणे, दि. १३ फेब्रुवारी :** राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरकार्यवाह दत्तात्रेय होसबाळे हे शनिवारपासून (ता. १४) पुणे आणि पिंपरी-चिंचवड शहराच्या दोन दिवसीय दौऱ्यावर येत आहेत. या दौऱ्यामध्ये विविध संघटनात्मक बैठकांसह त्यांच्या हस्ते पूजनीय 'श्रीगुरुजी पुरस्कार' प्रदान करण्याचा जाहीर कार्यक्रम शनिवारी सायंकाळी होणार आहे.

विमाननगर येथील सिंबायोसिस आंतरराष्ट्रीय विद्यापीठाच्या जुन्या परिसरातील (कॅम्पस) 'एसव्हीसी' सभागृहात सायंकाळी ६ वाजता हा पुरस्कार वितरण सोहळा पार पडेल. कृषी क्षेत्रातील उल्लेखनीय संशोधनासाठी पद्मश्री दादा लाड आणि समाजप्रबोधनासाठी महंत भारतभूषणदासजी महाराज यांना यंदाचा श्रीगुरुजी पुरस्कार देऊन गौरविण्यात येणार आहे. या कार्यक्रमात दत्तात्रेय होसबाळे यांचे प्रमुख व्याख्यान होणार असून, ज्येष्ठ उद्योजक अभय फिरोदिया हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. आपल्या दोन दिवसांच्या मुक्कामात होसबाळे हे विविध क्षेत्रांतील मान्यवरांच्या भेटी घेऊन चर्चा करणार असल्याचेही सांगण्यात आले.

# राज्यात उन्हाळ्याची चाहुल, पण सकाळी-रात्री गारवा कायम

**तभा वृत्तसेवा**

**मुंबई, दि. १३ फेब्रुवारी :** अजूनही तापमानात फारशी वाढ झाली नसली तरी वातावरणाला उन्हाळ्याची चाहूल लागली आहे. त्याचाच परिणाम म्हणून दुपारी काहीशी गर्मी जाणवत आहे. मात्र तरीही सकाळी आणि रात्री गारवा कायम आहे. मुख्य म्हणजे अजूनही आल्हाददायक वातावरणाची अनुभूती मिळत आहे.

**चार-पाच दिवसांत कमाल तापमानात वाढ**

बहुतांश जानेवारी महिन्यापर्यंत कमाल तापमान २७ ते २८ अंश, तर किमान तापमान १४ ते १५ अंशाच्या दरम्यान होते. मात्र फेब्रुवारी महिन्यात कमाल तापमान सुमारे ३० अंशाच्या घरात गेले, तर किमान तापमानही १५ अंशाच्या पुढे सरकले. त्याचवेळी मंगळवारी कमाल तापमान ३१.८, तर किमान तापमान १५.५ अंशांपर्यंत पोहोचल्याची नोंद चिकलठाणा वेधशाळेत झाली. साहजिकच मागच्या चार-पाच दिवसांत कमाल तापमानात पावणेदोन अंशांची वाढ झाल्याचे स्पष्ट झाले आहे.

अर्थात, किमान तापमानात वाढ झाली नसल्यानेच सकाळी व रात्री गारवा कायम आहे. त्यामुळे दुपारी काहीशी गर्मी जाणवत असून, उन्हाळी वातावरणाची चाहूल लागल्याचे जाणवत आहे. दुसरीकडे, घराघरांमधील पंखेही आता सुरू झाले आहेत. निदान दुपारी तरी पंखे वापरण्याची वेळ येत आहे. पुढच्या काही आठवड्यांमध्ये तापमानात आणखी काही वाढ होण्याची शक्यता व्यक्त केली जात असली तरी किमान या महिन्यात वातावरण आल्हाददायक राहील, असेही संकेत आहेत.

**सर्वाधिक तापमान कोणत्या जिल्ह्यांमध्ये?**

काल अमरावती जिल्ह्यात सर्वाधिक उष्ण तापमानाची नोंद झाली. कमाल तापमान ३५.६ अंश सेल्सियस इतकं नोंदवलं गेलं. त्यानंतर रत्नागिरीमध्ये सर्वात अधिक कमाल तापमान नोंदवलं गेलं असून, ३५.४ अंश सेल्सियस होतं. तसेच, सोलापूरमध्ये ३४.४ अंश सेल्सियस, तर ठाणे-बेलापूर परिसरात तापमान ३४ अंश सेल्सियस नोंदवलं गेलं.

पश्र्चिम महाराष्ट्रात कमाल तापामान ३०-३२ अंश सेल्सियस पर्यंत होतं. पुणे जिल्ह्यात ३१.९ अंश सेल्सियस, साताऱ्यामध्ये ३०.७ अंश सेल्सिय,, सांगली ३२.६ अंश सेल्सियस तर कोल्हापूर जिल्ह्यात ३१ अंश सेल्सियस कमाल तापमानाची नोंद झाली. मुंबईसह कोकण किनारपट्टीवर किमान तापमान १८-१९ अंश सेल्सियस असून कमाल तापमान २९.८ अंश सेल्सियस नोंदवलं गेलं.

# सोशल मीडियावर १६ वर्षाखालील मुलांना बंदी येणार?

## आयटी मंत्री रोहन खंवटे यांची मोठी घोषणा

पणजी/: मोबाईलचा अतिरेक वाढल्याने लहान मुलांच्या अभ्यासावर आणि आरोग्यावर विपरीत परिणाम होत असल्याच्या तक्रारी पालकांकडून सरकारकडे येत आहेत. या पार्श्र्वभूमीवर १६ वर्षांखालील मुलांच्या सोशल मीडिया वापरावर निर्बंध आणण्याचा विचार राज्य सरकार करत असल्याची माहिती माहिती व तंत्रज्ञान (आयटी) मंत्री रोहन खंवटे यांनी दिली.

केंद्र सरकारच्या संबंधित कायद्याच्या आधारे गोव्यातील विचारवंत, तज्ज्ञ, पालक, शिक्षक आणि शैक्षणिक संस्थांचे प्रमुख यांची व्यापक बैठक घेण्यात येणार आहे. या बैठकीत एक समिती स्थापन करून सोशल मीडियातील कोणते विभाग अल्पवयीन मुलांसाठी बंद करावेत, याबाबत चर्चा केली जाणार आहे. समितीचा अहवाल केंद्र सरकारकडे पाठविला जाईल किंवा आवश्यक असल्यास दिल्ली येथे माहिती तंत्रज्ञान



मंत्र्यांची भेट घेऊन सादर केला जाईल, असे खंवटे यांनी स्पष्ट केले.

सध्या मोबाईलचा वापर शिक्षणासाठीही होत असल्याने शैक्षणिकदृष्ट्या उपयुक्त असलेले विभाग सुरू ठेवून, विद्यार्थ्यांसाठी अनावश्यक असलेले मोबाईल गेम्स आणि इतर गैरगरजेचे घटक बंद करण्याचा विचार आहे. अनेक मुले अभ्यास आणि जेवणाकडे दुर्लक्ष करून दिवसरात्र मोबाईलवर वेळ घालवतात, रात्री उशिरापर्यंत जागरण करतात, परिणामी त्यांच्या आरोग्यावर परिणाम होत असल्याच्या तक्रारी आल्या आहेत. पालकांनी मोबाईल वापराबाबत विचारणा केल्यास काही मुले आक्रमक वर्तन करतात, असे प्रकारही समोर आल्याचे त्यांनी सांगितले. तज्ज्ञांच्या सल्ल्यानंतरच १६ वर्षांखालील मुलांच्या मोबाईल वापराबाबत अंतिम निर्णय घेतला जाईल, असे खंवटे यांनी शुक्रवारी नमूद केले.

**चर्चेनंतरच पर्यटन क्षेत्रातील बदल**

पर्यटन क्षेत्रातील कायद्यात बदल करण्याबाबत माध्यमांनी विचारलेल्या प्रश्र्नावर बोलताना पर्यटन मंत्री रोहन खंवटे म्हणाले की, कोणताही कायदा बदलण्यापूर्वी सखोल विचार आणि संबंधित घटकांशी चर्चा आवश्यक असते. सुचविलेल्या सुधारणा सर्व संबंधितांशी संवाद साधूनच अंतिम केल्या जातील, असे त्यांनी स्पष्ट केले.

## थोडक्यात...

### डिझेल गाड्या कायमच्या होणार बंद ?

**मुंबई:** भारतात प्रदूषण कमी करण्यासाठी केंद्र सरकार २०२७ पर्यंत १० लाखांहून अधिक लोकसंख्या असलेल्या शहरांमध्ये डिझेलवर चालणाऱ्या प्रवासी वाहनांवर बंदी घालण्याचा विचार करत आहे. पेट्रोलियम मंत्रालयाच्या समितीने या संदर्भात शिफारस केली आहे, ज्यामुळे डिझेल वाहनांचे उत्पादन आणि वापर टप्प्याटप्प्याने बंद होऊन इलेक्ट्रिक आणि सीएनजी वाहनांना चालना मिळण्याची शक्यता आहे. भारताने २०७० पर्यंत 'शुद्ध-शून्य उत्सर्जन' लक्ष्य गाठायचे असेल, तर वाहतूक क्षेत्रात आमूलाग्र बदल अपरिहार्य असल्याचे नीती आयोगच्या ताज्या अहवालात स्पष्ट करण्यात आले आहे. डिझेल वाहनांना टप्प्याटप्प्याने हटवून सीएनजी, हायब्रिड आणि इलेक्ट्रिक वाहनांचा वेगाने स्वीकार करणे ही पहिली आणि महत्त्वाची पायरी ठरेल, असे आयोगाने नमूद केले आहे.

### अंधश्रद्धेने घेतला आईचा बळी

**बंगळुरू :** कर्नाटकातील तुमकूर जिल्ह्यात अंधश्रद्धमधून एक भयावह घटना घडली आहे. आपल्या वडिलांच्या निधनाला आईचं जबाबदार आहे आणि तिने करणी ( 'ब्लॅक मॅजिक') केली होती. या संशयावरून मुलीने आईची निर्घृण हत्या केली आहे. पुष्पावती असे मृत महिलेचे नाव असून, तिच्या ३३ वर्षीय सुचित्रा नावाच्या मुलीला पोलिसांनी अटक केली आहे.

### रोझ डे सेलिब्रेशन महागात

**मुंगेर :** बिहारमधील मुंगेर जिल्ह्यात 'रोझ डे'चे सेलिब्रेशन एका दाम्पत्याला चांगलेच महागात पडले आहे. दारूबंदी असलेल्या राज्यात मद्याचे प्रदर्शन करणे आणि समाज माध्यमात शस्त्रासोबत फोटो टाकणे, या कृत्यांमुळे पोलिसांनी या दाम्पत्यावर कारवाईचा बडगा उगारला आहे.मुंगेर जिल्ह्यातील कांचन देवी नावाच्या महिलेने 'रोझ डे'चे सेलिब्रेशन करतानाचे काही व्हिडीओ आणि फोटो इंस्टाग्रामवर पोस्ट केले होते. या व्हिडिओंमध्ये ती आपल्या पतीला गुलाबाचे फूल देऊन दारू देताना दिसत आहे. पण, या रीलच्या नादात तिने कायद्याचे उल्लंघन केल्याने आता तिला पोलीस कोठडीची हवा खावी लागण्याची शक्यता आहे.

### सरला माहेश्वरी यांचे निधन

**नवी दिल्ली :** दूरदर्शनच्या प्रसिद्ध वृत्तनिवेदिका सरला माहेश्र्वरी यांचे वयाच्या ७१व्या वर्षी निधन झाले. माहेश्र्वरी यांचे शांत भाषण, अचूक उच्चार आणि प्रभावी पडद्यावर उपस्थितीमुळे त्यांना प्रेक्षकांमध्ये एक विशेष स्थान मिळाले. जवळजवळ तीन दशके त्या भारतीय बातम्यांमध्ये एक आदरणीय व्यक्ती होत्या. त्यांच्या मृदू आवाजाने आणि मनमोहक सादरीकरणाने त्यांना प्रेक्षकांच्या हृदयात एक विशेष स्थान मिळवून दिले.सरला माहेश्र्वरी यांच्या निधनाची माहिती दूरदर्शनच्या एक्स हॅंडलवरून दिली.

### अंबरनाथच्या वाहतुकीत बदल

**अंबरनाथ :** महाशिवरात्री उत्सवानिमित्त अंबरनाथमधील प्राचीन अंबरेश्र्वर शिवमंदिर परिसरात मोठ्या प्रमाणावर भाविकांची गर्दी होत असते. त्यामुळे प्रचंड मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होत असते. याच पार्श्र्वभूमीवर आता १४ ते १६ फेब्रुवारीदरम्यान शहरातील वाहतुकीत काही तात्पुरते बदल करण्यात आले आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, काही मुख्य मार्गांवर वाहनांना प्रवेशबंदी लागू असेल. वैभव हॉटेलकडून शहरात थेट प्रवेश बंद राहील. संबंधित वाहनांना हिंदू स्मशानभूमी, वडवली सेक्शन आणि छत्रपती शिवाजी महाराज चौकमार्गे वळवण्यात येईल. स्वामी समर्थ चौकातून गोविंद तीर्थ पुलाकडे जाणाऱ्या वाहनांनाही 'नो एन्ट्री' असेल.

### फूड स्टॉल्सची तोडफोड

**पुणे:** पुण्यातील कोथरुड येथील एमआयटी महाविद्यालयात आयोजित वर्ल्ड कल्चरल फेस्टिवलमध्ये मोठा राडा झाला आहे. फूड फेस्टिवलमध्ये बांगलादेशी विद्यार्थ्यांनी लावलेल्या झेंड्यांच्या स्टिकर्सवरून वाद निर्माण झाला आहे. ज्याचे रूपांतर नंतर तोडफोडीत झाले. या घटनेमुळे कॅम्पसमध्ये काही वेळ तणावाचे वातावरण होते. अखिल भारतीय युवा मोर्चाच्या कार्यकर्त्यांनी हा राडा केल्याचं समजत आहे. या घटनेनंतर फेस्टिवलच्या ठिकाणी एकच गोंधळाचं वातावरण निर्माण झालं होतं.

### हवामान बदलाचे संकेत

**मुंबई :** फेब्रुवारीच्या पहिल्या आठवड्यात कोरडे वातावरण राहिल्यानंतर आता राज्यात हवामानाची घडी बदलताना दिसत आहे. उत्तर भारतात सक्रिय झालेल्या वातावरणाचा परिणाम महाराष्ट्रावरही जाणवू लागणार असून येत्या १७ आणि १८ फेब्रुवारीदरम्यान काही भागांत हलक्या स्वरूपाचा पाऊस होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. हवामान तज्ज्ञांच्या मते, समुद्राकडून येणाऱ्या ओलसर वाऱ्यांचा आणि जमिनीवरील तापमानातील फरकाचा परिणाम म्हणून कमी दाबाची रेषा तयार होत आहे.



लातूर
# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## जिल्हा युवा पुरस्कारासाठी अर्ज करण्यास २५ फेब्रुवारी पर्यंत मुदतवाढ

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १३ फेब्रुवारी : : लातूर/प्रतिनिधी:** राज्याचे युवा धोरण २०१२ अंतर्गत शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या वतीने जिल्हास्तरीय जिल्हा युवा पुरस्कार दरवर्षी प्रदान केले जातात. या पुरस्काराद्वारे जिल्ह्यात कार्यरत असलेल्या युवक-युवती तसेच नोंदणीकृत संस्थांनी केलेल्या समाजहिताच्या उल्लेखनीय कार्याचा गौरव केला जातो आणि युवा विकासाच्या क्षेत्रात अधिक कार्य करण्यासाठी प्रोत्साहन दिले जाते. लातूर जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयामार्फत २०२४-२५ च्या पुरस्कारासाठी २५ फेब्रुवारी २०२६ पर्यंत अर्ज करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

या पुरस्काराचे स्वरूप गौरवपत्र, सन्मानचिन्ह व रोख रक्कम १० हजार रुपये असे आहे, तर नोंदणीकृत संस्थेसाठी गौरवपत्र, सन्मानचिन्ह व रोख रक्कम ५० हजार रुपये इतके आहे. या पुरस्कारासाठी जिल्ह्यातील पात्र युवक, युवती आणि संस्थांकडून अर्ज मागविण्यात आले होते. मात्र, अपेक्षित प्रमाणात प्रतिसाद न मिळाल्याने जिल्हाधिकारी यांच्या निर्देशानुसार अर्ज सादर करण्याची संधी पुन्हा देण्यात येत आहे. जिल्हा युवा पुरस्कार २०२४-२५ साठी अर्ज सादर करण्याची अंतिम मुदत २५ फेब्रुवारी २०२६ पर्यंत आहे. इच्छुक युवक-युवती तसेच नोंदणीकृत संस्थांनी जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, लातूर येथून अर्ज प्राप्त करून घ्यावेत. अर्जासंबंधित अधिक माहितीसाठी बाबासाहेब इंगोले, क्रीडाधिकारी यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी महादेव कसगावडे यांनी केले आहे.



## विविध वृत्त...

### शिवजयंतीनिमित्त शिवजन्मोत्सव, जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते पाळणा

**लातूर :** प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी छत्रपती शिवाजी महाराज सार्वजनिक शिवजन्मोत्सव समितीच्या वतीने शिवजयंती विविध लोकोपयोगी कार्यक्रमाने साजरी होणार असून त्याची सुरुवात आज शनिवार दि. १४ फेब्रुवारी रोजी भव्य रक्तदान शिबीराने होणार आहे.

राजर्षी शाहू महाविद्यालय राष्ट्रीय सेवा योजना व सार्वजनिक शिवजन्मोत्सव समिती यांच्या वतीने चंद्रनगर परिसरात असलेल्या राजर्षी शाहू महाविद्यालयात हे शिबीर सक ाळी ९ वाजता सुरू होणार आ-हे. रविवार दि. १५ फेब्रुवारी रोजी विविध गटांत बुध्दीबळ स्पर्धा घेण्यात येणार आहेत. विजेत्यांना रोख बक्षीस, प्रशस्तीपत्र व स्मृतीचिन्हाने गौरविण्यात येणार आहे. स्पर्धेसाठी प्रवेश मोफत आहे. अष्टविनायक मंदिराशेजारी असलेल्या आर. एन. मोटेगावकर विद्यालयात या स्पर्धांना सकाळी १० वाजेपासून सुरुवात होईल. शिवजयंतीदिनी १९ फेब्रुवारी रोजी पाळणा महोत्सव साजरा होईल. जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर घुगे यांच्या हस्ते व विविध महिला अधिकारी यांच्या उपस्थितीत रात्री १२ वाजता आज रक्तदान, उद्या बुद्धिबळ स्पर्धा, जयंतीदिनी पाळणा बाळ शिवबांचा पाळणा जोजावला जाईल. तत्पूर्वी छत्रपती शिवरायांची थोरवी सांगणारा 'आम्ही जिजाऊंच्या लेकी' हा विशेष कार्यक्रम महिला शाहीर सादर करतील. यावेळी हजारोंच्या संख्येत महिला, विद्यार्थीनी व शिवप्रेमींची उपस्थिती राहील. रात्री १२ वाजता शिवरायांच्या जयजयकार करीत पेढे वाटून यावर्षीच्या जन्मोत्सवाची सांगता होईल. या सर्व कार्यक्रमांची जय्यत तयारी झाली असल्याचे समितीच्या वतीने सांगण्यात आले.

### जिल्हास्तरीय युवा पुरस्कारासाठी अर्ज करण्यास मुदतवाढ

**लातूर :** राज्याच्या युवा धोरण २०१२ अंतर्गत शालेय शिक्षण व क्रीडा विभागाने जिल्हास्तरीय जिल्हा युवा पुरस्कार दरवर्षी दिले जातात. या पुरस्काराद्वारे जिल्ह्यात कार्यरत असलेल्या युवक-युवती तसेच नोंदणीकृत संस्थांनी केलेल्या समाजहिताच्या उल्लेखनीय कार्याचा गौरव केला जातो आणि युवा विकासाच्या क्षेत्रात अधिक कार्य करण्यसाठी प्रोत्साहन दिले जाते. लातूर जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाद्वारे २०२४-२५ च्या पुरस्कारासाठी २५ फेब्रुवारी २०२६ पर्यंत अर्ज करण्याचे आवाहन केले आहे. पुरस्काराचे स्वरूप गौरवपत्र, सन्मानचिन्ह व रोख रक्कम १० हजार रूपये असे आहे. नोंदणीकृत संस्थेस गौरवपत्र, सन्मानचिन्ह व रोख रक्कम ५० हजार रूपये इतके आहे. पुरस्कारासाठी जिल्ह्यातील पात्र युवक, युवती आणि संस्थांकडून अर्ज मागविण्यात आले होते. मात्र अपेक्षित प्रतिसाद न मिळाल्याने जिल्हाधिकाऱ्यांच्या निर्देशानुसार अर्ज सादर करण्याची संधी पुन्हा देण्यात येत आहे. जिल्हा युवा पुरस्कारासाठी अर्ज सादर करण्याची अंतिम मुदत २५ फेब्रुवारी २०२६ पर्यंत वाढवली आहे. इच्छुक युवक, युवती तसेच नोंदणीकृत संस्थांनी जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयातून अर्ज प्राप्त करून घ्यावेत. अर्जासंबंधी अधिक माहिती हवी असल्यास क्रीडाधिकाऱ्यांची संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाद्वारे केले आहे.

### नूतन महापौरांनी घेतला मनपाच्या कामकाजाचा आढावा, सिद्धेश्वर यात्रा व शिवजयंतीच्या अनुषंगाने सूचना

**लातूर :** लातूरच्या नवनिर्माचित महापौर श्रीमती जयश्री सोनकांबळे व उपमहापौर स्नेहल उटगे यांनी गुरुवारी (दि.१२) मनपातील अधिकार्यांकडून कामकाजाचा आढावा घेतला. रविवारपासून सुरू होणारी ग्रामदैवत श्री सिद्धेश्वर यात्रा व शिवजयंतीच्या अनुषंगाने त्यांनी विविध सूचनाही केल्या.

महापौर श्रीमती जयश्री सोनकांबळे, मनपा आयुक्त श्रीमती मानसी व उपमहापौर स्नेहल उटगे यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीत प्रारंभिक अधिकाऱ्यांचा व विभाग प्रमुखांचा परिचय करून देण्यात आला.नूतन महापौर व उपमहापौरांनी मनपाचे कामकाज समजून घेतले. पाणीपुरवठा, पथदिवे, अग्निशमन,आरोग्य तसेच सर्व विभागांची माहिती त्यांनी अधिकाऱ्यांकडून घेतली.

महाशिवरात्री निमित्त रविवार दि.१५ फेब्रुवारी पासून ग्रामदैवत श्री सिद्धेश्वर यात्रेला सुरुवात होत आहे.या यात्रेच्या अनुषंगाने मनपाच्या वतीने केल्या जाणाऱ्या तयारीचा आढावाही महापौरांनी घेतला. यात्रेत मनपाच्या वतीने पाण्याचे टँकर भरून दिले जाते. त्याबाबत माहिती घेतली. यात्रा परिसर व यात्रा मार्गावरील रस्त्यांची दुरुस्ती, पथदिव्यांची दुरुस्ती याबाबतही त्यांनी सूचना केल्या. यात्रा परिसरात गरज पडली तर अग्निशमन दल सेवा तत्पर असावी, असेही महापौरांनी सांगितले. यात्रेच्या अनुषंगाने जे-जे करणे आवश्यक आहे त्या सर्व बाबी प्राधान्याने कराव्यात,असे त्या म्हणाल्या.

दि. १९ फेब्रुवारी रोजी शिवजयंती उत्सव साजरा केला जाणार आहे. त्यानिमित्त छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा व परिसराची स्वच्छता, आवश्यक तेथे डागडुजी व सुशोभीकरण करण्याच्या सूचना त्यांनी केल्या.

या बैठकीस गट नेते विजयकुमार साबदे,नगर सेवक धोंडिराम यादव, सचिन गायकवाड,अतिरिक्त आयुक्त देविदास जाधव,उपायुक्त वसुधा फड, मुख्य लेखाधिकारी रावसाहेब कोलगणे यांच्यासह सर्व विभाग प्रमुख उपस्थित होते.

## पंचपरिवर्तनाच्या माध्यमातून वैभवशाली समाज घडवायचा आहे : प्राचार्य पांडे

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १३ फेब्रुवारी :** आजघडीला कुटुंबाची अवस्था 'अस्वस्थ मन आणि उध्वस्त अंगण ' अशी झाली आहे. कर्तव्याचे पालन करणारी कुटुंब व्यवस्था खूप महत्वाची आहे. त्याकरिता कुटुंब प्रबोधनही महत्वाचे असून पंचपरिवर्तनाच्या माध्यमातून वैभवशाली समाज घडवणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन परभणीच्या मराठवाडा कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य अनंतराव पांडे यांनी केले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे व नवनिर्माण प्रतिष्ठान, लातूरच्या संयुक्त विद्यमाने लातुरात आयोजित करण्यात आलेल्या नवनिर्माण व्याख्यानमाला - २०२६ चे द्वितीय पुष्प गुरुवारी सायंकाळी प्राचार्य पांडे यांनी ' पंचपरिवर्तनातून सामर्थ्यशाली समाज व वैभवशाली राष्ट्रनिर्मिती ' या विषयावर गुंफले. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून अष्टांग योग केंद्राचे संचालक योगाचार्य दिलीपराव भातलवंडे उपस्थित होते. मंचावर नवनिर्माण प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्रवीण सरदेशमुख, कार्यवाह अशोक शिवणे, उमेश कुलकर्णी आदी मान्यवरांची उपस्थिती होती. बदलत्या काळात मोबाईल ही अत्यावश्यक वस्तू बनली असली तरी किमान काही काळासाठी तरी प्रत्येकाने आपल्यापासून मोबाईल दूर ठेवण्याचा प्रयत्न करावा. किमान रात्रीचे जेवण कुटुंबातील सर्व सदस्यांनी एकत्रित मिळून करावे. आजमितीस घरातही मोबाईल पार्किंग स्टेशन असणे आवश्यक आहे. म्हणजे जेवताना सगळ्यांचे फोन तेथे ठेवता येईल. कुटुंब प्रबोधनासाठी हे अतिशय आवश्यक असल्याचे प्राचार्य अनंतराव पांडे यांनी सांगितले.

आपल्या व्याख्यानात प्राचार्य पांडे यांनी पंचपरिवर्तनाच्या माध्यमातून विचारांचे जागरण केले जाणार आहे. निसर्गाचे बिघडलेले चक्र पर्यावरण संवर्धन करून व्यवस्थित करायचे आहे. विषयुक्त अन्न निर्माण न करता, विषमुक्त अन्न निर्माण करायचे आहे.गुणी समाज निर्माण करण्यासाठी स्वबोध स्पष्ट असावा यात स्वभाषा, स्वभोजन, स्वभवन, स्वगृह, स्वभ्रमण हे स्वदेशी विचाराच्या माध्यमातून करायचे आहे.संतांनी शिकवलेली सामाजिक समरसता आपल्या विचारातून, प्रत्यक्ष कृतीत उतरवायची आहे.पंचपरिवर्तनाच्या माध्यमातून चरित्र, चारित्र्य निर्माण करून बलशाली, वैभवशाली राष्ट्र घडवण्याचे स्वप्न पूर्ण करायचे आहे,अशा अनेक महत्वपूर्ण बाबी विशद केल्या. सद्यस्थितीत जगातले १८ टक्के लोक कोणत्या ना कोणत्या कर्करोगाने बाधित झालेले पाहायला मिळतात. हा प्रकार विषयुक्त अन्न आणि पर्यावरणाच्या वैश्रिवक समस्येमुळे घडतो. वैश्रिवक समस्येचे निराकरणही पंचसूत्रीच्या माध्यमातून करणे शक्य होते. निसर्गाचा समतोलही साधने महत्वाचे आहे. त्यासाठी प्लास्टिकचा वापर कटाक्षाने टाळण्याचा प्रयत्न प्रत्येक जागरूक व्यक्तीने केलाच पाहिजे. पर्यावरणाचा समतोल साधण्यासाठी सेंद्रिय शेतीचा पर्याय सर्वोत्तम ठरू शकतो. शेतीच्या मातीचा पोत सुधारण्यासाठी देशी गाय पाळणे गरजेचे आहे. तसेच प्रत्येकाच्या घरात एकतरी देशी वृक्ष असावा, पाण्याच्या पुनर्वापराची जनजागरण मोहीम राबवणे आवश्यक असल्याचे प्राचार्य पांडे यांनी स्पष्ट केले.




आपले भारतीय आयुर्वेद शास्त्र अतिशय प्राचीन आहे. भारतात साडेसातशे वर्षांपूर्वी बायपास सर्जरी सुविधा असल्याचा उल्लेख चरकसंहितेत आढळून येतो. जगाला प्रगतीपथावर नेणारी विमान संकल्पनाही भारताचीच आहे. आजच्या स्थितीत समाजाच्या भरकटलेल्या जहाजाचे होकायंत्रही भारतमाता असल्याचे पांडे यांनी सांगितले.

प्रमुख अतिथी म्हणून आपले विचार व्यक्त करताना योगाचार्य भातलवंडे यांनी नवनिर्माण प्रतिष्ठानचे कार्य आजच्या स्थितीत अतिशय मौलिक आणि राष्ट्रनिर्मितीच्या कार्यात महत्वपूर्ण योगदान देणारे असल्याचे सांगितले. यासाठी नवनिर्माण प्रतिष्ठानचे सर्व पदाधिकारी अभिनंदनास पात्र असल्याचे सांगून त्यांनी सर्व पदाधिकाऱ्यांना मंचावर पाचारण करून त्यांचा सन्मान केला. संतोष बीडकर यांनी वैयक्तिक पद्य सादर केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन धनंजय कुलकर्णी यांनी केले. कार्यक्रमास विविध स्तरातील मान्यवरांची उपस्थिती होती.

## ग्रंथालय कर्मचारी विकास परिषद कार्याध्यक्षपदी श्रीधर स्वामी महिला आघाडी अध्यक्षपदी वैशाली दुरूगकर यांची निवड

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १३ फेब्रुवारी :** सार्वजनिक ग्रंथालय कर्मचारी विकास परिषदेची राज्यस्तरीय बैठक महाराष्ट्र राज्य सार्वजनिक ग्रंथालय कर्मचारी विकास परिषदेचे राष्ट्रीय अध्यक्ष सदाशिव बेडगे यांच्या अध्यक्षतेखाली गुरुवारी लातुरात उत्साहात पार पडली. या बैठकीत परिषदेच्या कार्याध्यक्षपदी श्रीधर स्वामी यांची तर महिला आघाडीच्या अध्यक्षपदी सौ. वैशाली दुरूगकर यांची निवड करण्यात आली.

सदर बैठकीत अनेक महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. येत्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेणे व आपल्या प्रलंबित प्रश्नांसाठी न्याय मिळवून घेणे, तसेच सुकाणू समिती अर्थात कोअर कमिटीबाबत चर्चा झाली, यामध्ये संपूर्ण कार्यकारी मंडळ हेच कोअर कमिटीचे





सदस्य राहतील, असे सर्वानुमते ठरले. संघटनेत नविन पदमान्यता घेऊन राज्य महिला अध्यक्ष व कार्याध्यक्ष हे पद भरण्याचे निश्चित करण्यात आले. यावेळी महिला आघाडीच्या राज्यस्तरीय अध्यक्ष म्हणून सौ. वैशाली दुरुगकर यांना तसेच कार्याध्यक्ष म्हणून श्रीधर स्वामी यांना नेमणूक पत्र देण्यात आले. मान्यवरांच्या हस्ते त्यांचा सन्मानही करण्यात आला.

ही बैठक अत्यंत खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न झाली. या बैठकीकडे राज्यातील सर्व ग्रंथालय कर्मचारी व पदाधिकारी यांचे लक्ष लागले होते. बैठकीसाठी राज्याचे अध्यक्ष सदाशिव बेडगे ,सिद्राम मुद्देबिहाळ, वसंत धोत्रे, रामचंद्र वग्गे, धोंडीराम जेऊरकर, राज्य संघटक विद्यासागर हणमंते, मराठवाडा संघटक निळकंठ होनमोडे, मराठवाडा कार्याध्यक्ष मनोहर गायकवाड, परिषदेचे लातूर जिल्हा उपाध्यक्ष सुर्यकांत जाधव, लातूर जिल्हा सचिव संतोष करमले, बालसिंगप्पा ओपळे, नागनाथ नागरगोजे, सौ.नागेश्वरी पांचाळ निवृत्ती सुर्यवंशी, रामानंद स्वामी, दगडू गरड,चंद्रकांत माने यासह मान्यवर उपस्थित होते.

### नोंदणी व मुद्रांक विभागात 'गट-ड' संवर्गातील उमेदवारांची निवड यादी प्रसिद्ध

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १३ फेब्रुवारी :** नोंदणी व मुद्रांक विभागात शिपाई 'गट-ड' संवर्गात २८४ पदे भरतीकरीता आय,बी,पी,एस. कंपनीमार्फत जुलै-२०२५ मध्ये ऑनलाईन परीक्षा घेण्यात आली होती. या परीक्षेत निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्तीच्या अनुषंगाने समुपदेशनाकरीता बोलाविण्यात येणार आहे. याबाबत विभागाच्या www.igrmaharashtra.gov.in या संकेतस्थळावर स्थळ व दिनांक लवकरच प्रसिद्ध करण्यात येईल, असे नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक रवींद्र बिनवडे यांनी कळविले आहे.

नोंदणी व मुद्रांक विभागात शिपाई 'गट-ड' संवर्गासाठीच्या परीक्षेचा निकाल २० ऑगस्ट २०२५ रोजी विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आला होता. उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांमधून सामाजिक व समांतर आरक्षणानुसार आणि गुणवत्तेनुसार उमेदवारांची कागदपत्रे पडताळणी पूर्ण करण्यात आली आहे.

## दयानंद विधी महाविद्यालयात राष्ट्रीय अभिरूप न्यायालय (Moot Court) स्पर्धेचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १३ फेब्रुवारी :** दयानंद शिक्षण संस्थेच्या दयानंद विधी महाविद्यालय, लातूर येथे १४ फेब्रुवारी २०२६ रोजी राष्ट्रीय अभिरूप न्यायालय स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेत महाराष्ट्र राज्याबरोबरच राज्याबाहेरच्या विधी महाविद्यालयातील मुट कोर्ट टीम सहभागी होणार आहेत. या बौद्धिक स्पर्धेचे उद्घाटन मुंबई उच्च न्यायालयाचे सन्माननीय न्यायमूर्ती शैलेश पी ब्रह्मे यांच्या हस्ते होणार असून समारोप समारंभाला प्रिन्सिपॉल डिस्ट्रिक्ट व सेशन जज संजय जे भरूका हे उपस्थित राहणार आहेत.

अभिरूप न्यायालय (Moot Court) म्हणजे न्यायालयाच्या प्रतिकृतीमध्ये प्रत्यक्ष न्याय निवड्याच्या कामकाजाचे केलेले सादरीकरण होय. ह्या शैक्षणिक साधनाचा उपयोग विधी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची न्यायालयीन कौशल्ये विकसित करण्यासाठी केला जातो. यात विद्यार्थ्यांना कायदा व न्यायव्यवस्थेच्या माहितीसोबतच कायद्याच्या नियमांचे महत्त्व समजावले जाते आणि विद्यार्थ्यांना कायद्यातील करिअरसाठी तयार केले जाते.

स्पर्धेत सहभागी विद्यार्थ्यांना काल्पनिक न्यायालयीन खटल्यांचे अभिरूप सादरीकरण करायचे आहे. या खटल्याचा सविस्तर अभ्यास करून सहभागी टीममधील विद्यार्थी वकील आणि इतर न्यायालयीन अधिकारी यांच्या भूमिकेत काम करतात. ते खऱ्या न्यायालयातील प्रक्रियांचे जसे की, युक्तिवाद, पुरावे आणि कायद्याच्या मुद्द्यांवर चर्चा यांचे अनुकरण करतात. न्यायालयात जसे युक्तिवाद होतात, त्याचप्रमाणे या ठिकाणीही होतात. निमंत्रित सन्माननीय न्यायाधीश विद्यार्थ्यांच्या युक्तिवादांचे, कौशल्याचे, कायद्याच्या ज्ञानाचे आणि सादरीकरणाचे मूल्यमापन करतात आणि निकाल देतात. या स्पर्धेत जिंकणाऱ्या विद्यार्थ्यांना महाविद्यालयाकडून दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा. श्री लक्ष्मीरमण लाहोटी, सचिव श्री रमेश बियाणी, सहसचिव ॲड. श्रीकांत उटगे, महाविद्यालय विकास समिती सदस्य ॲड. आशिष बाजपाई तसेच संस्थेचे इतर सन्माननीय पदाधिकारी यांच्या हस्ते ५५ हजारापर्यंतची रोख बक्षिसे, सर्टिफिकेट आणि ट्रॉफी दिली जाणार आहेत. या स्पर्धेमध्ये विविध महाविद्यालयातील सहभागी विद्यार्थ्यांना तज्ञ न्यायाधीशांच्या उपस्थितीत न्यायालयीन कामकाजाचा प्रत्यक्ष अनुभव मिळणार आहे. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना कायद्याचे अद्ययावत ज्ञान, युक्तिवाद, आणि कायदेशीर संशोधन यासारखी न्यायालयीन कौशल्ये विकसित करण्याची संधी मिळणार असून कायद्याच्या ज्ञानाचा व्यावहारिक उपयोग करण्यास मदत होणार आहे, अशी माहिती प्राचार्या डॉ पुनम नाथानी यांनी दिली आहे.

## 'महारेशीम अभियान २०२६' अंतर्गत रेशीम रथाला पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी दाखविली हिरवी झेंडी

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १३ फेब्रुवारी :** रेशीम शेतीची माहिती शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी जिल्ह्यात १० फेब्रुवारी २०२६ ते ११ मार्च २०२६ या कालावधीत 'महारेशीम अभियान २०२६' अभियान राबविण्यात येत आहे. यानिमित्त रेशीम शेतीच्या प्रचार आणि प्रसारासाठी जिल्हा रेशीम कार्यालयाने तयार केलेल्या रेशीम रथाला आज पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी हिरवी झेंडी दाखविली.

जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात झालेल्या या कार्यक्रमाला आमदार विक्रम काळे, आमदार संभाजी पाटील निलंगेकर, आमदार संजय बनसोडे, आमदार अभिमन्यू पवार, जिल्हाधिकारी वर्षा



ठाकूर-घुगे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहुल कुमार मीना, पोलीस अधीक्षक अमोल तांबे, लातूर शहर महानगरपालिका आयुक्त श्रीमती मानसी यांच्यासह रेशीम उत्पादक शेतकरी यावेळी उपस्थित होते.

रेशीम शेतीचे फायदे व त्यातून मिळणाऱ्या हमखास व शाश्वत उत्पन्नाची माहिती देण्यासाठी रेशीम रथ गावागावांमध्ये जाणार आहे. महारेशीम अभियान अंतर्गत जिल्ह्यात रेशीम शेतीच्या प्रसारासाठी, माहिती देण्याबरोबरच नवीन रेशीम लागवडसाठी शेतकऱ्यांची नोंदणी करण्यात येणार आहे. शेतकऱ्यांचा आर्थिक स्तर व जीवनमान उंचावण्यास रेशीम शेतीमुळे मदत होणार आहे, असे जिल्हा रेशीम विकास अधिकारी एस. बी. वराट यांनी सांगितले.

## 'एनराइज बाय सयाजी'चे लातूरच्या एमआयडीसी परिसरात उद्घाटन

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १३ फेब्रुवारी :** लातूर शहरातील वाढत्या औद्योगिक 'ओल्ड एमआयडीसी' परिसरात 'एनराइज बाय सयाजी लातूर'ने आपली सेवा सुरू केली आहे. महाराष्ट्रातील मराठवाडा प्रदेशातील आतिथ्य क्षेत्रासाठी हा एक महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे. ३० खोल्यांचे हे हॉटेल लातूरला देशातील वेगाने विकसित होणाऱ्या टियर-२ शहरांमध्ये स्थान मिळवून देणाऱ्या औद्योगिक आणि व्यावसायिक पट्ट्याच्या गरजा पूर्ण करण्यासाठी सज्ज आहे.

२०११ च्या जनगणनेनुसार २४० ५४ लाख लोकसंख्या असलेल्या लातूर जिल्ह्याने मराठवाड्यातील एक महत्त्वाचे व्यावसायिक केंद्र म्हणून आपली ओळख निर्माण केली आहे. देशातील प्रमुख सोयाबीन व्यापार केंद्रांपैकी एक असलेले लातूर तसेच ११ सहकारी साखर कारखान्यांमुळे महाराष्ट्राची साखर पट्टी म्हणूनही ओळखले जाते. या मजबूत औद्योगिक पायाभूत सुविधांमुळे दर्जेदार व्यावसायिक आतिथ्य सेवांची सातत्यपूर्ण मागणी निर्माण झाली आहे.

'एनराइज बाय सयाजी लातूर' मध्ये व्यवसाय व विरंगुळ्यासाठी प्रवास करणाऱ्या पाहुण्यांसाठी तीन श्रेणींमध्ये एकूण ३० खोल्यांची सुविधा उपलब्ध आहे-१८ डिलक्स रूम्स, ९ एक्झिक्युटिव्ह रूम्स आणि ३प्रीमियम एक्झिक्युटिव्ह रूम्स. प्रत्येक खोली आधुनिक सुविधा आणि आरामदायी रचनेने सज्ज आहे.

याशिवाय, येथे विविध आकारांचे चार प्रशस्त बँक्वेट हॉल्स उपलब्ध असून ते बोर्ड मिटिंग्स, प्रशिक्षण सत्रे, मोठ्या परिषदांपासून सामाजिक समारंभांपर्यंत सर्व कार्यक्रमांसाठी उपयुक्त आहेत. 'ज्वेल' हा सर्वात मोठा हॉल थिएटर शैलीत सुमारे ७०० पाहुण्यांची क्षमता असलेला आहे. 'सॉलिटेअर' मध्यम आकाराच्या कार्यक्रमांसाठी, 'क्रिस्टल' कॉर्पोरेट बैठका आणि समारंभांसाठी, तर 'कनेक्ट' हा छोट्या चर्चांसाठी सुसज्ज बोर्डरूम आहे.

निवास आणि कार्यक्रम सुविधांना पूरक म्हणून 'मोमेंट्' आणि 'होरायझन' ही दोन



मल्टी-क्युजिन रेस्टॉरंट्स उपलब्ध असून, निवासी पाहुणे, व्यावसायिक प्रवासी आणि स्थानिक खाद्यप्रेमींसाठी आधुनिक भोजनाचा अनुभव देतात.

लातूर हे आमच्या धोरणात्मक विस्तार दृष्टीकोनाशी सुसंगत असे उच्च क्षमतेचे बाजारपेठ आहे. मराठवाडा प्रदेशात आमची खास तुमच्यासाठी सेवा परंपरा आणत शहराच्या विकसित होत असलेल्या आतिथ्य गरजा पूर्ण करण्यासाठी एनराईजद सयाजी ची रचना करण्यात आली आहे, असे सयाजी हॉटेल्सचे असोसिएट जनरल मॅनेजर राजेंद्र जोशी यांनी सांगितले.

गर्जे सोलर इन्फ्राचे व्यवस्थापकीय संचालक मयूर गर्जे म्हणाले, लातूर जिल्ह्याचे व्यापारी केंद्र म्हणून झालेले परिवर्तन आम्ही प्रत्यक्ष अनुभवले आहे. या गतिमान व्यावसायिक परिसंस्थेसाठी दर्जेदार आतिथ्य सुविधा निर्माण करण्याची संधी आम्ही ओळखली. सयाजी हॉटेल्ससोबतच्या भागीदारीमुळे आमच्या शहरात जागतिक दर्जाच्या सुविधा आणि सेवा मानके आणता आली आहेत.

ओल्ड एमआयडीसी परिसरात स्थित असल्यामुळे हॉटेलला प्रमुख औद्योगिक वसाहती आणि वाहतूक केंद्रांशी उत्तम जोडणी लाभली आहे. लातूर रेल्वे स्थानकापासून हे हॉटेल सुमारे ३ किमी अंतरावर असून सोलापूर विमानतळापासून १२० किमी अंतरावर आहे, ज्यामुळे उत्पादन व प्रक्रिया उद्योगांशी संबंधित व्यावसायिक प्रवाशांसाठी सोयीस्कर प्रवासाची सुविधा उपलब्ध होते. 'एनराइज बाय सयाजी लातूर'चे उद्घाटन हे ब्रँडच्या उच्च क्षमतेच्या विकास बाजारपेठांमध्ये विस्तार करण्याच्या सातत्यपूर्ण धोरणाचे प्रतीक आहे. उदयोन्मुख व्यावसायिक शहरांच्या आतिथ्य गरजा पूर्ण करताना लातूरला व्यापार, कार्यक्रम आणि आधुनिक शहरी अनुभवांचे केंद्र म्हणून विकसित करण्यासाठी हे हॉटेल महत्त्वाची भूमिका बजावेल.

## संक्षिप्त वृत्त...

### परभणी शहरात दोन ठिकाणी मंगळसूत्र चोरी
महिलांमध्ये भीतीचे वातावरण

**परभणी,/प्रतिनिधी :** शहरातील मध्यवर्ती भाग असलेल्या गुजरी बाजार तसेच जिंतूर रोडवरील धनलक्ष्मी नगर येथे आज गुरुवारी सकाळच्या सुमारास अर्ध्या तासाच्या अंतराने दोन महिलांच्या गळ्यातील मंगळसूत्र लांबविण्याच्या घटना घडल्या. भरदिवसा आणि वर्दळीच्या भागात घडलेल्या या प्रकारांमुळे महिलांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

गांधी पार्क येथील रहिवासी व भाजपचे ज्येष्ठ नेते विलास देशपांडे चांदवडकर यांच्या सौभाग्यवती विद्या देशपांडे या नेहमीप्रमाणे सकाळी साडेसहाच्या सुमारास सुभाष रोडवरील बालाजी मंदिरात दर्शनासाठी निघाल्या होत्या. त्या गुजरी बाजार परिसरात पोहोचताच शिवाजी चौकाच्या दिशेने भरधाव वेगाने आलेल्या मोटरसायकलवरील दोन युवकांनी त्यांच्या गळ्यातील मंगळसूत्र अचानक हिसकावून घेतले. दोघांनीही तोंडावर मास्क बांधले होते. या अचानक घडलेल्या प्रकारामुळे विद्या देशपांडे यांनी आरडाओरडा केला. परिसरातील नागरिकांनी चोरट्यांचा पाठलाग करण्याचा प्रयत्न केला; मात्र आरोपी मोटरसायकलवरून पसार झाले.

या घटनेनंतर अवघ्या पाऊण तासात जिंतूर रोडवरील धनलक्ष्मी नगरातही तत्सम प्रकार घडला. घरासमोर रांगोळी काढत असलेल्या एका महिलेच्या गळ्यातील मंगळसूत्र मोटरसायकलवरून आलेल्या दोन चोरट्यांनी क्षणार्धात लांबविले आणि तेथूनही पलायन केले. घटनेची माहिती मिळताच नानलपेठ पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत परिसरातील सीसीटीव्ही फुटेज ताब्यात घेतले आहे. फुटेजमध्ये मोटरसायकलवरून जाणारे मास्कधारी दोन युवक स्पष्ट दिसत असल्याचे समजते. पोलिसांकडून आरोपींचा शोध सुरू असून अधिक तपास करण्यात येत आहे. एकाच दिवशी सकाळच्या वेळेत दोन ठिकाणी झालेल्या या चोरीमुळे नागरिकांनी पोलिस गस्त वाढविण्याची मागणी केली आहे. महिलांनी दागिने परिधान करताना सतर्कता बाळगावी, असे आवाहनही पोलिसांकडून करण्यात येत आहे.

### निराधार , वृध्द, विधवा लाभार्थ्यांच्या अनूदानासाठी मानवत तहसील प्रशासनाकडे करणी सेनेचे साकडे



**मानवत,/प्रतिनिधी-** मानवत शहरासह तालूक्यातील विधवा, वृद्ध लाभार्थ्यांचा अनुदानचा प्रश्न प्रलंबीत असून तो तात्काळ निकाली काढावा असे साकडे करणी सेनेचे युवा अध्यक्ष राम पंडीतराव दहे यांनी घातले असून अनेक लाभार्थ्यांना ऑनलाईनच्या नावावर हेळसांड चालविली असून प्रशासनाच्या वतीने लक्ष घालून लाभार्थ्यांचा प्रश्न निकाली काढावा अन्यथा करणी सेनेच्या वतीने आपले लोक कल्याण कारी प्रशासनाच्या विरोधात आपल्या न्याय हक्कासाठी वृध्द, निराधार लाभार्थ्यांना आंदोलन करावे लागेल असा ईशारा राम पंडीत राव दहे यांनी निवेदनात दिला आहे.

मानवत शहरासह तालूक्यातील निराधार, वयोवृध्द नागरिकांचे ऑनलाईन प्रस्ताव करून सुध्दा गेल्या अनेक महिण्या पासून शहारातील वृद्ध विधवा लाभार्थ्यांनी आपल्या कार्यालयाकडे अनुदान मिळण्यासाठी शासकनाच्या आदेशा प्रमाणे सर्व कागद पत्रे लाऊन ऑन लाईन कागद पत्रे व मागणी अर्ज सादर केले आहे.

पण मिटिंगच्या व ऑनलाईन च्या नावाखाले लाभार्थ्यांची हेळसांड केल्या जात असल्याने लभार्थी शासनाच्या अनुदाना पासून वंचित राहत आहे. तसेच उदरभणाचे कोणते ही साधन नसल्यामुळे उपासमारीसह दारोदार भटकंती करण्याची पाळी आली आहे.

तरी मानवत तहसिलचे कर्तव्यदक्ष तहसिलदार आ. पांडूरंग माचेवाड यांनी जातीने लक्ष घालून लाभार्थ्यांचा अनुदानाचा प्रश्न तात्काळ सोडवून सामान्य वयवृद्ध लाभर्थ्यांना दिलासा ध्यावा अशी मागणी करणी सेनेच्या वतीने करण्यात आली आहे.


### सेलूत सामुदायिक श्रीज्ञानेश्वरी पारायण सांगता सोहळ्याचे भव्य आयोजन



**सेलू,/प्रतिनिधी:-** सेलू येथे दि. ११ मार्च ते १९ मार्च २०२६ या कालावधीत सामुदायिक श्रीज्ञानेश्वरी पारायण सांगता सोहळ्याचे भव्य आयोजन करण्यात आले आहे. या पवित्र सप्ताहात सुमारे २१,००० वाचक पारायणात सहभागी होणार असून, संपूर्ण शहरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले आहे.

या सप्ताहादरम्यान दुपारच्या सत्रात राष्ट्रसंत परमपूज्य श्रद्धेय स्वामी श्रीगोविन्ददेव गिरिजी महाराज यांची श्री महाभारत संदेश कथा होणार आहे. तसेच सकाळ व सायंकाळी दोन सत्रांमध्ये महाराष्ट्रातील नामवंत कीर्तनकारांची कीर्तनसेवा संपन्न होणार आहे.

या भव्य कार्यक्रमाच्या यशस्वी नियोजन व मार्गदर्शनासाठी बुधवार, दि. ११ फेब्रुवारी २०२६ रोजी दुपारी ३.०० वाजता सिंदूर हॉल, श्रीबालाजी मंदिर, मारवाडी गल्ली, सेलू येथे महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकीस पालकमंत्री ना. मेघना बोर्डीकर, नामदेव महाराज चारठाणकर, जयप्रकाश बिहाणी, नंदकिशोर बाहेती, दत्तात्रय पावडे, संजय साडेगावकर, माजी नगराध्यक्ष विनोद बोराडे, नगराध्यक्ष मिलिंद सावंत, श्रीराम शेंडगे, डॉ. सत्यनारायण लोया, प्राचार्य विनायकराव कोठेकर, प्राचार्य शरद कुलकर्णी, पांडुरंग मगर, विजया कोठेकर, पंडित महाराज डाके, बालासाहेब रोडे, रमेश महाराज मोरे, संजय लड्डा, शिवाजी महाराज खवणे, मारुती महाराज वाघ यांच्यासह शहरातील विविध क्षेत्रातील प्रतिष्ठित नागरिक मान्यवर उपस्थित होते.



**परभणी जिल्हयात दि. ११ मार्च २०२६ पर्यंत महारेशीम अभियान राबविण्यात येणार आहे. या अनुषंगाने जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण यांच्या हस्ते आज रेशीम चित्ररथाला हिरवी झेंडी दाखवून अभियानाचा शुभारंभ करण्यात आला.या अभियानाद्वारे शेतकऱ्यांना रेशीम शेतीचे महत्त्व, शासकीय योजना व अनुदानाची माहिती देण्यात येणार असून, जिल्ह्यात रेशीम उद्योगाला चालना देण्याचा उद्देश आहे.**

# विकास कामांवर जिल्हा वार्षिक योजनेचा निधी वितरीत वेळेत खर्च करावा- पालकमंत्री मेघना साकोरे

**परभणी,/प्रतिनिधी- :** जिल्ह्यातील विविध विकास कामांसाठी मंजूर झालेला जिल्हा वार्षिक योजनेचा संपूर्ण निधी निर्धारित कालावधीत व नियोजनबद्ध पद्धतीने खर्च करण्यात यावा. सर्व कामे ही दर्जे दार व गुणवत्तापूर्णच असावीत. कोणत्याही परिस्थितीत निधी अखर्चित राहून परत जाणार नाही, याची दक्षता संबंधित विभागप्रमुखांनी घ्यावी, अशी सूचना राज्याच्या सार्वजनिक आरोग्य व कुटुंबकल्याण, पाणीपुरवठा व स्वच्छता, ऊर्जा, महिला व बालविकास, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) राज्यमंत्री तथा परभणी जिल्ह्याच्या पालकमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांनी केली. जिल्हाधिकारी कार्यालयात आज जिल्हा नियोजन समितीची बैठक पालकमंत्री श्रीमती बोर्डीकर यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. त्यावेळी त्या बोलत होत्या.

बैठकीस खासदार संजय जाधव, आमदार रत्नाकर गुट्टे, आमदार राजेश विटेकर, जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी नतिषा माथूर, जिल्हा पोलीस अधीक्षक रवींद्रसिंह परदेशी, निवासी उपजिल्हाधिकारी अनुराधा ढालकरी, जिल्हा नियोजन अधिकारी उमेश वाघमारे आदींसह सर्व विभागप्रमुख उपस्थित होते. शासनाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) सन २०२६-२७ च्या शासनाने निर्धारित करून दिलेल्या कमाल वित्तीय मर्यादा रुपये ३११.०३ कोटी रुपयांच्या प्रारुप आराखडयास जिल्हा नियोजन समितीने मान्यता प्रदान केली. तसेच जिल्ह्याची स्थानिक गरज व प्राथमिकता विचारात घेऊन रुपये २९४ कोटीची वाढीव मागणी करण्यात आली आहे. माननीय मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली दि. १२ फेब्रुवारी २०२६ रोजी होणाऱ्या राज्यस्तरीय बैठकीमध्ये अंतिम मान्यता प्रदान करण्यात येणार आहे. जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) २०२५-२६ अंतर्गत रु. ३८५ कोटी निधी मंजूर आहे. त्यापैकी १११ कोटी ८२ लक्ष निधी खर्च झाला आहे. पालकमंत्री म्हणाल्या की, जिल्हयाच्या विकासात जिल्हा वार्षिक योजनेच्या निधीचा मोठा वाटा असतो. या निधीच्या




माध्यमातून अनेक विकास कामे मार्गी लागतात. त्यामुळे निधी वेळेत खर्च होईल याची सर्वांनीच दक्षता घ्यावी. परभणी जिल्हयात अनेक पुरातन तीर्थस्थळ व पर्यटन स्थळे आहेत, या स्थळांच्या संवर्धनासाठी प्रस्ताव सादर करण्यात यावा. ज्या गावांमध्ये ट्रान्सफॉर्मरची आवश्यकता आहे, तिथे प्राधान्याने ट्रान्सफॉर्मर बसवावेत. ट्रान्सफॉर्मरची दुरुस्ती याकडेही लक्ष देऊन कामे वेळेत पूर्ण करावीत. कुठेही विजेचा तुटवडा भासू देऊ नये. तसेच अखंडीत विजेसाठी प्रधानमंत्री सूर्यघर मोफत योजना प्रभावीपणे राबवावी. सिल्क-मिल्क प्रकल्पाची व्याप्ती वाढवण्यासाठी रेशीम व दुग्ध व्यवसायासाठीचे शेतकऱ्यांचे कर्ज प्रस्ताव प्रलंबित ठेवण्यात येऊ नयेत. अंगणवाडयांना आवश्यक सुविधा उपलब्ध करुन द्याव्यात. उत्कृष्ट अंगणवाडी सेविकांना पुरस्कार देऊन गौरविण्यात येईल. सुरक्षेच्या दृष्टीने जिल्हयातील सर्व शहरात सीसीटीव्ही कॅमेरे लावण्यात यावेत. अवैध रेती वाहतूक रोखावी. तसेच घरकुल लाभार्थ्यांना प्राधान्याने रेती उपलब्ध करुन द्यावी. जलजीवन मिशन अंतर्गत ६५ गाव नळ योजनेतील त्रुटी दूर करुन योजना कार्यान्वित करावी. एकल महिलांच्या प्रगतीसाठी या महिलांचे सर्वेक्षणाचे काम जिल्हयात चांगले झाले असून सर्वेक्षणात ज्या त्रुटी असतील त्या तातडीने दुरुस्त कराव्यात, असे निर्देश पालकमंत्री यांनी यावेळी दिले. बैठकीमध्ये विविध विषयांवर चर्चा झाली. लोकप्रतिनिधींनी विजेबाबतच्या समस्या मांडताना उन्हाळयामध्ये पाण्याअभावी शेतकऱ्यांच्या पिकांचे नुकसान टाळण्यासाठी विजेची समस्या दूर करण्यात यावी. आवश्यक ठिकाणी ट्रान्सफॉर्मर बसविण्यात यावेत. चढया भावाने खतांची विक्री करणाऱ्यांवर कार्यवाई करावी. शेतकऱ्यांना सुलभपणे पिककर्ज देण्यात यावे. अंगणवाड्या, शाळा खोल्यांची दुरुस्ती करण्यात यावी. जिल्ह्यात अवैध रेती उत्खनन व वाहतूक रोखावी. शहरांमध्ये सीसी टीव्ही कॅमेरे लावाव्यात. परभणी शहरातील वाहतुक व्यवस्था सुरळीत राहण्यासाठी मुख्य चौकात सिग्नल बसवावेत, आदी सूचना केल्या. प्रारंभी दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांना श्रध्दांजली अर्पण करण्यात आली. त्यानंतर बैठकीत विषयसूचीप्रमाणे दि. २३ जून २०२५ रोजी संपन्न झालेल्या बैठकीतील मुद्यांबाबत अनुपालन अहवालावर चर्चा करुन अनुपालन अहवालास मान्यता देण्यात आली.

## सोनपेठ येथे शिवजन्मोत्सवास सुरूवात

**सोनपेठ,/प्रतिनिधी-** छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जन्मोत्सवानिमित्त जय भवानी बहुउद्देशीय सेवाभावी संस्था संचलित जय भवानी मित्र मंडळ च्या वतीने मागील १४ वर्षापासून शिवजन्मोत्सव साजरा करण्यात येत आहे ,यानिमित्त शहरात दिवस विविध सामाजिक, सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

गुरुवार दि.१२ रोजी अभयसिंह इंग्लिश स्कूलच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराजांच्या पराक्रमाची, संस्कृतीची व परंपरेची आठवण करून देणारा महोत्सवाच्या माध्यमातून सादरीकरण करण्यात येऊन कला महोत्सव कार्यक्रमास प्रारंभ करण्यात आला.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी वकील संघाचे तालुकाध्यक्ष अशोक तिरमले हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून मराठी पत्रकार संघाचे जिल्हा उपाध्यक्ष शिवमल्हार वाघे, एडवोकेट श्रीराम भिसे, एडवोकेट माधव चिमणगुंडे,



एडवोकेट मनोज बोबडे, एडवोकेट व्ही.जी. कांदे, सिताराम पवार, प्राचार्य रुपेश दलाल ,रामेश्वर सावंत , ज्ञानेश्वर वाघमारे आदी उपस्थित होते,

कार्यक्रमाचे प्रास्ताविक अतुल शिंदे यांनी केले. पुढील सहा दिवस चालणाऱ्या शिवजन्मोत्सव कार्यक्रमात केंद्रीय कन्या शाळा,व्हिजन पब्लिक स्कूल, जिजामाता पब्लिक स्कूल,मुक्तेश्वर विद्यालय, जिल्हा परिषद प्रशाला या शाळांच्या वतीने लोककला महोत्सव सादरीकरण करण्यात येणार आहे, शिवजन्मोत्सव समितीच्या वतीने रक्तदान शिबिर, संत सेवालाल महाराज जयंती ,वक्तृत्व स्पर्धा ,शिव पूजन सोहळा, विविध कार्यक्रम राबवण्यात येणार असून दि.२० फ ब्रुवारी रोजी छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेची शहरातून भव्य शोभायात्रा काढण्यात येणार आहे या कार्यक्रमास शिवप्रेमी नागरिकांनी उपस्थित राहावे असे आवाहन जय भवानी मित्र मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.



### पंडित दीनदयाळ उपाध्याय महा अभियान २०२६ भाजपा परभणीची जिल्हास्तरीय महत्वपूर्ण बैठक

**परभणी,/प्रतिनिधी:** भारतीय जनता पार्टी, परभणीच्या वतीने पंडित दीनदयाळ उपाध्याय महा अभियान २०२६ च्या अनुषंगाने आज सावली विश्रामगृह, परभणी येथे जिल्हास्तरीय महत्वपूर्ण बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीस संघटन मंत्री श्री. संजयजी कौडगे यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

यावेळी भाजपा परभणी जिल्हाध्यक्ष श्री. शिवाजी भरोसे, श्री. सुरेश भुमरे, माजी जिल्हाध्यक्ष श्री. संतोष मुरकुटे, डॉ. सुभाष कदम यांच्यासह शहर व ग्रामीण भागातील सर्व पदाधिकारी, नवनिर्वाचित नगरसेवक, जिल्हा परिषद व पंचायत समिती सदस्य तसेच पक्षाचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

बैठकीदरम्यान पंडित दीनदयाळ उपाध्याय महा अभियानाच्या अंमलबजावणीबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. संघटन बळकटीकरण, बूथ स्तरावरील कामकाज, आगामी निवडणुकांच्या दृष्टीने नियोजन तसेच कार्यकर्त्यांची भूमिका यावर संघटन मंत्री श्री. संजयजी कौडगे यांनी सखोल मार्गदर्शन केले. अभियान यशस्वी करण्यासाठी सर्वांनी एकजुटीने काम करण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले.



**परभणी- महाराष्ट्र राज्य लोकसेवा हक्क अधिनियम-२०१५ अंतर्गत अधिसूचित सेवांच्या अंमलबजावणीबाबत आढावा बैठक आज जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नियोजन भवन येथे पार पडली. बैठकीस उपसचिव परसराम बहुरे, कक्ष अधिकारी शशांक जैस्वाल, निवासी उपजिल्हाधिकारी अनुराधा ढालकरी, उपमुख्य कार्यकारी अधिकारी रश्मी खांडेकर, सेलू उपविभागीय अधिकारी शैलेश लाहोटी, उपजिल्हा निवडणूक अधिकारी अरुणा संगेवार दिसत आहेत.**

# पूर्णा पंचायत समितीवर फडकणार भाजपाचा झेंडा- आमदार डॉ.रत्नाकर गुट्टेंची राजकीय खेळी, पक्ष प्रवेशामुळे राजकीय समीकरणे बदलली

**पूर्णा,/प्रतिनिधी:** पूर्णा तालुक्यातील ६ जिल्हा परिषद गट आणि १२ पंचायत समिती गणांसाठी नुकतीच निवडणूक प्रक्रिया पूर्ण झाली आहे. त्यामध्ये भाजपने सर्वाधिक चार जागा, उद्धवसेनेने तीन, यशवंत सेनेने दोन, राष्ट्रवादीला एक आणि दोन अपक्ष उमेदवारांनी विजय मिळविला आहे. त्यामुळे पंचायत समितीची त्रिशंकू परिस्थिती निर्माण झाली होती. मात्र, स्थानिक आमदार डॉ. रत्नाकर गुट्टे यांनी राजकीय डावपेच टाकून नवनिर्वाचित तीन पंचायत समिती सदस्यांचा भारतीय जनता पार्टीत प्रवेश करून घेतला.

जिल्ह्याच्या राजकारणात आपणच किंगमेकर असल्याचे दाखवून दिले. त्यामुळे भाजपाचे संख्याबळ सात झाले आहे. परिणामी, पूर्णा पंचायत समितीवर भाजपाचा झेंडा फडकण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. त्यामुळे आ.डॉ. गुट्टे यांची राजकीय खेळी सत्ता स्थापनेची समीकरणे बदलणारी ठरली आहे. शहरातील राम-सीता सदन येथे आ.डॉ.गुट्टे यांच्या प्रमुख उपस्थितीत पूर्णा तालुक्यातील गौर पंचायत समिती गणाचे नवनिर्वाचित सदस्य नरेश उद्धवराव जोगदंड, देगाव पंचायत समिती गणाचे सदस्य विलास बळीराम गिरी आणि धनगर टाकळी पंचायत समिती गणाचे नवनिर्वाचित सदस्य गोविंद सूर्यवंशी यांनी भारतीय जनता पार्टीत जाहीर प्रवेश केला. याप्रसंगी आ.डॉ. गुट्टे यांनी तिन्ही सदस्यांचे भाजपात स्वागत करून दिलेल्या पाठिंब्याबद्दल आभार व्यक्त केले. तसेच आपल्या विश्वासाला कधीही तडा जाऊ देणार नाही, अशी ग्वाही दिली. पुढे बोलताना आ.डॉ.गुट्टे म्हणाले की, ही निवडणूक माझ्यासाठी फारच निर्णायक होती. कारण, राज्याचे लोकप्रिय मुख्यमंत्री तथा माझे मार्गदर्शक देवेंद्रजी फडणवीस, भाजपाचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण आणि महसूल मंत्री



चंद्रशेखर बावनकुळे यांच्यासह अनेक वरिष्ठ नेत्यांनी माझ्यावर विश्वास टाकला होता. तो विश्वास सार्थ ठरविण्यासाठी गंगाखेड विधानसभा मतदारसंघातील माय-बाप जनतेने त्यांचे बहुमूल्य मत भारतीय जनता पार्टीच्या पारड्यात टाकले आणि मला भक्कम पाठिंबा दिला. मात्र, तरीही पूर्णा तालुक्यात आम्ही थोडे कमी पडलो, याची खंत आहे. पण, विकासाला प्राधान्य देणाऱ्या नवनिर्वाचित तीन सदस्यांनी भाजपाचा झेंडा हाती घेतल्यामुळे आता सभापती भाजपाचा होणार असून जनतेला दिलेली आश्वासने पूर्ण करता येणार आहेत, याचा आनंद होत आहे. निवडणूक कोणतीही असो, माझी माय-बाप जनता नेहमी माझ्या पाठीशी खंबीरपणे उभी राहाते. याची प्रचिती जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीत विरोधकांसह सर्वांना आली आहे. त्यामुळे माझ्यावर विश्वास टाकून आपला मतदानरूपी आशीर्वाद देणाऱ्या प्रत्येक मतदाराचा कायम ऋणी आहे आणि राहील. कारण, माझी माय-बाप जनता हीच माझा ताकद, ऊर्जा आणि बळ आहे. त्यामुळे त्यांच्या साथीने, सोबतीने आणि आशीर्वादाने प्रत्येक निवडणुकीला सामोरे जात असतो. ते मला कधीच नाउमेद होऊ देत नाहीत. अगदी भरभरून प्रेम करतात. विकासाला साथ आणि मत देतात. त्यामुळे गंगाखेड विधानसभा हाच माझा परिवार आहे, असेही आ.डॉ.गुट्टे यांनी आवर्जून नमूद केले. आमच्या गणातील गावोगावी विकासाची गंगा पोहोचावी. तसेच स्थानिक नागरिकांना दर्जे दार पायाभूत सुविधा उपलब्ध व्हाव्यात. तसेच त्यांचे प्रश्न, समस्या आणि अडचणी दूर झाल्या पाहिजेत, याच भावनेतून आम्ही ही निवडणूक लढवली. त्यामुळे आमच्या भूमिकेचे स्वागत करून माय-बाप जनतेने आम्हाला विजयी कौल दिला आहे. म्हणून आता आम्ही दिलेली आश्वासने आणि शब्द पूर्ण करण्यासाठी विकासाला समर्थन देणे सर्वांच्याच हिताचे ठरेल, ही भूमिका घेऊन आम्ही स्थानिक आमदार डॉ.रत्नाकर गुट्टे यांच्या नेतृत्वाखाली भारतीय जनता पार्टीत प्रवेश केला आहे. त्यामुळे स्थानिक विकासासाठी आम्ही कटिबद्ध असल्याची प्रतिक्रिया प्रवेशकर्त्या नवनिर्वाचित पंचायत समिती सदस्यांनी दिली. यावेळी गौर पंचायत समिती गणाचे नवनिर्वाचित सदस्य नरेश जोगदंड, देगाव पंचायत समिती गणाचे नवनिर्वाचित सदस्य विलास गिरी आणि धनगर टाकळी पंचायत समिती गणाचे नवनिर्वाचित सदस्य गोविंद सूर्यवंशी, गुट्टे काका मित्र मंडळाचे पूर्णा तालुका प्रभारी नितीन कदम, तालुकाध्यक्ष सुभाषराव देसाई, पंचायत समिती सदस्य दिनानाथ दुधाटे यांच्यासह भारतीय जनता पार्टी व गुट्टे काका मित्र मंडळाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## अग्रलेख...

# वास्तवाच्या दोन बाजू

समन्वय, संयम, सहिष्णुता, समजूतदारपणा, सहजता ही समंजस समाजाची ओळख असते. अशा सर्वसंपन्न स्वभावाचा समाज सहसा सर्वत्र दिसत नाही. भारताच्या प्राचीन संस्कृतीला अभिप्रेत असलेली समाजपुरुषाची वैशिष्ट्ये हीच असून अशा वैशिष्ट्यांनी परिपूर्ण असा समाज निर्माण करण्यासाठी या देशातील अनेकांनी आपली आयुष्ये समर्पितही केली आहेत. पाश्चात्य जगात चंगळवाद फोफावला असल्याने श्रीमंती हाच सुखी समाजाचा निकष मानला जात आहे. एपस्टिन फाईल्स नावाच्या नव्या धक्क्याने जगाला हादरे बसू लागले असून या चंगळवादी समाजजीवनाचा विळखा जगाभोवती आवळला जात आहे. एका बाजूला संस्कृती आणि परंपरांचे पुनरुज्जीवन करण्याचे प्रयत्न आणि दुसरीकडे चंगळवादाचा विळखा अशा कोंडीत सापडलेल्या समाजव्यवस्थेमुळे सामाजिक स्वभावाचे कोडे किचकट होत चालले आहे. त्यामुळेच कोणत्याही समाजाच्या स्वभावाची नेमकी ओळख आणि वैशिष्ट्ये यांची उकल करणे कठीण होत असून 'आपला समाज नेमका आहे तरी कसा' हा प्रश्न विचारला गेला, तर कदाचित संशोधनच करावे लागेल. एकाच समाजात एकाच वेळी दिसणाऱ्या स्वाभाविक विसंगतींमुळे संभ्रमावस्था वाढण्याचीच शक्यता अधिक असून एखाद्या स्वभाव वैशिष्ट्यावर बोट ठेवून तीच समाजाची ओळख आहे, असे मानले तर त्याच वेळी त्याच वैशिष्ट्याला छेद देणारे उलटेच काही समोर येऊन संभ्रम अधिक वाढतो आणि प्रश्न अधिक अवघडच होऊन जातो. समोर येणारे विसंगत रूप हे संयमाचे, असहिष्णुतेचे, असमंजसपणाचे किंवा नेमके कसे हे ठरविणे कसोटीचा प्रसंग ठरतो.

भारतातील लोकसंख्येच्या कपाळावरची दारिद्र्यरेषा ही स्वातंत्र्यापासून सतत सतावणारी समस्या आहे. अनेक प्रयत्न करूनही ही रेषा सहजपणे पुसली जात नाही. दारिद्र्यरेषा पुसणे हे खडतर आव्हान असल्याने दारिद्र्यरेषेची लांबी कमी-जास्त करणे तुलनेने अधिक सोपे असते हे लक्षात आल्यावर दारिद्र्याचे निकष बदलत राहिले आणि या रेषेची लांबी कमी-अधिक होत राहिली. सुमारे साडेसहा दशकांनंतर पहिल्यांदाच या रेषेखाली सातत्याने पिचलेली २५ कोटी लोकसंख्या त्यातून बाहेर आली, तेव्हा भारताने मोठा उत्सव साजरा केला होता. तरीही जागतिक बँकेच्या अहवालानुसार, भारतातील प्रत्येक १०० लोकसंख्येपैकी पाच जणांना जगण्यासाठी आवश्यक असलेल्या किमान गरजाही मिळत नसल्याचे दिसून येते. दोन वर्षांपूर्वीच्या या पाहणीनुसार २०१०-११ पर्यंत भारतातील अत्यंत गरिबांची संख्या खूप जास्त होती. पुढच्या दशकात ही संख्या घटत गेली आणि दारिद्र्याचा शिक्का पुसट होत गेला, तरीही जगण्याच्या गरजा भागविण्यापुरते जगणेच अजूनही अनेकांच्या वाट्याला आले असून काटकसर करणे हाच त्यांच्या बचतीचा मार्ग आहे. असा संघर्ष करावा लागला की सहनशीलता आपोआपच स्वभावात भिनते आणि समंजसपणाही वाढतो. सगळ्यांच्याच समस्या समान असतात तेव्हा सहिष्णुता हा आपोआपच स्वभाव होऊ लागतो आणि समन्वयाने जगणे ही सामूहिक गरज होऊ लागते. परिस्थितीशी सामना करताना तयार होत गेलेल्या या स्वभाव वैशिष्ट्यांवर बोट ठेवून समंजस समाज अशी आपल्या समाजाची ओळख असल्याचा छातीठोक दावा करावा, तर लगेचच त्याला छेद देणारे वेगळेच काही समोर येऊन नवा संभ्रम निर्माण होतो. एकीकडे उपजीविकेपुरते कमावण्यासाठी करावा लागणारा संघर्ष ही बहुसंख्य समाजाची ओळख होत असतानाच, समोर आलेल्या एका ताज्या वास्तवाने त्यास छेद दिला आहे. पैसा पैसा गाठीशी बांधून कष्टाने जगणाऱ्या बहुसंख्यांच्या देशात, तब्बल ७२ हजार कोटी रुपये एवढ्या प्रचंड रकमेचा पैसा वर्षानुवर्षे न वापरता बँकांमध्ये पडून राहिला असून त्यावर हक्क सांगण्यासाठी कोणी पुढेच येत नसल्याची बाबही उघडकीस आली आहे. देशातील वेगवेगळ्या बँकांमध्ये पडून राहिलेल्या ७२ हजार ४५४ कोटींच्या ठेवींना दावेदारच नसल्याने ही रक्कम अक्षरशः बेवारस ठरल्याचे माहिती केंद्र सरकारने संसदेत दिल्याने, समाजाच्या स्वभावाची दोन्ही रूपे आपोआपच समोर येत आहेत. रिझर्व्ह बँकेच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार १० वर्षे वा त्याहून अधिक काळ बँक खातेदारांनी आपल्या खात्यात कोणतेही व्यवहार केले नसतील तर ती खाती निष्क्रिय समजली जातात. या खातेदारांना त्याची आठवण करून देण्यासाठी बँकांनाच पाठपुरावा करावा लागतो आणि त्याला खातेदाराकडून प्रतिसाद न मिळाल्यास ही रक्कम अन्य एका राखीव निधीमध्ये वळती करावी लागते. देशातील आघाडीच्या आणि परदेशी बँकांमध्ये अशी सुमारे ७२ हजार कोटींची रक्कम पडून आहे.पाठपुरावा करूनही त्यावर दावा करण्यास कोणीच पुढे येत नाही, हे समाजाच्या स्वभावाचे दुसरे विसंगत रूपच म्हणावे लागेल. अशा पडून राहिलेल्या रकमेचे दावेदार शोधून ती त्यांच्या हवाली करण्यासाठी बँकांनी विशेष मोहिमा राबविल्या, रिझर्व्ह बँकेने खास मंच स्थापन केला, तरीही ७२ हजार कोटींची रक्कम विनादावा पडून राहिली, ही वास्तवाची दुसरी अस्वस्थ बाजू म्हणावी लागेल. समाधानी जगण्यासाठी पुरेशा सुविधांची उपलब्धता आणि त्या सुविधा प्राप्त करण्यासाठी पुरेसे उत्पन्नाचे स्रोत ही समाजाची किमान गरज असते. आज देशाचे दरडोई उत्पन्न वाढत आहे, विकासाचा आलेख उंचावत आहे, विकासदराचा दर जागतिक आर्थिक स्थितीच्या तुलनेत स्थिर आणि आश्वासकही आहे, तरीही साधने आणि संपत्तीचे विषम वाटप ही समस्या संपलेली नाही. मूठभर लोकांच्या हाती संपत्तीचा मोठा वाटा आणि असंख्यांची झोळी अक्षरशः रिकामी ही या वास्तवाची दुसरी बाजू आहे. दिवंगत केंद्रीय मंत्री अरुण जेटली यांनी यासंदर्भात काही वर्षांपूर्वी व्यक्त केलेले विचार नक्कीच अंतर्मुख होण्यास भाग पाडणारे आहेत. आजही त्या वास्तवात फारसा फरक पडलेला नसावा.

दरवर्षी केंद्रीय अर्थसंकल्प सादर झाल्यानंतर, देशात प्रामुख्याने आयकर सवलतीबाबत व्यापक चर्चा होते. कधी दिलासा, कधी नाराजी असे सूर उमटू लागतात. कधीतरी कोणतीच नवी घोषणा नसल्याचे कारण देत मध्यमवर्गीयांच्या तोंडास पाने पुसल्याचा संताप चहुबाजूंनी व्यक्त होऊ लागतो. मध्यमवर्गीयांविषयी कळकळ ही चांगली बाजू यातून समोर येत असल्याने त्याचे स्वागत करायलाच हवे. पण आयकरासंबंधीचा एकंदर मागोवा घेताना अर्थमंत्री या नात्याने अरुण जेटली यांनी समोर आणलेले ते जुने वास्तव पुन्हा आठवणे साहजिकही ठरते. देशातील बहुसंख्य लोक राष्ट्रभक्त आहेतच; तरीही हा देश बहुसंख्य अप्रामाणिकांचाच आहे. चुकवेगिरी, बुडवेगिरी, फसवेगिरी आणि ढोंगीपणा नसानसात भरलेली माणसे देशात आहेत; अशा माणसांतीलच काही देशाला शहाणपणाचे डोस पाजण्यात पुढे असतात. देशातील १३० कोटी लोकसंख्येपैकी फक्त दीड टक्का (१.९ कोटी) भारतीय लोक आयकर भरतात. त्यापैकी फक्त २३ हजार ९३२ (०.१ टक्का) भारतीयांचा इन्कम टॅक्समधील वाटा २६ टक्के आहे. त्यापुढील एक टक्का (१,९५,३४२) लोकांचा एकूण आयकर वसुलीतील वाटा १९ टक्के आहे. दोन टक्के (४,१५,३०२) लोकांचा वाटा १४ टक्के तर ७ टक्के लोकांचा वाटा १८ टक्के एवढा आहे. उरलेल्या ८९.९ टक्के (९१ लाख) भारतीयांचा एकूण आयकर महसूलातील वाटा २३ टक्के आहे. म्हणजे आयकर महसुलातील ९० टक्के वाटा केवळ १० (९ लाख) टक्के भारतीयांचा आहे. तरीही देशात दरवर्षी रियल इस्टेटमधील गुंतवणूक वाढते, वाहनांची संख्या वाढते, महागड्या मोबाईल कंपन्यांना भारताच्या बाजारपेठा खुणावत असतात. म्हणजेच, ९८.५ टक्के लोकसंख्या भयावह गरिबीत जगत असली पाहिजे किंवा प्रचंड आयकर चुकवेगिरी करत असली पाहिजे. तरीही आयकर सवलतीकडे १०० टक्के जनतेचे लक्ष लागून राहते. अशी नेमकी आकडेवारी तेव्हा बहुधा प्रथमच उजेडात आल्याने समाजाच्या स्वभावाचे नेमके वैशिष्ट्य ठरविणे अवघड होत असून त्या परिस्थितीत फरक पडला असेल, असे ठामपणे सांगता येणार नाही. कारण आर्थिक शिस्त लावण्याच्या प्रत्येक प्रयत्नात कशी पळवाट शोधली जाईल, हे सांगण्याचीच स्पर्धा अर्थतज्ज्ञांतही दिसते. त्यामुळे पळवाटांवरूनच चालणारा समाज अशी ओळख असेल, तर त्यावर सत्ता कोण गाजवतो हा मुद्दा महत्त्वाचा नाही. समाजाची दुहेरी ओळख पुसली नाही आणि वास्तवाची दुसरी बाजू बदलली नाही, तर बदलाची अपेक्षाच न करणेच चांगले!

## विशेष

# ११४ राफेल विमान खरेदीचा अन्वयार्थ

**अभय बाळकृष्ण पटवर्धन**

१६ जानेवारी २६ ला संरक्षण सचिवांच्या अध्यक्षतेखालील संरक्षण खरेदी मंडळानी फ्रेंच विमान कंपनी दसॉल्टकडून ४-५ प्रणालींची ११४ राफेल लढाऊ विमान खरेदी करण्याचा प्रस्ताव मान्य केला. यानंतर संरक्षण मंत्र्यांच्या अध्यक्षतेतील संरक्षण अधिग्रहण परिषदेच्या मंजुरीपश्चात ९ फेब्रुवारी २६ ला हा प्रस्ताव, पंतप्रधानांच्या अध्यक्षतेखालील सुरक्षाविषयक मंत्रिमंडळ समितीकडे अंतिम मंजुरीसाठी पाठवला गेला. सूत्रांनुसार या समितीच्या मंजुरीनंतर १८-२० फेब्रुवारी २६ दरम्यान पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉन यांच्या भेटीच्या वेळी या ३६ दशांश १ अब्ज डॉलर्स/१७० दशांश ३ अब्ज रुपयांच्या करारावर शिक्कामोर्तब होईल. करारानुसार ११४ पैकी जवळपास ८०-९० राफेल विमानांची निर्मिती भारतात होईल. त्यासाठी फ्रान्समधील दसॉल्ट कंपनीच्या अनेक यंत्रणा भारतात येतील. यासंबंधी वाटाघाटी आधीच सुरू झाल्या आहेत. या खरेदीतच २४ राफेल एफ ५ विमानांचा अतिरिक्त पर्याय आणि नागपूरमध्ये होणार असून एअरफ्रेम कोन उत्पादन आणि विमान जोडणी (असेम्ब्ली) यात सामील आहेत.

नागपूरमधील दसॉल्ट रिलायन्स एरोस्पेस लिमिटेड, टाटा, महिंद्रा आणि डायनॅमॅटिक टेक्नॉलॉजी मिळून प्रतिवर्ष २४-३० राफेल विमानांची अंतिम जोडणी करतील; जी फ्रान्सच्या २५-३० विमान उत्पादनाची पूरक शक्ती असेल. टाटा आणि दसॉल्ट यांच्यातील फ्यूसीलाज स्थानिकीकरण संबंधित कारखान्याचे बांधकाम सुरू होणार असून २०२८ च्या शेवटी विमानांची डिलिव्हरी सुरू होईल. याचबरोबर विमानांची स्थानिक दुरुस्ती, देखभाल आणि आधुनिकीकरणासाठी आवश्यक केंद्र तयार होत आहे. हा करार अपेक्षाकृत झाला तर ही विमान खरेदी संख्या २०० विमानांपर्यंत जाण्याची संभावना आहे. संरक्षणतज्ज्ञांनुसार चीनच्या प्रत्यक्ष नियंत्रण रेषेवरील सततचा संघर्ष आणि भारताच्या पश्चिम आघाडीवर पाकिस्तानचा सततचा लष्करी दबाव यामुळे बिघडत चाललेल्या प्रादेशिक सुरक्षा वातावरणाला तोंड देण्यासाठी ही खरेदी अत्यावश्यक आहे. यामुळे भारतीय वायुसेना, भविष्यातील युद्ध तयारीची योजना कशी आखते तसेच तत्काळ ऑपरेशनल क्षमता आणि त्याच्या अग्निशक्तीवर सार्वभौम नियंत्रण कसे आणते, यामध्ये निर्णायक बदल होईल. या आधी खरेदी केलेल्या ३६ आणि नौसेनेसाठी खरेदी प्रक्रिया सुरू असलेल्या २९ राफेल एफ ३ आर विमानांसंबंधी सांकेतिक आंशिक शब्द स्रोत हस्तांतरासाठी (सोर्स कोड क्सेस ट्रान्स्फर) फ्रान्सने स्पष्ट नकार दिला होता. एकतर्फी अपग्रेडेशनसाठी आवश्यक मिशन एव्हियोनिक्स आणि फ्लाय बाय वायर फ्लाईट कंट्रोल सिस्टिमसाठी हे



ऑपरेशनल सोर्स कोड जरूरी असत/आहे. या हस्तांतर नकारामुळे भारताचे दीर्घकालीन तांत्रिक सार्वभौमत्व, राफेलच्या माध्यमातून जलद हवाई शक्ती विस्तार आणि आत्मनिर्भर भारत या संदर्भात मोठा धोरणात्मक अडथळा निर्माण झाला आहे, असे म्हटल्यास वावगे होणार नाही. आजमितीला रडार फ्यूजन, इलेक्ट्रॉनिक युद्ध, शस्त्र एकत्रीकरण आणि मिशन सिस्टिम नियंत्रित करणाऱ्या सॉफ्टवेअर आर्किटेक्चरचे सोर्स कोड फ्रान्सकडेच आहेत. यामुळे आत्मनिर्भर भारत सिद्धांतांतर्गत लढाऊ प्रणालींवर स्वदेशी नियंत्रण, अपग्रेडेशन मार्ग, ऑपरेशनल चपळता आणि भविष्यातील क्षमता उत्क्रांती या गृहितांना या नकाराचा जबरदस्त हादरा बसला असून भारतीय वायुसेना दीर्घकालीन बाह्य अवलंबित्वांना तोंड देत आहे. हे या पुढे होऊ नये म्हणून आगामी खरेदी करारात राफेल सोर्स कोडची उपलब्धता अनिवार्य करण अपरिहार्य आहे.

राफेल सोर्स कोडची वानवा, विमानाच्या डिजिटल आर्किटेक्चरला भारतीय नियंत्रणाबाहेर ठेवते कारण सेन्सर्स, शस्त्र आणि इलेक्ट्रॉनिक युद्ध प्रणालींना परस्पर संवाद साधण्याची परवानगी देणार तर्कशास्त्र याच सोर्स कोडद्वारे नियंत्रित केले जात. सॉफ्टवेअर केंद्रित हवाई चकमकींमध्ये सॉफ्टवेअर नियंत्रण हे एअर फ्रेम्सवरील नियंत्रणाइतकच निर्णायक असत. स्पर्धात्मक वातावरणात सेन्सर फ्यूजन अल्गोरिदम, इलेक्ट्रॉनिक युद्ध ग्रंथालय, प्राणघातकता आणि डेटा-लिंक टिकून राहण्याची क्षमता अत्यावश्यक असते. सोर्स कोड असल्याशिवाय भारतीय एरोनॉटिकल इंजिनीअर्स या विमानांसाठ; अस्त्र पल्याड दृश्यमान श्रेणीतील (बियाँड व्हिज्युअल रेंज) रुद्रम अँटी रेडिएशन क्षेपणास्त्र आणि भविष्यातील नेटवर्क केंद्रित युद्ध प्रणालीसाठी आवश्यक शस्त्र एकीकरण सार्वभौम सॉफ्टवेअरच अपग्रेडेशन करू शकणार नाही. शिवाय हे करण्यासाठी आपल्याला या सर्वांसाठी वारंवार फ्रान्सची मान्यता मिळण्यास होणारा विलंब आणि त्या अनुषंगाने होणारा अतिरिक्त खर्च सोसावा लागेल. शिवाय सॉफ्टवेअर चालित युद्धाच्या गतिमान युगात अशा प्रकारच तांत्रिक अवलंबित्व अत्यंत धोकादायक असते. परिणामस्वरूप सक्षम सैन्य संरचनेसाठी डिजिटल आर्किटेक्चरवरील भारताचे सार्वभौम नियंत्रण नसलेला विस्तारित राफेल ताफा, दीर्घकालीन तर्क संगततेला अनुरूप नसेल. सोर्स कोड आवश्यक आहे. कारण भविष्यात भारताला राफेल, सुखोई ३० एमके १, तेजस एमके १ ए आणि एएमसीएसारख्या वेगवेगळ्या प्लॅटफॉर्मना एकात्मिक, नेटवर्क-केंद्रित लढाऊ परिसंस्थेत एकत्रित करायचे आहे.

सूत्रांनुसार, १) नवीनतम राफेल विमान खरेदी करारात स्वदेशी सामग्रीचा अंदाजे वापर केवळ ३० टक्के असून यात तंत्रज्ञान हस्तांतरणाची (ट्रान्स्फर ऑफ टेक्नॉलॉजी: टीओटी) वचनबद्धता नाही. मात्र करारानुसार, भविष्यात ऑर्डरच्या ८० टक्के संसाधनांचे स्थानिकीकरण होईल.

२) ॲडव्हान्स्ड मीडियम कॉम्बॅट एअर क्राफ्ट (एएमसीए) चा किमान एक स्क्वॉड्रन वायुसेनेत सामील होईस्तोवर ऑपरेशनल गॅप भरून काढण्यासाठी स्टेल्थ फायटर राफेलची खरेदी; मल्टी-रोल फायटर एअरक्राफ्ट (एमआरएफए) प्रकल्पांतर्गत केल्या जाईल.

३) स्पर्धक लढाऊ विमानांचे मूल्यांकन, राफेलचे संचालन आणि देखभाल करण्यासाठी भारतीय वायुसेनेने आधीच पायाभूत सुविधा, प्रशिक्षण आणि लॉजिस्टिक्सची मोठी गुंतवणूक केली असल्यामुळे अतिरिक्त राफेल्सना आत्मसात करणे सोप असणार आहे.

४) जलद खरेदी आवश्यक आहे. कारण ऑर्डर दिल्यानंतर स्क्वॉड्रनना पूर्ण कार्यरत करणे किंवा पुन्हा वाढविणे ही वर्षानुवर्ष चालणारी दीर्घकालीन प्रक्रिया असते.

५) भारतीय उद्योग जे काही जलद आणि विश्वासार्हपणे तयार करू शकतात ते भारतात बनवले पाहिजे; उर्वरित आयात केले पाहिजे. या करारासाठी फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष मॅक्रॉन यांची फेब्रुवारी २०२६ मध्ये होणारी भारत भेट एक महत्त्वाचा उत्प्रेरक असेल. करारावर एकमत झाल्यानंतर या वर्षाच्या मध्यापर्यंत औपचारिक वाटाघाटी सुरू होतील.

नवीन राफेल स्क्वॉड्रन्स भारताच्या सर्व प्रगत एअर टू एअर आणि एअर टू सर्फेस युद्धसामग्रींनी परिपूर्ण होण्यासाठी त्यांच्यावर एकात्मिकतेसाठी नियोजित हवाई लढाईच्या संपूर्ण स्पेक्ट्रमची शस्त्र प्रणाली असणे अपरिहार्य असेल/आहे. **(पूर्वार्ध)**


(लेखक निवृत्त कर्नल आहेत.)
९४२२१४९८७६

## वेध

**रेवती जोशी-अंधारे**

# अभेद्य लॅबिरिन्थ!

चक्रव्यूहाची रचना, ते भेदण्याचे कौशल्य आणि न भेदणाऱ्याचा अभिमन्यू होणे, या संकल्पना आपण सर्वांनीच महाभारताच्या कथांमध्ये जाणल्या आहेत. सामान्यतः चक्रव्यूहाच्या रचनेशी साधर्म्य सांगणाऱ्या रचना गेल्या काही काळापासून पुरातत्त्व अभ्यासकांना आढळल्या आहेत. त्यांना शास्त्रीय भाषेत लॅबिरिन्थ असे म्हणतात. लॅबिरिन्थचा 'वेध' आज घेण्याचे कारण विशेष आहे. आपल्या देशात सर्वत्र आढळलेल्या लॅबिरिन्थपैकी सर्वात मोठी रचना महाराष्ट्रातील सोलापूरमध्ये सापडली आहे.



सोलापूरजवळच्या बोरामणीत जवळपास ५० फुटांचा व्यास असणारं लॅबिरिन्थ हे अशा प्रकारचं भारतात सापडलेलं सर्वात मोठं वर्तुळाकार लॅबिरिन्थ अथवा चक्रव्यूह आहे. १५ समकेंद्रित वर्तुळांच्या रचनेमुळे ते सर्वाधिक गुंतागुंतीचे लॅबिरिन्थ ठरले आहे. महाराष्ट्रात आतापर्यंत बोरामणीसह १२ तर देशभरात जवळपास ७० लॅबिरिन्थस् सापडलेत. लॅबिरिन्थमध्ये कायम एकच रस्ता असतो. तो सर्वात बाहेरच्या परिघावरून आत केंद्रबिंदूपाशी येतो किंवा केंद्रापासून शेवटापर्यंत जातो. ही रचना भारतीय तत्त्वज्ञानाशी जवळीक सांगणारी आहे. जगभरात सापडलेली बहुतांश लॅबिरिन्थ ही वर्तुळाकार असली, तरी तामिळनाडूत गोदीमेडू इथं ५६ फूट रुंदीचं एक आयाताकृती लॅबिरिन्थही सापडलं आहे. सहज बघितलं तर ती एकावर एक अशी अनेक वर्तुळांची अथवा भौमितीय आकारांची रचना आहे. काही दगडांनी घडवलेली तर काही ठिकाणी ती खडकांवर, भिंतीवर आणि नाण्यांवरही कोरलेली आहे. अनेक ठिकाणी देवळं किंवा कॅथेड्रलसारख्या धार्मिक स्थळांवर कोरलेली अथवा चित्रित केलेलीही सापडतात.

जेफ सवार्ड नावाचे संशोधक गेल्या पाच दशकांपासून जगभरातल्या लॅबिरिन्थस्‌चा अभ्यास करीत आहेत. लॅबिरिन्थस् हजारो वर्षांपासून सर्वत्र असली, तरी अगदी अलिकडे त्यांचा अभ्यास सुरू झाला आहे. भारतातही अभ्यासकांनी तशा नोंदी करणं सुरू केलं आहे. कर्नाटकात विजापूरमध्ये मातीत रोवलेल्या दगडांची अशीच गूढ रचना सापडली आहे. गोव्यामध्ये उसळाई माळ इथं दगडांमध्ये कोरलेलं लॅबिरिन्थ पाहायला मिळतं, जे कातळशिल्पांच्या समूहात आहे. आंध्र प्रदेशात अप्पर गोदावरी जिल्ह्यात पाषाणात कोरलेले तर सम्राट अशोकांच्या काळातील स्तंभांवरही लॅबिरिन्थ सापडलेत. पश्चिम बंगालमध्ये लॅबिरिन्थला यमद्वार म्हणजे मुक्तीचा मार्ग, असे म्हटले जाते.

लॅबिरिन्थ रचना उत्तर भारतात सापडल्या असल्या तरी आतापर्यंत सर्वाधिक लॅबिरिन्थ दक्षिण भारतात सापडले असून त्यांची संख्या ३० ते ३५ आहे.

ॲरिझोना, आईसलँड, आर्क्टिक रशिया, संपूर्ण युरोप, उत्तर आफ्रिका आणि आशियापर्यंत लॅबिरिन्थ सापडतात. विशेषतः भारत, श्रीलंका, पाकिस्तान, नेपाळ आणि इंडोनेशियातील सुमात्रा आणि जावामध्येही या गूढ रचना आहेत. त्यांना त्या-त्या भागात विविध दंतकथाही चिकटल्या आहेत. एक बाब मात्र या सगळ्यांना जोडते की, ही सगळी अशा ठिकाणी सापडली आहेत जिथून इतिहासकालीन व्यापारी मार्ग जात होते. त्यामुळेच भारताच्या पश्चिम तटाशी विशेषतः युरोपातील रोमन आणि ग्रीक साम्राज्यांशी असलेल्या व्यापाराचा लॅबिरिन्थच्या कल्पनेचा भारतापर्यंत प्रवास करण्याशी संबंध असावा, अशी शक्यता अभ्यासकांना वाटते. सम्राट ऑगस्टसने विविध प्रकारच्या पौराणिक गोष्टी असलेली नाण्यांची एक मालिका जारी केली होती. त्यापैकी एकावर लॅबिरिन्थ कोरलेले आहे. त्या नाण्यांच्या मागील बाजूस, भारतात आढळणाऱ्या चक्रव्यूहांसारखीच हुबेहूब रचना आहे. व्यापारादरम्यान त्यापैकी काही नाणी भारतात पोहोचली असतील. आता धाराशिव जिल्ह्यात असलेलं तगर म्हणजे आजचं तेर इथं रोमन साम्राज्याशी असलेल्या व्यापाराचे पुरावे अतिशय ठळकपणे सापडले आहेत. बोरामणीच्या लॅबिरिन्थपासून तेर हे साधारण ५० किलोमीटर अंतरावर आहे, हे उल्लेखनीय!

असेच संदर्भ आताचा नालासोपारा आणि तत्कालीन शुपरका, राजापूरचे बंदर, जुन्नर, नाशिकमार्गे पैठण अथवा प्रतिष्ठान या व्यापारी केंद्रांपर्यंत सापडतात. संशोधकांनी पहिली ११ लॅबिरिन्थस् सांगली आणि कोल्हापूर जिल्ह्यांमध्ये शोधली असून ती कदाचित रस्ता निश्चित करण्यासाठी कोरलेली असावीत. सरळ समोर फारसं काही दिसत नाही. एकदम उंच भाग आहे किंवा दुसरीकडे सखल प्रदेश आहे. त्यामुळे ज्या ठिकाणी गोंधळ होतो आहे, तिथे लॅबिरिन्थस् आहेत. दिशादर्शनासाठी व्यापारी मार्गावर ही वर्तुळं असावीत. लॅबिरिन्थस् कोणी केली? ती सर्वत्र एकसारखी कशी आहेत? ती करण्यामागचं कारण काय? असे असंख्य प्रश्न आहेत. या प्रश्नांच्या उत्तरांना अधिक पुरातत्त्वीय संशोधनाशिवाय पर्याय नाही.

९८५०३३९२४०

## प्रासंगिक

# आमचे हिरो अन् आजचे झीरो

**विजय पांढरीपांडे**

आमची पिढी खरेच श्रीमंत होती. आमच्यापुढे चांगले आदर्श होते. एकाहून एक राष्ट्रभक्त, विचारवंत हिरो होते. स्वातंत्र्याच्या चळवळीचे ज्वलंत वैचारिक पाठबळ मागे होते. छत्रपती शिवाजी महाराज, संभाजी महाराज, राणा प्रताप, राणी लक्ष्मीबाई यांच्या राष्ट्र प्रथम, बाकी सगळे दुय्यम या निष्ठेचे पाठबळ होते. स्वातंत्र्यासाठी आपापल्या परीने योगदान दिलेले महात्मा गांधी, सुभाषचंद्र बोस, लाल, बाल, पाल, स्वातंत्र्यवीर सावरकर, शाहू, फुले, डॉ. आंबेडकर अशा एकाहून एक थोर माहात्म्यांच्या विचारधारेत आम्ही चिंब भिजलो होतो वेळोवेळी. या सर्वांचे विचार, वेगवेगळे असले तरी त्यांच्यासाठी देशाचे हित हीच प्राथमिकता होती. तीही माणसेच होती. त्यांनीही चुका केल्या असतील किंवा ती त्यावेळची, परिस्थितीची गरजही असेल कदाचित. पण एक निश्चित, त्यांनी आपला स्वार्थ साधला नाही. ते आपल्या मताशी, विचारधारेशी ठाम राहिले शेवटपर्यंत. अगदी भिन्न विचारधारेचे नेते एकत्र बसून एक दुसऱ्याचे ऐकून घेत त्यातून सुवर्णमध्य शोधीत असत. कारण त्यांचे वैचारिक मार्ग भिन्न असले तरी गंतव्य स्थान एक होते. अंतिम लक्ष्य एक होते. देश प्रथम, बाकी सगळे दुय्यम! हीच समान विचारधारा होती.

हळूहळू सगळेच बदलले. एका पाठोपाठ दशके बदलली. शतक बदलले. इंडस्ट्री युग, तांत्रिक युग अन् काय काय आले. सगळेच नावीन्याने भुरळ घालणारे. मोहित करणारे. आपल्या नंतरच्या पिढ्या त्या मोहजालात फसत गेल्या. वाहवत गेल्या. आदर्श मागे पडले. क्षणिक सुख पुढे आले. प्रत्येकाला घाई झाली पुढे जाण्याची. कुठे जायचे माहीत नाही. कशासाठी जायचे माहीत नाही. बरोबर कोण माहीत नाही. असा सगळा संभ्रम. या पिढीला जेन झी म्हणतात. हा शब्द कुठून आला, कसा आला मला माहिती नाही. झेड हे इंग्रजी वर्णमालेतले शेवटचे अक्षर. म्हणजे पुढे काहीच नाही. ध्येय, दिशा काहीच नाही. सगळेच भरकटल्यासारखे. दाट धुक्यात वाट हरवल्यासारखे. उद्देशहीन वाटचाल. आपल्याला नेमके कुठे जायचे आहे, तिथेच का जायचे आहे, आपल्याला नेमके काय हवे आहे, कशासाठी हवे आहे, काहीच स्पष्ट कल्पना नाही. फक्त हवे आहे ही भावना, सुप्त आकांक्षा. तेही झटपट हवे आहे. वाट पाहण्याची तयारी नाही. परिश्रम करण्याची जिद्द नाही. शिवाय प्रत्येकाचे वर्तुळ छोटेसे, आक्रसलेले. त्यात इतर कुणाला प्रवेश नाही. प्रत्येकाला म्हणे ज्याची त्याची/तिची स्पेस हवी आहे. फक्त वाद, संवाद नको आहे. स्वतःचेच घोडे पुढे दामटायचे आहे. त्यात अवती भवती चांगल्या, आदर्श माणसांचा दुष्काळ आहे. पूर्वीसारखे ज्यांना हिरो म्हणता येईल असे कुणी दिसतच नाही. सगळे स्वार्थी. आपापल्या विश्वात दंग, मस्त. ज्यांना आपण लोकप्रतिनिधी म्हणून निवडून देतो त्यांच्याबद्दल तर विचारायलाच नको. ते स्वतःला आपले पुढारी म्हणवतात. त्यांच्या हातात सत्ता आहे, सरकार आहे. पण त्यांची योग्यता काय? ते आज इथे, उद्या तिथे. खरे तर आज कोण नेमका कुठे हेच कळेनासे झाले आहे. त्यांना गणित येत नाही. पण नंबर गेम येतो! त्यांची सगळी धडपड त्या विशिष्ट नंबर गेमसाठी असते. प्रत्येक पक्षाची एक विचारधारा असते म्हणे. पण ती कागदावर. ते तत्त्व, ते विचार फक्त भाषणबाजीसाठी. आज ज्याला शिव्या दिल्या त्याच्याच गळ्यात गळा घालून उद्या ते नाचतील. आज ज्याच्यावर भ्रष्टाचाराचे आरोप तोच उद्या कुंपण ओलांडून इकडे आला की पदरी पडून पवित्र होतो! इथे कुणीच कुणाचा कायमचा मित्र नाही. कायमचा शत्रू नाही. सगळे संधिसाधू.

हे कसले हिरो? यांना तर आदर्श कशाशी खातात हेही माहिती नाही. त्यांचे घोटाळे मात्र आदर्श! सगळ्यांच्या करामती एक से बढकर एक! जे लोकशाहीचे मंदिर मानले जाते त्या लोकसभेत, राज्यसभेत, विधानसभेत यांचे वर्तन बघा. शाळेतील मुले कधी इतका गोंधळ करीत नाहीत. ते पीठासीन अधिकाऱ्याच्या म्हणजे मास्तरच्या अंगावर धावून जात नाहीत. हे तर फक्त आरडाओरडा करतात तिथे. गलिच्छ भाषेत आरोप करतात एकमेकांवर. यांना आपणच निवडून दिलेले असते आपले अमूल्य मत देऊन. आपल्यासाठी चांगले कायदे करणे, त्याची नीट अंमलबजावणी करणे, आपल्या सर्वांच्या हिताच्या योजना आखणे, त्याची नीट अंमलबजावणी होतेय की नाही ते बघणे, हे यांचे कर्तव्य. पण हे आजच्या पिढीचे हिरो (झीरो) करतात काय प्रत्यक्षात? आपल्या पिढ्यान् पिढ्यांची सोय होईल असा भ्रष्टाचार करतात दिवसाढवळ्या! सर्वांच्या देखत. सर्वांना सर्व माहिती असूनही सर्व मूग गिळून चूप बसलेले असतात. कारण हे सगळे एकाच माळेचे मणी असतात. सगळ्यांची सगळ्या पापात भागीदारी असते. त्यासाठीच तर त्यांना सत्ता हवी असते. समाजसेवा वगैरे बोलण्याच्या गोष्टी. त्यांच्या खोट्या आश्वासनांना बळी पडणारे आपणही तितकेच दोषी. त्यांची गुंडगिरी, त्यांचा दिवसाढवळ्या चाललेला भ्रष्टाचार सहन करणारे आपण, लोकशाहीचे पाईक देखील तितकेच दोषी. किंबहुना जास्त दोषी. कारण आपण अशा गुंड बाहुबलींना निवडून देतो. त्यांच्या कुकर्माला खतपाणी घालतो. या झीरो हिरोंना हाताशी धरून आपणही आपली कामे करून घेतो. आपली पोळी भाजून घेतो. ती खरे तर एकप्रकारे त्यांच्या भ्रष्टाचारात आपली भागीदारीच असते. आपल्यालाही त्यांच्यासारखे बेगडी हिरो व्हायचे असते. आपलाही स्वार्थ साधायचा असतो. 'सब पंछी एक डालके...' अशी परिस्थिती.

केवळ राजकीय क्षेत्रातच नव्हे तर सामाजिक, सांस्कृतिक, नाट्य, सिनेमा, कला अशा सर्वच क्षेत्रांत अशी बजबजपुरी माजली आहे. जुने सिनेमे बघा, त्यातल्या नूतन, मीना कुमारीसारख्या नट्या आठवून बघा. राजा परांजपे, गदिमा, पुल यांचा काळ आठवून बघा. आजचे चित्रपट, आजच्या सीरिअल्स बघवत नाहीत. पण आजचे झीरो हिरो करोडोने कमावताहेत. जेन झीला जे हवे तेच वाढताहेत ताटात. सगळीकडे आनंदी आनंद आहे. आता आपण नव्याने विचार करण्याची गरज आहे. ज्याला आपण प्रगती म्हणतो ती खरेच प्रगती आहे की अधोगतीकडे वाटचाल? आपण सुख, शांतीकडे वाटचाल करतोय की युद्धाच्या, द्वेष, मत्सर, जाती, धर्म, भेद यांनी दूषित केलेल्या क्षितिजाकडे जातो आहोत? फसवी आमिषे, नाटकी चेहरे, खोटे आभासी संभ्रमित भविष्य अन् त्या वाटचालीवर आपले नेतृत्व करणारे बेगडी झीरो हिरो! सगळेच हास्यास्पद आहे. अचंबित करणारे आहे. गोंधळात टाकणारे, संभम वाढवणारे आहे. आपण या मोहजालातून जितके लवकर बाहेर पडू, जितक्या वेगाने सतर्क होऊन नवी वाट शोधू तितके बरे. एरवी जेन झीचे काही खरे नाही!

७६५९०८४५५५

### वाहतूक नियम पाळणाऱ्यांना प्रशासनाने प्रोत्साहन द्यावे

एआय कॅमेऱ्याच्या माध्यमातून वाहतूक नियंत्रण आणि नियम मोडणाऱ्या वाहन चालकांवर कारवाई होणार, अशी व्यवस्था होणार असल्याची बातमी वाचाली. त्याबद्दल काही नकारात्मक प्रतिक्रिया आल्या. आधी नवीन नंबर प्लेट, आता एआय चलित कॅमेरे प्रत्येक चौकात. त्याची सुरुवात नागपुरातून होणार आणि अगदी छोटीशीही चूक अनवधानाने जरी झाली तरी आपल्या मोबाईलवर लगेच फोटोसह चालानचा संदेश येणार या कल्पनेने अनेक धास्तावले. हेल्मेट हवे, बेल्ट हवा, स्पीड नको, जुनी गाडी नको हे सर्व फार जाचक आहे, अशी भावना व्यक्त होऊ लागली. परदेशातील आधुनिक व्यवस्था आपल्याकडे येणार म्हटल्यावर अनेकांना सर्वांत आधी धडकी भरते. वास्तविक वाहतुकीचे नियम मोडणाऱ्यांना एआय कॅमेऱ्याच्या मदतीने धडा शिकविण्याची व्यवस्था करण्याचा अभिनव प्रयोग काही महिन्यांपूर्वी पुणे पोलिसांनी केल्याच्या बातम्या वृत्तपत्रात आल्या आहेत. आपण मात्र सगळी संक्रांत केवळ आपल्यावरच आली आहे, अशा पद्धतीने ओरड करतो. प्रथमदर्शनी अडचणीचे वाटतात म्हणून या तंत्रज्ञानासह येणाऱ्या नव्या नियमांना लगेच विरोध करण्याऐवजी याच तंत्रज्ञानाचा वापर करून त्यातून काय चांगले करता येऊ शकेल याबद्दल आपण काही सूचना करू शकतो का, याचा विचार व्हायला हवा. एआय कॅमेऱ्यामुळे लहानातला लहान नियम तोडणारे सहज ओळखता येऊ शकतात. नियमितपणे नियम पाळणाऱ्यांचा रेकॉर्डही सहज उपलब्ध होऊ शकतो. नियम मोडल्याबद्दल जसा दंड आहे, त्याच प्रकारे नियम पाळणाऱ्याला क्रेडिट पॉईंट्स देऊन नियम पालनाला प्रोत्साहन दिले जाऊ शकते. शंभर क्रेडिट पॉईटस् जमा असणाऱ्या व्यक्तीने एखाद्या अपवादात्मक परिस्थितीत किंवा अनावधानाने नियम मोडला तर त्याला या क्रेडिट पॉईंट्स आधारे दंडातून सूट देण्याची तरतूद कायद्यात केली जाऊ शकते. त्यासाठी आपल्या सरकारकडे आग्रह धरता येईल. काही महिन्यांपूर्वी नागपुरातील काही सिग्नलवर अशी व्यवस्था करण्यात आल्याचे ऐकिवात होते. त्या व्यवस्थेचा काय सकारात्मक परिणाम झाला आहे याचाही धांडोळा घेतला गेला पाहिजे.

**प्रसाद दत्तात्रेय पोफळी** /महाल, नागपूर

## वाचक पत्रे

### 'डेज'मुळे संस्कृती, मूल्यांशी दुरावा

फेब्रुवारी महिना सुरू झाला की तरुणांना वेध लागतात ते वेगवेगळे डेज साजरे करण्याचे. त्यासाठी ते जय्यत तयारीही करतात. रोझ डेपासून सुरू झालेला डेजचा हा महोत्सव व्हॅलेंटाईन डे ला संपतो. या दरम्यान प्रपोज डे, टेडी डे, प्रॉमिस डे , चॉकलेट डे, टेडी डे, हग डे, किस डे असे विविध प्रकाराचे डे येतात. डेजचा हा महोत्सव आठवडाभर चालतो. तरुण वर्ग विशेषतः महाविद्यालयीन तरुण हे डेज साजरे करण्यात आघाडीवर असतात. आजच्या सोशल मीडियाच्या युगात डेजचे तर पेवच फुटले आहे. व्हॅलेंटाईन डे, फ्रेंडशिप डे, फादर्स डे, मदर्स डे, ब्रदर डे, सिस्टर डे, डॉक्टर्स डे, वकील डे, इंजिनीयर्स डे असे कितीतरी डे येतात. एका वर्षात किती डे येतात आणि जातात याची गणनाच नाही. अति झाले नि हसू आले अशी गत या डेजची झाली आहे. सोशल मीडियावर ॲक्टिव्ह राहणाऱ्यांसाठी तर हे डेज म्हणजे पर्वणीच असते. वेगवेगळ्या डेजच्या शुभेच्छा देणाऱ्यांच्या पोस्टवर लाईक, कमेंट आणि शेअरचा पाऊस पडत असतो. वर्षभर कधी आई-वडिलांप्रति प्रेम, आदर व्यक्त न करणारे मदर्स डे, फादर्स डे ला खूप सक्रिय असतात. जन्मदात्या आई-वडिलांसाठी, त्यांच्या आठवणींसाठी, त्यांच्यावर प्रेम करण्यासाठी, त्यांच्याप्रति आदर व्यक्त करण्यासाठी मदर्स डे, फादर्स डेची वाट पाहण्याची वेळ तरुणांवर आली आहे. हे डेज म्हणजे नैतिकतेचे अवमूल्यन आहे. कोणतेही डे साजरे करण्यापूर्वी खरोखरच या डेजची आवश्यकता आहे का, असा प्रश्न प्रत्येकाने स्वतःला विचारायला हवा. आधुनिकतेच्या नावाखाली पाश्चात्त्यांचे अंधानुकरण केल्यामुळे आपल्या मूळ संस्कृतीशी आणि मूल्यांशी दुरावा निर्माण होत आहे, हे मात्र नक्की!

**श्याम ठाणेदार**/९९२२५४६२९५

### इतर पक्षांनी भाजपाकडून धडा घ्यावा

'भाजपच्या संघटनेचे यश' हा अग्रलेख भाजपाच्या संघटन कौशल्याचे योग्य कौतुक करणारा आहे. आता महाराष्ट्रात सर्वत्र भाजपने यश मिळवले आहे आणि तो फक्त शहरी लोकांचा पक्ष राहिला नाही हे सिद्ध केले आहे. त्यासाठी तळागाळातील कार्यकर्त्यांपासून ते मोठ्या नेत्यांपर्यंत सर्वांनी समान कष्ट केले आहेत. मग ते बुथ पातळीवरील लोकसंपर्क असो वा विविध पक्षांना सोबत घेणे असो. सर्वांनी जीव तोडून प्रयत्न केले आणि त्याचे फळ आता दिसत आहे. भाजपातील कार्यकर्ते आणि नेते यांच्यात संवाद असतो आणि वरच्या फळीतील नेत्यांनी घेतलेला निर्णय मान्य करण्याची मानसिकता असते. इतर पक्षांनी फक्त मोदींवर टीका करत राहण्यापेक्षा जर भाजप का व कसा जिंकतो याचे निरीक्षण करून स्वतःमध्ये बदल केला तर त्यांनाच उपयोग होईल. शेवटी संघटना महत्त्वाची असते आणि तिच्यासाठीच काम करायचे असते हे भाजपाच्या कार्यकर्त्यांना पटलेले आहे.

**माया हेमंत भाटकर**/९८६९०७४४९९

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच <u>कुठलाही लेख</u> पाठवायचा असल्यास **९८५०७५३२८१** या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८
RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

## करून बोगस विक्री करणाऱ्याची तक्रार करण्याचे आवाहन

बीड, दि. १२ : कृषी विभाग शेतकऱ्यांच्या हितासाठी कटिबद्ध असून,युरिया खताची जादा दराने,लिंकिंग करून किंवा बोगस विक्री करणाऱ्या कृषी निविष्ठा विक्री केंद्रावर कठोर कारवाई करण्यात येईल. जिल्ह्यात युरिया खताची जादा दराने व लिंकिंग करून विक्री झाल्यास तक्रार करण्याचे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी, एस.एम.साळवे यांनी केले आहे.

खत विक्रेत्यांकडून युरियाची साठेबाजी, जादा दराने विक्री, लिंकिंग तसेच बोगस खत विक्री केल्याचे आढळून आल्यास संबंधितांवर कठोर कायदेशीर कारवाई करण्यात येणार असल्याचे कृषी विभागाने स्पष्ट केले आहे. शेतकऱ्यांनी खत खरेदी करताना पावती घेणे बंधनकारक असून, कोणतीही अनियमितता आढळल्यास तात्काळ तक्रार

### पशुपालकांना अनुदान व कर्जावरील व्याजदर आता कृषी प्रमाणे मिळणार; मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत उद्या होणार मुख्य समारंभ

# राष्ट्रीय स्तरावरील ऐतिहासिक 'महा पशुधन एक्सपो'चे परळीत शानदार उद्‌घाटन

## महा पशुधन एक्सपोतून ग्रामीण तरूणांना उद्योजक बनण्याची संधी - पंकजाताई मुंडेंचे तरूणांना आवाहन

**तभा वृत्तसेवा**

परळी वैजनाथ दि. १२..

महाराष्ट्र हे पशुसंवर्धनाला कृषीचा दर्जा देणारे पहिले राज्य ठरलेले आहे. आपले अनुकरण आता देशातील अनेक राज्ये करत आहेत. पशुसंवर्धनासाठी तीन लाखांपर्यंत व्याजावर अनुदान, सौर ऊर्जेसाठी सबसिडी, वीज बिलात सवलत अशा अनेक सुविधा उपलब्ध होतील. पशुसंवर्धनातून उन्नती हे ध्येय निश्चित करून अधिकाधिक रोजगार निर्मिती करण्याच्या दृष्टीने अनेक योजना पशुसंवर्धन विभागाच्या वतीने कार्यान्वित करत आहोत. हा एक्सपो ग्रामीण तरूणांना उद्योजक बनण्याची एक संधी असून प्रत्येकानं प्रदर्शनाला भेट देऊन माहिती घ्यावी आणि पशुपालनाच्या उद्योगासाठी सज्ज व्हावे असे आवाहन राज्याच्या पशुसंवर्धन व पर्यावरण मंत्री ना पंकजाताई मुंडे यांनी आज येथे केले.

महाराष्ट्र शासनाच्या पशुसंवर्धन विभागाच्या वतीने राष्ट्रीय स्तरावरील तीन दिवसीय ऐतिहासिक 'महापशुधन एक्सपो'चे उद्घाटन ना. पंकजाताई मुंडे यांच्या हस्ते आज वैद्यनाथ महाविद्यालया समोरील ओपळे मैदानावर मोठ्या उत्साहात पार पडले, त्यावेळी त्या बोलत होत्या. माजी मंत्री आ. धनंजय मुंडे, नगराध्यक्षा पद्मश्रीताई धर्माधिकारी, पशुसंवर्धन विभागाचे सचिव डॉ. रामास्वामी, पशुसंवर्धन आयुक्त




डॉ.प्रवीण कुमार देवरे,अतिरिक्त आयुक्त डॉ. मुकणे, जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, पशुविज्ञान विद्यापीठाचे कुलगुरू डॉ नितीन पाटील आदी यावेळी उपस्थित होते.

याप्रसंगी बोलताना पंकजाताई म्हणाल्या, मी ग्रामविकास मंत्री, बीडची पालकमंत्री असताना बीड जिल्ह्यामध्ये जो निधी कधी कोणाला माहिती नव्हता अशा २५ १५ निधीतून प्रत्येक गावात मोठ्या प्रमाणावर कामे केली. मुख्यमंत्री ग्रामसडक योजना, जलयुक्त शिवार, जिल्हा परिषद, पंचायत समित्यांच्या इमारती उभ्या केल्या. माझा जिल्हा दुष्काळी आहे, मागासलेला आहे असे म्हणून स्वस्थ बसून चालणार नाही तर याउलट लोकांसाठी कामे करण्याची मोठी संधी आपण यातुन बघितली पाहिजे. त्यादृष्टीनेच पशुसंवर्धन मंत्री झाल्यानंतर पहिल्यांदा आपण या ठिकाणी साडे पाचशे कोटीचे पशुवैद्यकीय महाविद्यालय मंजूर केले.

### मुंडे साहेबांची उणीव अन् अजितदादांची आठवण..

प्रत्येक कार्यक्रमात लोकनेते मुंडे साहेबांची उणीव आम्हाला जाणवते. ही त्यांची जन्मभूमी आणि कर्मभूमी आहे. त्यांचे स्मरण आपल्याला सदैव होत असते, त्याच पद्धतीने आज आपल्या बीड जिल्ह्याला विकासाच्या नव्या दिशेने घेऊन जाणारे राज्याचे उपमुख्यमंत्री व आपले पालकमंत्री अजितदादा पवार यांच्या अकाली जाण्याने मोठी पोकळी निर्माण झाली आहे. आज महा पशुधन एक्सपो बघण्यासाठी अजितदादा असते तर त्यांनी अनेक महत्त्वपूर्ण सूचना केल्या असत्या आणि कौतुकही केले असते. तर मुंडे साहेब असते तर हे सर्व मला करावेच लागले नसते, त्यांनीच हे केले असते. परंतु दुःखाच्या प्रसंगांवर पाय देत पुढे जाण्याचे बळ ईश्वर देतो. लोकांसाठी केलेली कामेच खऱ्या अर्थाने कामी येतात. त्याच मार्गावर लोकहिताची कामे आपल्या हातून घडावी असा आपला सातत्याने प्रयत्न असल्याचे ना पंकजाताई मुंडे यावेळी म्हणाल्या.

# उपकेंद्रात १० MVA क्षमतेचे रोहित्र तात्काळ बसवा ;अन्यथा बेमुदत ठिय्या आंदोलन

## क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष कुलदीप करपे यांचा महावितरणला इशारा !

**तभा वृत्तसेवा**

केज /प्रतिनिधी

तालुक्यातील होळ ३३ के.व्ही. विद्युत उपकेंद्रातुन,होळ, लाडेगाव , दिपेवडगाव ,लाडेवडगाव ,मुलेगाव ता. केज येथील शेतकऱ्यांना शेती साठी वीज पुरवठा दिला जातो. मात्र सद्यस्थितीत होळ ३३के.व्ही. वीज उपकेंद्रातुन क्षमतेपेक्षा अधिक वीजेची मागणी असुन वरिल गावातील जवळपास सर्वच फिडर वरील रोहित्रातुन कमी दाबाने व अनियमिततेने शेतकऱ्यांना तब्बल ३० तास व काही फिडर वर ३६ तासानंतर फक्त ६ तास वीजपुरवठा दिला जात आहे .यामुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे भिजवणे होत नसून पिके वाळून जात आहेत . या सर्वच गावातील शेतकऱ्यांना उच्च दाबाने दिवसा आठ तास वीज देण्याच्या मागणीसाठी क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष कुलदिप करपे यांच्या नेतृत्वाखाली शेतकऱ्यांच्या वतीने होळ ३३ के.व्ही. उपकेंद्र कनिष्ट अभियंता कार्यालयासमोर दि.११डिसेंबर २०२५ रोजी ठिय्या आंदोलन करण्यात आले होते . तेंव्हा महावितरण अधिकाऱ्यांनी लेखी दिलेल्या लेखी



आश्वासनुसार सदर आंदोलन स्थगित करण्यात आले होते या पत्रातील आश्वासनानुसार होळी विद्युत ३३के. व्ही वीज उपकेंद्रात १०MVA क्षमतेचे रोहित्र बसवून वीजपुरवठा उच्च दाबाने सर्व कृषि ग्राहकांना पुरवठा करणे आवश्यक होते मात्र अद्यापही रोहित्र न बसवल्याने क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष कुलदीप करपे यांनी शुक्रवार दि.२० फेब्रुवारी २०२६ पासुन बेमुदत ठिय्या आंदोलन छेडण्याचा इशारा बीड येथील महावितरण च्या मंडळाचे अधीक्षक अभियंता श्री. प्रेमसिंग राजपूत यांना निवेदनाद्वारे बुधवारी दि.११रोजी प्रत्यक्ष भेटून दिला आहे.

# तहसीलदार शेळके यांचा शेतकऱ्यांशी मुक्त संवाद

## घाटसावळीत लोकाभिमुख बैठकीत प्रश्नांवर जागेवर तोडगे

**तभा वृत्तसेवा**

गोरक्षनाथ टेकडी ( घाटसावळी ) येथे आयोजित करण्यात आलेली महसूल मंडळस्तरीय आढावा बैठक केवळ औपचारिकता न राहता , थेट नागरिकांच्या प्रश्नांना हात घालणारी आणि ' शासन आपल्या दारी ' या संकल्पनेला मूर्त रूप देणारी लोकाभिमुख संवादसभा ठरली . बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या या बैठकीत प्रशासन आणि नागरिक यांच्यातील अंतर लक्षणीयरीत्या कमी झाल्याचे चित्र दिसून आले .

राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली महसूल विभाग अधिक गतिमान , पारदर्शक आणि लोकाभिमुख करण्यासाठी सातत्याने प्रयत्न



सुरू आहेत . छत्रपती संभाजीनगर विभागाचे विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांच्या नियमित आढावा बैठका , तपासणी दौरे आणि स्पष्ट सूचनांमुळे प्रशासनाच्या कार्यक्षमतेला नवी दिशा मिळाल्याचे या बैठकीत जाणवले .

जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन , अपर जिल्हाधिकारी हरीश धार्मिक , उपविभागीय अधिकारी कविता जाधव तसेच निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा प्रशासन अधिक कार्यक्षम , पारदर्शक आणि नागरिकाभिमुख करण्यासाठी विविध उपक्रम प्रभावीपणे राबवले जात असल्याचे अधोरेखित करण्यात आले . प्रशासन केवळ नियमांची अंमलबजावणी करणारी यंत्रणा न राहता , समाजाच्या संवेदनशील प्रश्नांवर सक्रिय भूमिका घेणारी व्यवस्था बनावी , या दृष्टीने निर्णय घेतले जात असल्याचे स्पष्ट झाले .

बैठकीत अतिवृष्टीमुळे झालेल्या पिक नुकसानीबाबत अनुदान , ई-पीक नोंदणी , ई-पीक पाहणी , नुकसानभरपाईसाठी आवश्यक कागदपत्रे , आधार कार्ड अद्ययावत ठेवण्याची आवश्यकता तसेच थेट लाभ योजनांचा लाभ घेण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले . तहसीलदार शेळके यांनी शेतकऱ्यांच्या अडचणी शांतपणे ऐकून घेत प्रत्यक्ष मार्गदर्शन केले .

विशेष म्हणजे , तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी दिवसभरात केंद्रीय समितीसोबत दौरा पूर्ण केल्यानंतरही शेतकऱ्यांच्या अडीअडचणी जाणून घेण्यासाठी ही बैठक घेतली . दिवस संपला तरी कर्तव्य संपत नाही , ही भावना त्यांच्या कार्यपद्धतीतून दिसून आली . " सेवा हीच साधना " या म्हणीप्रमाणे त्यांनी शेतकऱ्यांशी थेट संवाद साधत प्रश्न सोडवण्याचा प्रयत्न केला .

सामाजिक विषयांवरही बैठकीत विशेष भर देण्यात आला . बालविवाह रोखण्यासाठी गावपातळीवर जनजागृती , शाळा-महाविद्यालयांत समुपदेशन , ग्रामपंचायत आणि पोलीस यंत्रणेच्या समन्वयातून प्रतिबंधात्मक उपाययोजना राबविण्याचे आवाहन करण्यात आले . " जशी करणी तशी भरणी " या म्हणीचा दाखला देत समाजातील कुप्रथा रोखण्यासाठी सर्वांनी पुढाकार घ्यावा , असे शेळके यांनी स्पष्टपणे सांगितले .

पर्यावरण संवर्धनासाठी वृक्षारोपण , जलसंधारण , प्लास्टिकमुक्त अभियान आणि नैसर्गिक साधनसंपत्तीच्या जतनासाठी प्रशासनाकडून ठोस पावले उचलली जात असल्याचे

# हिवाळी परीक्षा 2025 व IDSSA विभागीय वॉलीबॉल स्पर्धेत ईगलवूड पॉलिटेक्निकचे यश

**तभा वृत्तसेवा**

माजलगाव / प्रतिनिधी

माजलगाव येथील ईगलवूड पॉलिटेक्निक इन्स्टिट्यूटने शैक्षणिक व क्रीडा या दोन्ही क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी करत संस्थेच्या नावलौकिकात मानाचा तुरा रोवला आहे. हिवाळी परीक्षा २०२५ मध्ये विद्यार्थ्यांनी उज्ज्वल यश संपादन केले असून, IDSSA अंतर्गत झालेल्या विभागीय आंतरमहाविद्यालयीन वॉलीबॉल स्पर्धेतही दमदार कामगिरी नोंदवली आहे.

हिवाळी परीक्षा २०२५ मध्ये महाविद्यालयाचा निकाल अत्यंत



समाधानकारक लागला असून सर्व विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट यश मिळवले आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता (Artificial Intelligence) शाखेतील धनावडे ऋतुजा हिने ८८.७१% गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकावला. विशेष म्हणजे तिने गणित विषयात १०० पैकी १०० गुण मिळवून नवा उच्चांक प्रस्थापित केला आहे. कॉम्प्युटर इंजिनिअरिंग शाखेतील मदने आरती हिने ८८% गुण मिळवत उल्लेखनीय यश संपादन केले. इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग शाखेतील प्रगती मेंडके हिने ८०.९४% गुण मिळवले, तर सिव्हिल इंजिनिअरिंग शाखेतील जयवर्धन सोनवणे याने ८१.११% गुणांसह यश मिळवले.

शैक्षणिक यशासोबतच क्रीडा क्षेत्रातही ईगलवूड पॉलिटेक्निकने आपली ताकद दाखवून दिली. IDSSA विभागीय वॉलीबॉल स्पर्धेत मुलींच्या संघाने उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत प्रथम क्रमांक पटकावला, तर मुलांच्या संघाने जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर द्वितीय क्रमांक मिळवला. मुलींच्या संघाने संपूर्ण स्पर्धेत शिस्त, संघभावना आणि अचूक समन्वय राखत प्रत्येक सामन्यात वर्चस्व गाजवले. अंतिम सामन्यातील चुरशीच्या लढतीत त्यांनी विजेतेपदावर आपले नाव कोरले. मुलांच्या संघानेही कठीण प्रतिस्पर्ध्यांविरुद्ध संघर्षमय खेळ करत अंतिम फेरीपर्यंत मजल मारली आणि उपविजेतेपद पटकावले.

या दुहेरी यशाबद्दल संस्थेच्या अध्यक्षा डॉ.अर्चना पवार, सचिव डॉ.शरद पवार, कोषाध्यक्ष डॉ.सुशील लोढा, प्राचार्य प्रतीक वेळापुरे, क्रीडा शिक्षक सुलतान सर तसेच सर्व प्राध्यापक व शिक्षकवृंदांनी विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले. विद्यार्थ्यांच्या या सर्वांगीण यशामुळे ईगलवूड पॉलिटेक्निक इन्स्टिट्यूटमधील शैक्षणिक गुणवत्ता आणि क्रीडा संस्कृती अधिक बळकट होत असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले.

# दीनदयाळ उपाध्याय यांची पुण्यतिथी साजरी

**तभा वृत्तसेवा**

बीड : भारत वर्षाच्या पावन भूमीत ब्रज वन स्थळी विसाव्या शतकाच्या सुरुवातीस एका महान एकात्मचिंतकाने जन्म घेतला. त्यांच्या अलौकिक प्रतिभेचे अकलन सुरुवातीला कोणीच करत नव्हते. परंतु जेव्हा त्यांची प्रगल्भ प्रज्ञा ज्योती सर्व दूर पसरते तेव्हा सर्व लोक आश्चर्यचकित झाले. भारताला गौरव प्राप्त झाला या विभूतीने भारतात जन्म घेतल्याने जगात भारताचा भारतात मथुरेच्या नागला चंद्रभान या गावाचा मान वाढला.जगाला भगवद गीता शिकवणाऱ्या श्रीकृष्णाची जन्मभूमी आपल्याला माहित आहे. त्या भूमीतच दीनदयालजींचा जन्म झाला. एकात्म





मानवतावाद भारतात रुजवणारा नेता म्हणून पंडित दीनदयाल उपाध्याय यांची जनमानसात ओळख आहे अशी माहिती पंडित दीनदयाल उपाध्याय यांच्या पुण्यतिथीनिमित्त चिंतन देताना नानाजी देशमुख विद्यामंदिरच्या शिक्षिका अनिता कुलकर्णी- मोकाशी यांनी दिली.

११ फेब्रुवारी रोजी सकाळी साडे सहा ते सात या वेळेत हा पुण्यतिथीचा कार्यक्रम घेण्यात आला.

यावेळी जन शिक्षण संस्थानचे सर्व अधिकारी कर्मचारी व नानाजी देशमुख विद्यामंदिर, गोकुळ शिशुवाटिका च्या शिक्षिका, शहरातील प्रतिष्ठित नागरिक, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे स्वयंसेवक उपस्थित होते.

सर्वप्रथम भज गोविंद भज गोपाल केशव माधव दीनदयाल हे भजन जगदाळे ताई यांनी सांगितले, गीत स्नेहल ताई केवडकर यांनी सांगितले. दीनदयाल जी वर चिंतन अनिता ताई यांनी सांगितले. या कार्यक्रमाचे

# महाबोधी विहार बौद्धांच्या ताब्यात द्या

## विजय साळवे यांच्या नेतृत्वाखाली भीम अनुयायांची जंतर-मंतरवर धडक



**तभा वृत्तसेवा**

माजलगाव : (प्रतिनिधी) बुद्धगया येथील महाबोधी महाविहार बौद्ध समाजाच्या ताब्यात द्यावा, या प्रमुख मागणीसाठी १२ फेब्रुवारी रोजी दिल्लीतील जंतर-मंतरवर होणाऱ्या बुद्धगया मुक्ती आंदोलनात सहभागी होण्यासाठी माजलगाव तालुक्यातून मोठ्या संख्येने भीम अनुयायी रवाना झाले.

आंबेडकरी चळवळीचे ज्येष्ठ नेते, रिपब्लिकन सेनेचे बीड जिल्हाध्यक्ष तथा महाबोधी महाविहार मुक्ती आंदोलन कृती समितीचे अध्यक्ष विजय साळवे यांच्या नेतृत्वाखाली कार्यकर्त्यांचा ताफा दिल्ली येथे दाखल झाला. देशभरातून या आंदोलनाला मोठा प्रतिसाद मिळत असून, माजलगाव तालुक्यातील अनुयायांमध्येही उत्साहाचे वातावरण पाहायला मिळत आहे.

बौद्ध समाजाच्या हक्कांसाठी लढा अधिक तीव्र करण्याचा निर्धार यावेळी कार्यकर्त्यांनी व्यक्त केला.

या प्रसंगी विलास गायसमुद्रे, विश्वनाथ तोडके, ओमप्रकाश टाकणखार, वशिष्ट लांडगे, राकेश साळवे, विलास खळगे, अमित खर्डे, विशाल ससाने, लहू ससाने, प्रकाश तोडके, संतोष खुणे, सचिन पडमुख, प्रकाश शेळके, भास्कर पौळ, अंजेराम घनगाव आदी उपस्थित होते.

### काका चषक लिगचा पारितोषिक वितरण सोहळा

# जननायक सुनीलकाकांच्या स्मृती जीवंत ठेवण्याचे काम कृष्णा लोमटे करीत आहेत - डॉ.राजेश इंगोले

## दिवंगत सुनील काका हे लोकनायक होते - रमेशराव आडसकर, तरूणांनी शारीरिक तंदुरूस्तीकडे लक्ष द्यावे - माजी आ.संजय दौंड

**तभा वृत्तसेवा**

आंबाजोगाई

दिवंगत लोकनेते सुनीलकाका लोमटे यांच्या स्मृती प्रित्यर्थ आयोजित काका क्रिकेट चषक पर्व दुसरे या क्रिकेट स्पर्धेचे बक्षीस वितरण नुकतेच अंबाजोगाई येथे योगेश्वरी संस्थेच्या भव्य मैदानावर पार पडले.

या कार्यक्रमासाठी अपर जिल्हाधिकारी आश्विनी जिरंगे सोनवणे, अंबाजोगाई सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन रमेशराव आडसकर, माजी आमदार संगीताताई ठोंबरे, माजी आमदार संजय दौंड, माजी शिक्षण सभापती तथा महाराष्ट्र सांस्कृतिक समितीचे अध्यक्ष डॉ.राजेश इंगोले, माजी उपनगराध्यक्ष बबनराव लोमटे, नगरसेवक गणेश देशमुख, किरण भालेकर, महेश लोमटे, भीमसेन लोमटे यांची प्रमुख उपस्थिती होती.

पारितोषिक वितरणाच्या सुरूवातीला दिवंगत सुनीलकाका लोमटे यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून सुरूवात करण्यात आली. यावेळी बोलताना कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या अपर जिल्हाधिकारी अश्विनी जिरंगे यांनी खेळ हा समाजाला जाती-धर्माच्या, पंथाच्या, गरीब श्रीमंतीच्या भेदभावापलीकडे जाऊन एकत्र बांधण्याचे काम करतो त्यामुळे तरूणांनी आपला वेळ मैदानावर घालवावा असे आवाहन केले. अंबाजोगाई साखर कारखान्याचे चेअरमन रमेशराव आडसकर यांनी सुनीलकाका लोमटे यांच्या राजकीय सामाजिक कारकीर्दीचा गौरव उल्लेख करीत जनमानसातील लोकांच्या हृदयात रूजलेला लोकनायक म्हणजे सुनीलकाका लोमटे होते



असे भावपूर्ण उद्गार काढले. तर सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ माजी शिक्षण सभापती डॉ.राजेश इंगोले यांनी यावेळी बोलताना दिवंगत सुनीलकाका लोमटे हे जननायक होते. दिवंगत सुनील लोमटे हे माझे मित्र होते. त्यांनाही क्रिकेट खूप आवडायचं शारीरिक तंदुरुस्तीकडे विशेष लक्ष देत असत तरूणांना व्यसनांपासून दूर ठेवण्याचे ते आवाहन करीत असत सुनीलकाका लोमटे यांचा मुलगा कृष्णा लोमटे यांनी सुनील काकांच्या स्मृतींना मरणोपरांत ही जिवंत ठेवण्याचे काम केले आणि आपल्या प्रिय व्यक्तीची आठवण जगाला कशी राहील हे दाखवून दिले आहे या शब्दांत त्यांचा गौरवोद्गार केला. यावेळी बिपिनदादा शिरसागर यांनी ही आपले समायोचित विचार व्यक्त केले. या स्पर्धेत अंतिम विजेता ठरला विशाल ११ संघ. शहरातील योगेश्वरी क्रीडा ग्राऊंड येथे पार पडलेल्या या स्पर्धेत एकूण १२ संघांनी सहभाग नोंदविला. लिलाव पद्धतीने खेळाडूंची निवड करून संघरचना करण्यात आल्यामुळे स्पर्धेत आयपीएलसारखा थरार अनुभवायला मिळाला. खेळाडूंच्या उत्कृष्ट कामगिरीमुळे संपूर्ण स्पर्धा अत्यंत चुरशीची आणि रंगतदार ठरली.

या स्पर्धेतील प्रथम पारितोषिक म्हणून रूपये ५५,५५५/- रोख रक्कम व मानाची ट्रॉफी देण्यात आली. अंतिम सामन्यात उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत विशाल ११ या संघाने प्रथम क्रमांक पटकावून काकाचषक आपल्या नावावर केला. तर के.डी. वॉरिअर या संघाने द्वितीय क्रमांक मिळवत रूपये ३५,५५५/- रोख पारितोषिक पटकावले. या स्पर्धेच्या पारितोषिक वितरण समारंभासाठी अपर जिल्हाधिकारी सौ.अश्विनी सोनवणे या प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. तसेच ॲड.शोभाताई सुनिलकाका लोमटे, माजी आमदार संगिताताई ठोंबरे, माजी आमदार संजय दौंड, अंबाजोगाई सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन रमेशराव आडसकर, सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ डॉ.राजेश इंगोले, बिपीनदादा क्षिरसागर, माजी उपनगराध्यक्ष बबनराव लोमटे, नगरसेवक गणेश देशमुख, महेश लोमटे, किरण भालेकर, भिमसेन लोमटे आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती लाभली.

# विचारास प्रत्यक्ष कृतीची जोड : माजलगावच्या 'त्या' गरजू मैत्रिणीला मिळाले स्वावलंबनाचे पंख!

**तभा वृत्तसेवा**

बीड : "समाजातील शेवटच्या घटकाचा उदय म्हणजेच अंत्योदय," हा पंडित दीनदयाल उपाध्याय यांचा विचार जन शिक्षण संस्थान, बीडने कृतीत उतरवला आहे. कौशल्य विकास व उद्योजकता मंत्रालय (भारत सरकार) द्वारा कार्यरत असलेल्या जन शिक्षण संस्थान बीडच्या 'असिस्टंट ड्रेस मेकर' प्रशिक्षणातील प्रशिक्षणार्थी श्रीमती अश्विनी गवते यांचे पतीचे दोन वर्षापूर्वी आजारामुळे निधन झाले, त्यांना दोन मुली व एक मुलगा आहे. कुटुंबाचा आधार गेल्यामुळे त्या आपल्या मुलांसह परळीहून माहेरी माजलगाव येथे आईकडे येऊन राहतात. तेथेच सुरू असलेल्या जन शिक्षण संस्थान बीडच्या माजलगाव येथील असिस्टंट ड्रेस मेकर या प्रशिक्षणाची माहिती मिळाल्याने त्यांनी तीन महिन्याच्या प्रशिक्षणास प्रवेश घेतला व यशस्वीरित्या ती पूर्ण केले.

जन शिक्षण संस्थान बीड द्वारा प्रशिक्षणातील २० महिला भगिनींना त्यांच्या परिस्थितीबद्दल माहिती दिली व आपण त्यांच्यासाठी काही करू शकतो का हा विषय मांडल्याने सर्व



प्रशिक्षणार्थींनी मदतीचा हात देउन १००/- पासून ५००/- मदत कबूल केले व पंडित दीनदयालजी उपाध्याय यांच्या पुण्यतिथी दिवशी त्या प्रशिक्षणाच्या सर्व प्रशिक्षणार्थी , दीनदयाल शोध संस्थान, जन शिक्षण संस्थान बीड च्या सर्व कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत श्रीमती अश्विनी गवते यांना शिलाई मशीन प्रदान केल्याने खऱ्या अर्थाने पंडित दीनदयालजी उपाध्याय यांचे विचार कृतीत आणल्याचा मनस्वी आनंद सर्वांच्या चेहऱ्यावर दिसत होता. जन शिक्षण संस्थान बीड च्या पुढाकारातून अकल्पनीय भेट मिळाल्याने याद्वारा मी नक्कीच मी स्वावलंबी होणार असून याचे श्रेय जन शिक्षण संस्थान बीड व सर्व प्रशिक्षणार्थी भगिनींना असल्याचे श्रीमती अश्विनी गवते यांनी सांगितले.

# जिल्हा वार्षिक योजनेच्या बैठकीत ५३६ कोटी ८८ लाखांची अतिरिक्त मागणी

## जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी जास्तीत जास्त निधी देणार- मुख्यमंत्री



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १३ फेब्रुवारी**

हिंगोली जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी तसेच रस्ते, पूल, शिक्षण, कृषी, जलसंधारण आदी पायाभूत सुविधांसाठी जास्तीत जास्त वाढीव निधी देण्यात येणार असून, जिल्ह्यात होणाऱ्या दर्जात्मक विकासकामावर भर देण्याचे निर्देश मुख्यमंत्री तथा वित्त व नियोजन मंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

मुख्यमंत्री फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली दूरदृश्यप्रणालीद्वारे राज्यस्तरीय प्रारुप आराखडा बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी ते बोलत होते. या बैठकीस दूरदृश्यप्रणालीद्वारे अन्न व औषध प्रशासन, विशेष सहाय्य मंत्री तथा हिंगोली जिल्ह्याचे पालकमंत्री नरहरी झिरवाळ, नियोजन विभागाचे प्रधान सचिव शैला ए., जिल्ह्याच्या पालकसचिव रिचा बागला, नियोजन विभागाचे उपायुक्त विजय पवार उपस्थित होते.

जिल्हा वार्षिक योजना २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी सर्वसाधारण वार्षिक योजनेतर्गंत प्रत्यक्ष २०१ कोटी ६६ लाख रुपयांचा प्रारुप आराखडा तयार करण्यात आला होता. या आराखड्यास जिल्हा नियोजन समितीने मंजुरी दिली आहे. आज आयोजित राज्यस्तरीय प्रारुप आराखडा बैठकीत जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी ५३६ कोटी ५५ लाख ८८ हजार रुपयांची अतिरिक्त मागणीबाबत सविस्तर सादरीकरण केले.

दूरदृश्य प्रणालीद्वारे आमदार तान्हाजी मुटकुळे, विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर, जिल्हाधिकारी राहुल गुप्ता, मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक गायकवाड, जिल्हा पोलीस अधीक्षक डॉ. निलभ रोहन, सहायक जिल्हाधिकारी योगेशकुमार मीना, जिल्हा नियोजन अधिकारी अनिता लव्हारे, सहायक नियोजन अधिकारी ग.गो.चितळे, प्रदीप नळगीरकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी पालकमंत्री नरहरी झिरवाळ यांनी हिंगोली जिल्ह्यातील रस्ते, शाळा, ग्रामीण रुग्णालय, आरोग्य केंद्रे, प्रशासकीय इमारती, श्री संत नर्सी नामदेव व औंढा नागनाथ तीर्थक्षेत्र विकास तसेच जिल्ह्याचा पायाभूत व मूलभूत विकास करण्यासाठी जास्तीत जास्त वाढीव निधी देण्याची मागणी केली.

यावेळी आमदार तानाजी मुटकुळे यांनी जिल्ह्याचे सिंचन वाढविणे, पाणंद रस्त्याची कामे तसेच निजामकालीन मोडकळीस आलेल्या शाळेचे बांधकाम आदी पायाभूत सुविधा पुरविण्यासाठी अतिरिक्त निधीची आवश्यकता असल्याचे सांगितले. यावेळी जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी जिल्हा नियोजन समितीमध्ये मंजूर झालेल्या जिल्हा वार्षिक योजनेच्या प्रारुप आराखड्याची सविस्तर माहिती सादर केली. कृषी व संलग्न सेवामध्ये मत्स्य उत्पादनात वाढ, पशु विकास, स्मशान भूमी शेड बांधकाम, आठवडी बाजार विकसित करणे, भूमीगत गटार, ग्रामपंचायत कार्यालय बांधकाम, कयाधू नदीवर अतिरिक्त सिंचन क्षेत्र निर्माण कोल्हापुरी बंधारे प्रस्तावित करणे, पाझर तलाव व सिंचन तलाव दुरुस्ती, नवीन अंगणवाडी बांधकाम व सोलार संच पुरवणे, महिला बचत गटाकरिता विक्री केंद्र उभारणे, रस्ते व पूलाचे बांधकाम, पोलीस दलाकरिता वाहने व अत्याधुनिक सामुग्री खरेदी, श्रीक्षेत्र औंढा नागनाथ देवस्थानचा विकास तसेच टुरिझम सर्कीट उभारणे तसेच संत नामदेव मंदिर व नानाजी देशमुख यांच्या गावात म्युझियम उभारणे यासह जिल्ह्यातील विविध यात्रास्थळांच्या ठिकाणी भौतिक सोयीसुविधा निर्माण करणे आदी जिल्ह्यातील विविध विकास कामासाठी अतिरिक्त निधीची आवश्यकता असल्याचे जिल्हाधिकारी गुप्ता यांनी यावेळी सांगितले. यावेळी हिंगोली जिल्ह्यातील विविध विभागाच्या विभाग प्रमुखांची उपस्थिती होती.

# महाशिवरात्रीनिमित्त जिल्हा प्रशासनाकडून मंदिर परिसराची पाहणी



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १३ फेब्रुवारी**

महाशिवरात्र यात्रेनिमित्ताने नागनाथ मंदिरामध्ये महसूल प्रशासन, पोलिस प्रशासन, देवस्थान व पुजारी, पुरोहित यांनी जिल्हाधिकारी राहुल गुप्ता व पोलिस अधीक्षक नीलाभ रोहन यांनी बुधवारी (ता. ११) सायंकाळी सहा वाजता नागनाथ मंदिर परिसराची पाहणी केली.

तसेच नागनाथ मंदिरामध्ये महाशिवरात्रीच्या दिवशी रविवार (ता.१५) सायंकाळी आठ वाजता होणाऱ्या ड्रोन लाईट शोच्या मैदानाची पाहणी केली आहे. यावेळी जिल्हाधिकारी गुप्ता यांनी ड्रोन लाईट शो ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसविणे, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करणे यासह विविध सूचना मंदिर प्रशासनास केल्या आहेत. तसेच नागनाथ मंदिर परिसरातील भक्तनिवास, वाहन पार्किंग व्यवस्था, औंढा नागनाथ शहरातील बस स्थानकाच्या पाठीमागील वाहनतळ या ठिकाणी देखील सीसीटीव्ही कॅमेरे बसविणे त्या ठिकाणी स्वच्छता अभियान राबवणे. मंदिर प्रशासनास सूचना करण्यात आल्या. भाविकांची गर्दी लक्षात घेता आरोग्य विभागांनी महाशिवरात्र व रथोत्सवाच्या दिवशी आरोग्य पथके मंदिराच्या परिसरात सज्ज ठेवणे, तसेच ॲम्बुलन्स अग्निशामक वाहने मंदिर परिसरात ठेवणे यासह विविध मुद्द्यावर सूचना केल्या.

यावेळी जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी मंदिर प्रशासनास सूचना दिल्या तसेच पोलीस अधीक्षक नीलाभ रोहन यांनी बंदोबस्ता संदर्भात पोलिस प्रशासन, नागनाथ देवस्थान, पुजारी व पुरोहीत यांना विशेष सूचना केल्या. तसेच नागनाथ मंदिरामध्ये सीसीटीव्ही कॅमेरे, गर्दी लक्षात घेता खबरदारी म्हणून लावले. तसेच नागनाथ मंदिर परीसराची पाहणी केली. तसेच यात्रा काळामध्ये नगरपंचायत प्रशासनाने नागनाथ मंदिर परिसरासह रस्ते साफसफाई करून स्वच्छता अभियान राबविणे अशा सूचना देखील नगरपंचायत प्रशासनाला देण्यात आल्या. सार्वजनिक बांधकाम विभागाने रस्त्यावरील अतिक्रमण काढणे तसेच यात्रा उत्सव काळामध्ये नागनाथ मंदिर परिसरातील लाईट जाऊ देऊ नका. महावितरणला सूचना देण्यात आल्या. यावेळी देवस्थानचे अध्यक्ष तथा तहसीलदार हरीश गाडे, पोलीस निरीक्षक जी एस राहीरे, देवस्थानचे अधीक्षक वैजनाथ पवार, व्यवस्थापक सुरेंद्र डफळ यांच्यासह विविध विभागातील अधिकारी, संस्थानचे पदाधिकारी व लोकप्रतिनिधी यांची उपस्थिती होती.

# हिंगोलीत पोलिस पाटील भरतीच्या मुलाखतींना सुरूवात



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १३ फेब्रुवारी**

हिंगोली जिल्ह्यातील पाचही तालुक्यातील पोलिस पाटील यांच्या रिक्त असलेल्या पदांसाठी मुलाखती सुरू करण्यात आल्या आहेत. या मुलाखतीमध्ये पारदर्शकता येण्यासाठी दररोज मुलाखतीचे पॅनल बदलण्याचा निर्णय जिल्हा प्रशासनाने घेतला असून जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांचे पथक या प्रक्रियेवर लक्ष ठेवून आहे.

हिंगोली जिल्ह्यातील तीन उपविभागांतर्गत पाच तालुक्यातून पोलिस पाटलांच्या रिक्त असलेल्या पदांसाठी भरती प्रक्रिया राबवली जात आहे. जिल्हाधिकारी राहुल गुप्ता, अप्पर जिल्हाधिकारी महेंद्रकुमार कांबळे, निवासी उपजिल्हाधिकारी अभिमन्यू बोधवड, उपविभागीय अधिकारी समाधान घुटुकडे, प्रतिक्षा भूते, विकास माने यांच्या मार्गदर्शनाखाली ही भरती घेतली जात आहे. या भरती प्रक्रियेत लेखी परीक्षा झाल्यानंतर सुमारे १९७० उमेवारांना मुलाखतीसाठी बोलावण्यात आले आहे. गुरूवारपासून जिल्हाधिकारी कार्यालयात या मुलाखतींना सुरूवात झाली आहे. तीन उपविभागांतर्गत पाच तालुक्यातील पात्र उमेदवारांना त्यांना दिलेल्या दिवशी आवश्यक कागदपत्रे घेवून हजर राहण्याच्या सुचना देण्यात आल्या आहेत. वसमत उपविभागातील मुलाखती दि १८ फेब्रुवारीपर्यंत तर कळमनुरी तालुक्यातील मुलाखती दि २० फेब्रुवारी, हिंगोली तालुक्यातील मुलाखती दि २३ फेब्रुवारीपर्यंत चालणार आहेत.

या भरती प्रक्रियेत पारदर्शकता रहावी तसेच योग्य उमेवारांची निवड होण्यासाठी मुलाखतीसाठी दररोज पॅनल बदलण्याचा निर्णय घेण्यात आला असून या पॅनलमधील अधिकाऱ्यांना वेळेवर कळवले जात आहे. उमेदवारांनी कोणत्याही भूलथापांना बळी पडू नये असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी केले आहे.



**हिंगोली- येथील बहुविध प्रशालेच्या मैदानावर मागील तीन दिवसांपासून जिल्हा हॉकी असोसिएशनच्यावतीने दयानंद श्रीलेले यांच्या स्मरणार्थ राष्ट्रीय हॉकी स्पर्धा होत आहेत. या स्पर्धेमध्ये उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या खेळाडूंचा मान्यवरांच्याहस्ते ट्रॉफी देऊन सत्कार करण्यात येत आहे. शुक्रवारी उत्कृष्ट खेळाडूंचा सत्कार करतांना माजी मुख्याध्यापक एस बी गडदे, जितेंद्र भट्ट, ओमप्रकाश लेले, प्रकाश वाघमारे आदी.**

## संक्षिप्त वृत्त

### नोंदणी व मुद्रांक विभागातील शिपाई गट ड पदांची निवड व प्रतिक्षा यादी संकेतस्थळावर प्रसिध्द

हिंगोली- नोंदणी व मुद्रांक विभागात शिपाई गट 'ड' संवर्गातील २८४ पदे भरण्यासाठी आय.बी.पी.एस. कंपनीमार्फत माहे जुलै-२०२५ मध्ये ऑनलाईन परीक्षा घेण्यात आली होती. या परीक्षेचा निकाल दि. २० ऑगस्ट २०२५ रोजी विभागाच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आला होता. उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांमधून सामाजिक व समांतर आरक्षण तसेच गुणवत्तेनुसार कागदपत्र पडताळणी प्रक्रिया पूर्ण करण्यात आली आहे. कागदपत्र पडताळणीअंती तयार करण्यात आलेली निवड यादी, प्रतीक्षा यादी तसेच निवडीसाठी नकार दिलेल्या उमेदवारांची यादी नोंदणी व मुद्रांक विभागाच्या अधिकृत संकेतस्थळावर दि. १० फेब्रुवारी, २०२६ रोजी प्रसिद्ध करण्यात आलेली आहे. नोंदणी व मुद्रांक विभागातील शिपाई गट 'ड' संवर्गात निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्तीच्या अनुषंगाने समुपदेशनासाठी लवकरच बोलावण्यात येणार आहे. समुपदेशनाचे स्थळ व दिनांक याबाबतची माहिती विभागाच्या संकेतस्थळावर स्वतंत्ररित्या प्रसिद्ध करण्यात येईल, असेसह जिल्हा निबंधक वर्ग-१ तथा मुद्रांक जिल्हाधिकारी, हिंगोली यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे कळविले आहे.

### समतादूतांकडून बार्टीच्या उपक्रमांची माहीती



औंढा नागनाथ- तालुक्यातील शिरड शहापूर ग्रामपंचायत येथे दि १३ फेब्रुवारी रोज शुक्रवार ग्रामसभेचे आयोजन करण्यात आले. या ग्रामसभेत महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाची स्वायत्त संस्था डॉ.बाबासाहेब आंबेडकर व संशोधन व प्रशिक्षण संस्था बार्टी पुणे चे समतादूत ॲड. सुकेश कांबळे यांनी प्रकल्प अधिकारी सिद्धार्थ गोंवदे यांच्या मार्गदर्शनाखाली ग्रामपंचायत कार्यालय शिरड शहापूर येथील ग्रामसभेत बार्टीच्या विविध कार्य, प्रशिक्षण योजनांची माहिती तसेच सहाय्यक आयुक्त समाज कल्याण, हिंगोली मार्फत विविध योजनेची माहिती देण्यात आली. सदरील ग्रामपंचायतचे उपसरपंच पुष्पाताई शिवहार स्वामी, तसेच ग्रामपंचायत अधिकारी कैलास देशमुख, ग्राम पंचायत सदस्य गुलाब नबी, शेख इब्राहिम, संभाजी जोगदंड, सो.रोहिणी मुक्कीरवार, रामा बीचेवार, सय्यद मुजाहिद, ग्रामपंचायत कर्मचारी गजानन अंतेवार, गंगाप्रसाद लांडगे, शरद बिच्चेवार, युनुस शेख, तनवीर पठाण, अहेमद पठाण, रोजगार सेवक जबी पठाण आदींसह ग्रामस्थांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

### ६७ वाहन चालकांवर पोलिसांची कारवाई

हिंगोली- वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या तसेच अवैध वाहतुक करणाऱ्या ६७ वाहन चालकांविरूध्द पोलिसांनी कारवाई करीत ४७१०० रूपयांचा दंड वसूल केला आहे.

# औंढा नागनाथ येथे महाशिवरात्रीनिमित्त ५० लाख भाविक येण्याचा अंदाज- गुप्ता



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १३ फेब्रुवारी**

औंढा नागनाथ मंदिर येथे येत्या महाशिवरात्री निमित्त मोठ्या प्रमाणावर भाविकांची गर्दी होण्याची शक्यता असून सुमारे ५० लाखांपर्यंत भाविक दर्शनासाठी येऊ शकतात, अशी माहिती जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी दिली.

महाशिवरात्री उत्सवाच्या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासनाकडून व्यापक नियोजन करण्यात येत आहे. भाविकांच्या सोयीसाठी मंदिर परिसरात तसेच गावात ड्रेनेज व्यवस्था, स्वच्छता मोहीम आणि तात्पुरत्या शौचालयांची उभारणी केली जाणार आहे. पावसाळा नसला तरी मोठ्या गर्दीमुळे साचणारे पाणी व अस्वच्छता टाळण्यासाठी विशेष उपाययोजना केल्या जात आहेत. वाहतूक कोंडी टाळण्यासाठी स्वतंत्र पार्किंग व्यवस्था उभारण्यात येणार असून हलक्या व जड वाहनांसाठी वेगवेगळे पार्किंग झोन निश्चित केले जाणार आहेत. एसटी बस व खासगी वाहनांसाठी नियोजित मार्ग आखण्यात येणार असून वाहतूक नियंत्रणासाठी पोलीस बंदोबस्त तैनात राहणार आहे. तसेच आरोग्य विभागाकडून तात्पुरती वैद्यकीय पथके, ॲम्ब्युलन्स सेवा आणि आपत्कालीन नियंत्रण कक्ष कार्यान्वित ठेवण्यात येणार आहे. पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, प्रकाशयोजना आणि सुरक्षा यावर विशेष भर देण्यात येत असल्याचे जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितले. भाविकांनी प्रशासनाला सहकार्य करावे व अधिकृत सूचना पाळाव्यात, असे आवाहनही जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी केले आहे.

# हिंगोली नगर परिषदेच्या पहिल्या सर्वसाधारण सभेत विविध ठराव



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १३ फेब्रुवारी**

येथील नगर परिषदेच्या पहिल्या सर्वसाधारण सभेत विविध विषयांवर चर्चा करण्यात आली. यावेळी विविध ठराव घेण्यात आले.

पहिल्या सर्वसाधारण सभेच्या अध्यक्षस्थानी नगराध्यक्षा सौ रेखा श्रीराम बांगर यांची उपस्थिती होती. यावेळी मुख्याधिकारी अरविंद मुंडे, उपनगराध्यक्ष माबुद बागवान, शिवसेनेचे गटनेते श्रीराम बांगर यांची प्रमुख उपस्थिती होती. नवीन सभागृहात सर्व नवनिर्वाचीत नगरसेवकांच्या उपस्थितीमध्ये विविध विषयांवर चर्चा करण्यात आली. त्यामध्ये मागील सभेचा इतिवृत्तांत वाचून कायम करणे, विविध योजनेंतर्गत व नगर परिषद निधी अंतर्गत प्राप्त निविदा दरास मान्यता देणे, जलेश्वर मंदिरासमोरील चिमणीबाजार स्थलांतरीत करणे, मंगळवारा बाजार परिसरात भरणाऱ्या बैलबाजारासाठी जागा निश्चित करणे, कायदीय सल्लागाराची नियुक्ती करणे, प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराची नियुक्ती करणे, विविध विभागाकरीता वार्षिक निविदा मागविणे, औंढा रोडवरील क्रिकेट टर्फ मैदान भाडे तत्वावर चालविण्यासाठी लिलाव करणे, विविध योजनेंतर्गत व न प फंड अंतर्गत कामे प्रस्तावित करणे आदी ठराव घेण्यात आले.

# वसमतचा फुटबॉल संघ धर्माबाद येथे होणाऱ्या सामन्यांसाठी रवाना



**तभा वृत्तसेवा**
**वसमत, १३ फेब्रुवारी**

डब्ल्यू. आय. एफ. ए. अंतर्गत धर्माबाद येथे आयोजित करण्यात आलेल्या फुटबॉल सामन्यांसाठी हिंगोली संघ दि १२ फेब्रुवारी रोजी धर्माबाद येथे खेळण्यासाठी रवाना झाला आहे. या निमित्ताने खेळाडूंमध्ये मैदानी खेळाचे महत्त्व वाढावे, खेळाडूंचे मनोबल उंचावावे तसेच त्यांच्या कर्तृत्वाचा गौरव व्हावा या उद्देशाने वसमत येथे सत्कार करण्यात आला.

या सत्कार कार्यक्रमाचे आयोजन वसमत नगर परिषदेचे उपनगराध्यक्ष सय्यद इमरान अली, तसेच डब्ल्यू आय एफ ए चे अध्यक्ष अब्दुल समद, सचिव अजगर पटेल आणि सदस्य शेख मोहसीन, शेख अल्ताफ यांच्या वतीने करण्यात आले. यावेळी संघातील खेळाडूंना सत्कार करून सन्मानित करण्यात आले व धर्माबाद येथील सामन्यांसाठी त्यांना शुभेच्छा देण्यात आल्या.

विशेष म्हणजे या संघामध्ये निवड झालेल्या खेळाडूंची निवड ही १३ वर्षाखालील वयोगटातील असून, या बाल खेळाडूंनी कठोर सराव, शिस्त आणि उत्कृष्ट कामगिरीच्या जोरावर संघात स्थान मिळवले आहे. लहान वयातच अशा स्पर्धांमध्ये सहभाग मिळाल्यास भविष्यात हेच खेळाडू जिल्हा, राज्य व राष्ट्रीय पातळीवर दमदार कामगिरी करून वसमत व हिंगोलीचे नाव उज्वल करतील, असा विश्वास उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केला. यावेळी खेळाडूंना प्रशिक्षण देणारे वसमत येथील प्रशिक्षक खीजर व मुजीब यांनी खेळाडूंना मार्गदर्शन करून स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या. खेळ हा केवळ स्पर्धा नसून शिस्त, आत्मविश्वास आणि नेतृत्व निर्माण करणारा मार्ग आहे. खेळाडूंनी मेहनत सुरूच ठेवावी, असे आवाहन त्यांनी केले.

# भरतीसाठी आलेल्या उमेदवारांना आ. बांगर यांचेकडून निवास, राहण्याची सोय



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १३ फेब्रुवारी**

पोलीस भरतीची प्रक्रिया अत्यंत वेगाने सुरू असून, यासाठी राज्यभरातील हजारो तरुण आपलं नशीब आजमावण्यासाठी हिंगोलीत दाखल झाले आहेत. या धावपळीच्या आणि स्पर्धेच्या काळात उमेदवारांची गैरसोय टाळण्यासाठी शिवसेनेचे आमदार संतोष बांगर यांनी उमेदवारांच्या निवासाची व राहण्याची मोफत सोय केली आहे.

पोलिस भरतीसाठी आलेल्या उमेदवारांच्या खिशाला फटका बसू नये आणि त्यांनी केवळ आपल्या मैदानी चाचणीवर लक्ष केंद्रित करावे यासाठी आ. संतोष बांगर यांनी निवासासह जेवणाची सोय केली आहे. स्वतः आमदार संतोष बांगर यांनी या व्यवस्थेची पाहणी केली. केवळ पाहणीच केली नाही, तर त्यांनी भरतीसाठी आलेल्या उमेदवारांसोबत पंगतीत बसून भोजनाचा आनंद घेतला. आमदारांच्या या साधेपणाने आणि आपुलकीने उपस्थित तरुण भारावून गेले होते. त्यांच्यासोबत गप्पा मारत आमदार बांगर यांनी तरुणांचा उत्साह वाढवला आणि त्यांना भरतीसाठी शुभेच्छा दिल्या.

आमदार बांगर यांनी केलेल्या या सुविधेमुळे उमेदवारांची मोठी सोय झाली आहे. अनेक उमेदवारांनी आपल्या भावना व्यक्त करताना सांगितले की, बाहेरच्या जिल्ह्यात गेल्यावर राहण्या-खाण्याचे खूप हाल होतात, परंतु आमदार बांगर यांनी केलेल्या सोयीमुळे अनेक उमेवारांना दिलासा मिळाला आहे.

# गुरुंच्या घरातूनच 'हिशोब' गहाळ?



**तभा वृतसेवा**
**देगलूर, दि. १३ फेब्रूवारी-**

विद्यार्थ्यांना प्रामाणिकपणाचे धडे देणाऱ्या शिक्षण क्षेत्रावरच संशयाची सावली पडावी, अशी धक्कादायक घटना देगलूर तालुक्यात उघडकीस येत आहे. काही शिक्षकांकडून शासनाची लाखो रुपयांची करचुकवेगिरी होत असल्याचा गंभीर आरोप युवाशक्ती संघर्ष समितीचे तालुका अध्यक्ष प्रकाश वाघमारे यांनी केला आहे. संबंधित व्यवहारांचे पुरावे आपल्या ताब्यात असल्याचा दावा करत त्यांनी तातडीने उच्चस्तरीय चौकशीची मागणी केली आहे. अन्यथा देगलूर गटशिक्षणाधिकारी कार्यालयात 'गाढव भरो' आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे

**आरोपांचे स्वरूप नेमके काय?**

देगलूर तालुक्यातील शिक्षकांकडून शासनाला भरायचा कर टाळण्यासाठी बहुतांश शिक्षकांकडून खोटे कागदपत्रे सादर केली जात आहेत. विविध संस्थांना देणगी दिल्याचे दाखवून करसवलती घेतल्या जात असल्याची धक्कादायक माहिती युवाशक्ती संघर्ष समितीचे तालुका अध्यक्ष प्रकाश वाघमारे यांनी दिली आहे. यावेळी प्रकाश वाघमारे म्हणाले की, मागील तब्बल तीन-चार वर्षांपासून युवाशक्ती संघर्ष समितीच्या माध्यमातून तालुक्यातील शिक्षण व्यवस्थेत होत असलेल्या करचुकवेगिरी संदर्भात पुरावे जमा केले असल्याचे वाघमारे यांनी सांगितले. ही बाब केवळ शासनाची आर्थिक फसवणूक नसून हजारो विद्यार्थ्यांना घडविणाऱ्या शिक्षण व्यवस्थेचे अप्रामाणिकपणा आहे, जे भावी पिढ्यांना गैरवर्तन शिकवणारे असल्याचे बोलले जात आहे.

***मग शिक्षकांना घर भाडे भत्ता कशासाठी?**

शासनाच्या आदेशानुसार शिक्षकांनी कार्यरत असलेल्या गावात मुक्कामी राहणे बंधनकारक असताना, प्रत्यक्षात अनेक शिक्षक गावात राहत नसल्याचा आरोप त्यांनी केला. मात्र, घरभाडे भत्ता नियमित घेतला जात असल्याने शासनाच्या तिजोरीवर लाखोंचा बोजा पडत असल्याचा दावा त्यांनी केला. तालुक्यातील काही प्रकरणांत पती-पत्नी दोघेही शिक्षक असून, वेगवेगळ्या ठिकाणी राहत असल्याचे दाखवून स्वतंत्र लाभ घेतल्याचेही आरोप पुढे आले आहेत. ही केवळ नियमभंगाची बाब नसून शासनाची फसवणूक आहे, असे वाघमारे यांनी नमूद केले.

**शिक्षण विभाग संशयाच्या भोवऱ्यात**

या प्रकरणात काही मुख्याध्यापक व शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांनी दुर्लक्ष केल्याचा आरोपही करण्यात आला आहे. येथील गट शिक्षणाधिकारी कार्यालयाच्या माध्यमातून संबंधित शिक्षकांना पाठीशी घातले जात असल्याची शंका व्यक्त करण्यात आली. दरम्यान, या आरोपांमुळे तालुक्यातील शिक्षण क्षेत्रात खळबळ उडाली असून, शिक्षक संघटनांकडून याबाबत स्पष्टीकरण देण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

**'गाढव भरो' आंदोलनाचा इशारा !**

संबंधित करचुकवेगिरी करणाऱ्या शिक्षकांवर कारवाई न झाल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा देत वाघमारे म्हणाले, शासनाची फसवणूक करणाऱ्यांना वाचवले जाणार नाही. आवश्यकता भासल्यास अनोख्या पद्धतीने आंदोलन उभारले जाईल. शिक्षण हा अतिशय आदर्श आणि समाजाला घडविणारा पेशा (व्यवसाय) असून अशा आदर्श क्षेत्रातही अशाप्रकारे खोटे दस्तऐवज तयार करून करचुकवेगिरी अत्यंत लाजिरवाणी असल्याचे बोलले जात आहे.

**प्रशासनाची भूमिका महत्त्वाची**

युवाशक्ती संघर्ष समितीकडून करण्यात आलेल्या आरोप कितपत सत्य आहेत? एकाच घरी राहणाऱ्या दोन महिलांना लाडकी बहीण योजनेचा लाभ घेता येणार नसल्याचे शासनाकडून भूमिका स्पष्ट करण्यात आली. याच धर्तीवर एकाच कुटुंबातील पती व पत्नी शिक्षकांना दोन वेगवेगळे स्वतंत्र घरभाडे भत्ता मिळवणे योग्य आहे का? असे एक ना अनेक प्रश्न सध्या उपस्थित होत आहेत. या प्रकरणात नेमके तथ्य किती आणि आरोप कितपत खरे, हे अधिकृत चौकशीतून स्पष्ट होणार आहे. मात्र, शिक्षण क्षेत्राशी निगडित असल्याने विषय गंभीर मानला जात आहे. देगलूर तालुक्यातील या प्रकरणाकडे आता पालक, शिक्षक व सर्वसामान्य नागरिकांचे लक्ष लागले आहे. प्रशासनाने पारदर्शक चौकशी करून वस्तुस्थिती जनतेसमोर आणावी, आणि दोषींवर कारवाई करावी, अशी सर्वसामान्यांची अपेक्षा आहे.



# अस्वल हल्ला प्रकरणातील दयाळ धानोरा येथील कुटुंबीयास आ. भीमराव केराम यांची भेट

**तभा वृतसेवा**
**इस्लापूर, दि. १३ फेब्रूवारी-**

दयाल धानोरा येथे २ दिवसापूर्वी अस्वलाच्या हल्ल्यात मृत्यू झालेले शेतकरी दत्ता बळीराम जाधव यांच्या घरी दिनांक १३ रोजी किनवट माहूर विधानसभा मतदारसंघाचे आ. भीमराव केराम यांनी सांत्वन पर भेट दिली, आणि रिती-रिवाजापणे चहापाणी केले.

अस्वलाच्या हल्ल्यामध्ये मृत्युमुखी पावलेल्या कुटुंबीयाला अपारावपेठ वन विभागाच्या कार्यालयाच्या माध्यमातून आमदार भीमराव केराम यांच्या उपस्थित मृत्यू पावलेल्या शेतकऱ्यांच्या कुटुंबास (वारसदार) शासन नियमाप्रमाणे तात्काळ दहा लाख रुपयांच्या धनादेश अप्पाराव पेठ वन विभागाचे वन अधिकारी उमेश ढगे यांच्या उपस्थितीत सुपूर्द करण्यात आला याप्रसंगी गावातील ग्रामस्थ व भाजपाचे तालुका अध्यक्ष सूर्यकांत आरडकर, भाजपाचे माजी तालुका अध्यक्ष तथा सामाजिक कार्यकर्ते बालाजी आलेवार यांच्यासह वन विभागाच्या कर्मचाऱ्यांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती

## ग्रामविकासाच्या शिलेदारांचा होणार सन्मान

**बिलोली** -बिलोली तालुक्यात ९२ गावे असुन त्यात ७३ ग्रामपंचायती आहेत, त्यापैकी ५३ ग्रामपंचायतीची मुदत संपली असुन सदरच्या ग्रामपंचायतीवर प्रशासकच्या नेमनुका ही झाल्या, गावाच्या विकासासाठी शेवटच्या क्षणापर्यंत जबाबदारीने काम केलेल्या अन् २० ग्रामपंचायतीचा कारभार सुरु असलेल्या लोकप्रतिनिधीच्या कार्याचा गौरव करण्यासाठी बिलोली नगरपरिषदेचे कार्यकुशल नगराध्यक्ष संतोष कुलकर्णी यांच्या पुढाकाराने संतोष कुलकर्णी मित्रमंडळाच्यावतीने निरोप समारंभ व कार्यगौरव सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. गावातील सरपंच-उपसरपंच व सदस्यांचा सन्मान करण्यात येणार असुन सदरचा कार्यक्रम १८ फेब्रुवारी रोजी दुपारी ३ वाजेच्या दरम्यान बिलोली-बोधन राज्यमार्गावरील कुलकर्णी फार्म हाऊसच्या मैदानावर होणार आहे. या सोहळ्यासाठी धर्माबाद न.प.चे नगराध्यक्षा संगिता बोलमवार, उपनगराध्यक्ष शंकर अण्णा बोलमवार, कुंडलवाडीचे नगराध्यक्षा सौ.प्रेरणाताई कोटलावार, उपनगराध्यक्षा नेहा -याकावार,माजी जि.प.सदस्य लक्ष्मणराव ठक्करवाड, माजी सरपंच गणेश पाटील शिंपाळकर, कृषि उत्पन्न बाजार समितीचे संचालक सुनिल यंबडवार, माजी सरपंच प्रभाकर पेंटे, माजी तालुकाध्यक्ष गिरीधर डाकोरे, हाजप्पा पा.सुंकलोड, श्रिनिवास पा.शिंदे यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. बिलोली शहरासह गाव-खेड्यांचा सक्षम विकास घडवायचा असुन ग्रामविकासाची लढाई अधिक ताकतीने पुढे नेणार असल्याचे बिलोली नगरपरिषदेचे उपनगराध्यक्ष अनुप अंकुशकर यांनी सांगितले.यशस्वीतेसाठी नगरपरिषद परीषद नगरसेवकासह बिलोली तालूक्यातील नवतरुण पुढाकार घेत आहेत. सदरच्या ग्रामविकास शिलेदारांच्या कार्यगौरव सोहळ्यात सरपंच-उपसरपंच,सदस्य पदाधिका-यांधी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन उपनगराध्यक्ष अनुप अंकुशकर यांनी केले आहे.

## मूदखेड रोडवर गतीरोधक बसवा; नागरीकांची मागणी

**भोकर**-शहिद प्रफूल्लनगर भागातून मूदखेड कडे जाणाऱ्या रस्त्यावर दूचाकी चारचाकी वाहने सूसाट वेगाने धावतात या भागात विद्यार्थ्यांचे खाजगी शिकवणी वर्ग चालतात अपघाताची शक्यता नाकारता येत नाही.या रस्त्यावर तात्काळ रबरी गतीरोधक बसविण्याची मागणी नागरीकांकडून होत आहे. शहिद प्रफूल्लनगर या नागरी वस्तीतून मूदखेड कडे जाणारा सि.सी.रस्ता आहे.या रस्त्यावर नेहमी वाहनाची वर्दळ असते दूचाकी चारचाकी वाहने भरधाव वेगाने धावतात या परिसरात शालेय विद्यार्थ्यांचे खाजगी शिकवणी वर्ग चालतात मोठ्या संख्येने विद्यार्थी या रस्त्याने ये जा करतात वाहनांची वर्दळ असून या रस्त्यावर यापूर्वी अनेकवेळा छोटे अपघात होवून अनेकजण जखमी झाले आहेत संबधित विभागाकडून रस्ते बांधकाम करण्यात आले पण या रस्त्यावर गतीरोधक नसल्याने सूसाट वाहने धावत आहेत वेग नियंत्रणात राहत नसल्याने अपघाताच्या घटनेत वाढ होत आहे.भविष्यात मोठा अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही.संबधित विभागाने या रस्त्यावर तात्काळ रबरी गतीरोधक बसविण्याची मागणी शहिद प्रफूल्लनगर व चिखलवाडी भागातील नागरीक करीत आहेत.

## साई नर्सिंगहोमचा शुभारंभ

**नवीन नांदेड** -नसिडकोचे रहिवासी सामाजिक कार्यकर्ते व पेशाने डॉ. असलेले डॉक्टर नरेश रायेवार यांच्या मार्गदर्शनातून व सहकार्यातून सिडको क्रांती चौक येथे साई सर्जिकल अँड नर्सिंग होम चा शुभारंभ दिनांक ८ फेब्रुवारी रोजी डॉ . नरेश रायवार आणि दक्षिणचे आमदार आनंदराव पाटील भांडारकर यांच्या हस्ते करण्यात आले.

# रेतीची अवैध वाहतूक करणाऱ्यावर ग्रामीण पोलिसांची कारवाई



**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १३ फेब्रूवारी-**

रेतीची अवैध वाहतूक करणाऱ्यावर ग्रामीण पोलिसांनी कारवाई केली असून या कारवाईत एकूण दहा लाख १५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. हि कारवाई दि.१३ फेब्रुवारी रोजी अडीच वाजताच्या सुमारास करण्यात आली.

जुना बोंढार येथून दर्गा रोडवर विनापरवाना रेतीची अवैध वाहतूक होत असल्याची माहिती मिळाल्यावरुन ग्रामीण पोलिसांच्या पथकाने त्याठिकाणी जावून टाटा कंपनीचा टिप्पर एमएच-३४-एम-७९४० पकडला. यामध्ये अंदाजे तीन ब्रास रेती आढळून आली. पोलिसांनी टिप्पर चालक स्नेहल नागोराव सावते यास अटक केली असून, या कारवाईत पोलिसांनी टिप्पर व रेती असा एकूण १० लाख १५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. हि कारवाई पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर, पोलीस उपनिरीक्षक व्यंकट कुसमे, पोहेका. वसंत केंद्रे, मारोती पचलिंग, समीर अहेमद यांच्या पथकाने केली.

# सहारा स्टेडीयम, वखार महामंडळ परिसरात पत्रा शेड दुकान प्रकरण थंडावले ; उपसभापती पद रडारवर

**तभा वृतसेवा**
**लोहा, दि. १३ फेब्रूवारी-**

कृर्षी उत्पादन बाजार समितीने सहारा स्टेडीयम व वखार महामंडळ परिसरात पत्रा शेडचे दुकाने तयार करुन व्यवसाय करावा असा निर्णय घेतला होता या प्रक्रियेला अनेक संचालकाने विरोध दर्शविला आसल्याने त्रुत स्थगिती दिले आहे असे बोलले जात आहे.

काही संचालक न्याय प्रकियात जाऊन या प्रकरणाची दाद मागणार असल्याचे सांगितले जाते पण उपसभापती निवड रडारवर असल्याचे चर्चा ऐकायला मिळत आहे.

लोहा कृउबा समितीने ठराव घेऊन जे व्यापारी भाड्याच्या दुकानात राहुन आपला व्यापार करुन दर वर्षी मार्केट फिस भरुन बाजार समितीचे उत्पादन वाढवितात आशा व्यापाऱ्याला मोकळी जागा देणे अपेक्षीत होते पण तशे न करता मोंढा परिसरात आडत्या नाहीत शहरात कुठे दुकान नाही फक्त मार्केट लाईन्स धारक असलेल्या व्यापाऱ्याला मोकळी जागा दिली. आणि त्या जागेवर व्यापाऱ्यांनी टिन पत्रा शेडचे दुकान तयार करुन व्यवसाय करावा असा बाजार समितीचा उद्देश आहे. मोकळ्या जागेवर व्यापाऱ्यांनी स्वतः च्या खर्चाने दुकाने तयार करावेत म्हणून व्यापाऱ्याला मोंढा परिसरात मोकळी जागा



दिली त्या जागेवर टिन पत्राचे दुकाने तयार करुन व्यवसाय सुरु करावा.या प्रकारातून संचालकात व उपसभापती यांच्यात वादाची ठिणगी पेटली हा प्रकार चौराव्ह्याट्यावर आला. उपसभापती पदांची निवड ठरल्या प्रमाणे मुददत संपली.नविन उपसभापती निवडीवरुन हे पद रडारवर आले..कारण निवडणूक प्रचार प्रक्रियेत ज्यानी जिव लावून प्रचार केला ते सर्व एकवटले जाण्याची शक्यता आहे.

उपसभापतीच्या मनमानी गैरकारभारा बदल संचालकात धुसफुस सुरु झाली.

कृउबा समितीच्या मोकळ्या जागेवर दुकाने बाधंण्या करीता किंव्हा जागेची विल्हेवाट लावण्याकरीता वरिष्ठाची मानेता घेणे गरजेचे आहे. या प्रक्रियेत दुकाने तयार केल्यावर कागदी ताळमेळाचा खेळ सुरु झाला. दुकान तयार करताना जाहिर प्रगटन देणे बंधनकारक आहे. मोंढा बाजार पेठेत आजही ४० ते ५० व्यापारी भाड्याच्या दुकानात व्यापार करतात हे वास्तव आहे. अनेक संचालकात उपसभापती निवडीच्या विषयी विचार विनीमय चालु आहे. संचालकांचा ग्रुप मेंबर यांनी सहकार मंत्री यांच्या दालना पर्यत प्रकरण गेल्याचे सांगितले आणि या प्रकरणी न्यायालयात जाऊन दाद मागणार असल्याचे सांगितले.

उपसभापती पद ठरल्या प्रमाणे दुसऱ्यालाही संधी मिळावी अशी भावना निर्माण झाली आहे. यामुळे निवडणूक प्रचार प्रक्रियेत ज्यानी जिव लावून प्रचार केला आहे सर्व प्रमुख एक वटुन निर्णय घेणार असल्याची चर्चा ऐकायला मिळत आहे.

या प्रकरणात अधिकाऱ्यावर ठपका बसु शकतो आणि उपसभापती पद रडारवर असल्याची खात्रीदायक सुत्राने माहिती दिली. यामुळे मोंढा बाजार पेठेत ,व्यापारी व शेतकरी चर्चा करताना ऐकायला मिळत आहे. सहारा स्टेडीयम व वखार महामंडळ परिसरात पत्रा शेडचे दुकाने तयार करणे हे प्रकरण सध्या तरी थंडावले आहे.

# माहूरगडच्या श्री रेणुकादेवी चरणी भाविकांकडून ८८ लाखांहून अधिक दानद्रव्याचे भरभरून दान

**तभा वृतसेवा**
**माहूर, दि. १२ फेब्रूवारी-**

राज्यातील साडेतीन शक्तिपीठांपैकी एक मूळ पीठ अशी सर्वदूर पसरलेली धार्मिक महत्ता व अलिकडे

मंदिर संस्थानकडून मिळणाऱ्या सोईसुविधा यामुळे माहूरगडच्या श्री रेणुकादेवी संस्थान येथे मातेच्या दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांच्या संख्येत दिवसेंदिवस भरमसाठ वाढ होऊन संस्थानच्या मासिक उत्पन्नात देखील महिनाभर महिना भाविकांनी मातेच्या चरणी श्रद्धेपोटी अर्पण केलेल्या दानद्रव्यात देखील मोठ्या प्रमाणात वाढ होत असल्याचे दिसून येत आहे.दि.११ फेब्रुवारी रोजी नियमितपणे दरमहा मोजदाद करण्यासाठी उघडलेल्या दानपेटीत महिनाभरात तब्बल रुपये रक्कम ८८ लाख ०७ हजार २७८ तथा सोने चांदी ग्रॅम इतके भरभरून दानद्रव्य भाविकांनी मातेचरणी अर्पण केले तर ९७ ग्रॅम १९९ मिली सोने आणि ३ किलो ३११ ग्रॅम चांदी देखील मातेच्या चरणी अर्पण करण्यात आली असल्याची माहिती संस्थानचे कोषाध्यक्ष तथा माहूरचे तहसीलदार अभिजित जगताप यांनी दिली आहे.



संस्थानकडून नियमानुसार नियमितपणे दरमहा करण्यात येणाऱ्या मोजदादीनुसार दि.०१ जानेवारी ते ११ फेब्रुवारी या कालावधीत दानपेटी व इतर ठिकाणी भाविकांनी मोठ्या श्रद्धेने अर्पण केलेल्या दानदेणगी स्वरूपातील दानद्रव्याचा एकूण ११ दानपेटीतील रकमेचा क्रमशः तपशील पुढीलप्रमाणे श्री च्या सभामंडपात १० लाख ४९ हजार ८३० रुपये, श्रीच्या सभामंडपात २ लाख ४० हजार ७४१ रुपये,श्रीच्या सभामंडपात ७ लाख ९० हजार ५०० रुपये, महालक्ष्मी माता मंदिर १९ हजार ९७७ रुपये, तुळजाभवानी माता मंदिर ५५ हजार ७० रुपये, तुळजाभवानी माता मंदिर परिसरात ४७ हजार ४५६ रुपये, मुख्य मंदिराचे एक्झिट गेटवर ०१ लाख २८ हजार ६१८ रुपये, भगवान परशुराम मंदिर ५७ हजार ९५३ रुपये,श्रीच्या सभामंडपातील परशुराम पाळण्यात २५ हजार३९७ रुपये, परशुराम मंदिराकडील चिंतामणी जवळ २१ हजार ५०६ रुपये,अन्नदान विभागास २५ हजार ३३३ रुपये असे एकूण २४ लाख ६२ हजार ३८१ रुपये रक्कम श्री चरणी भाविकांनी दानपेटीत दान केली.

यावेळी दानपेटीतून सोने ७८ ग्राम ६५० मि.ली., सोन्याचे नथा २२ नग तर पावती वरील सोने १८ ग्रॅम ०६० मिली असे एकूण ९६ ग्रॅम ७१० मिली सोने व २२ नथा भाविकांनी मातेच्या चरणी श्रद्धेपोटी अर्पण केल्याची नोंद करण्यात आली. तर दानपेटीतील चांदीचे वजन १ किलो ७६२ ग्रॅम, परशुराम पाळण्यातील चांदीचे पाळणे ३९९ ग्रॅम, पावती वरील चांदी१ किलो ५४९ ग्रॅम ३५० मिली असे एकूण चांदीचे वजन ३ किलो ७१० ग्रॅम ३५० मिली भरले. याव्यतिरिक्त पावती काऊंटरवर कॅश स्वरूपात ३० लाख ६६ हजार ९६७ रुपये देणगी रक्कम जमा झाली. तर कॅश स्वरूपात साडी/पातळ विक्रीतून १२ लाख ६२ हजार १०० रुपये रक्कम प्राप्त झाली.तसेच ऑनलाईन प्राप्त झालेली देणगी/ साडी/पातळ रक्कम रुपये २० लाख १५ हजार ८३० संस्थानला प्राप्त झाली.

याप्रमाणे रोजी श्री रेणुकादेवी संस्थान, माहूरगड येथे दि.११ फेब्रुवारी २०२६ रोजी मंदिर व परिसरातील ११ दानपेटीतील दानद्रव्य तअसे मिळून एकूण ८८ लाख ०७ हजार २७८ रुपये श्री रेणुकादेवी चरणी भाविकांकडून अर्पण करण्यात आली असल्याची माहिती संस्थानकडून देण्यात आली आहे.

# माता रमाई आंबेडकर जयंती सोहळ्याचा नगरसेवकांना पडला विसर

**तभा वृतसेवा**
**नवीन नांदेड, दि. १३ फेब्रूवारी-**

सुभेदार रामजी आंबेडकर बुद्ध विहार चारीटेबल ट्रस्ट वाघाळा व आम्रपाली महिला मंडळ यांच्या वतीने माता रमाई भिमराव आंबेडकर जयंती सोहळ्याचे आयोजन दिनांक १५ फेब्रुवारी रोजी करण्याचे आयोजिले आहे. यावेळी संयोजक व स्वागताध्यक्ष यांनी शहरातील नवनिर्वाचित नगरसेवक यांचा नागरी सत्कार करण्याचे आयोजिले आहेत पण आपल्याच प्रभागातील चार नगरसेवकास वंचित ठेवण्यात आल्याचे दिसून येते.

सिडको परिसरातील सुभेदार नगर वाघाळा येथील सुभेदार रामजी आंबेडकर बुद्ध विहार चॅरिटेबल ट्रस्ट व आम्रपाली महिला मंडळाच्या वतीने माता रमाई भिमराव आंबेडकर जयंती सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. या जयंती महोत्सवाच्या उदघाटक काँग्रेस पक्षाचे खासदार रवींद्र चव्हाण यांच्या हस्ते सकाळी १० वाजता होणार असून यावेळी प्रमुख व्याख्याते गोविंद नांदेडे हे राहणार आहेत. दरम्यान शहरातील वंचित बहुजन आघाडीचे नवनिर्वाचित नगरसेवक यांचा सत्कार ठेवण्यात आला आहे. पण जयंती सोहळा ज्या प्रभागात आहे त्याच प्रभागाच्या नवनिर्वाचित चार नगरसेवकांना मात्र संयोजकांनी या सोहळ्यातील नागरी सत्कारास निमंत्रित केले नसल्याचे चर्चा प्रभागात चालुआहे.



तसेच या ट्रस्टच्या जडणघडणासाठी सुरुवातीपासून छोटा-मोठा निधी देऊन या विहाराच्या सुशोभीकरण करणाऱ्या माजी नगरसेविका डॉ करूणा जमदाडे यांनाही या कार्यक्रमास वंचित ठेवल्याची चर्चा सिडको हाडकोत होत आहे. याचवेळी शासकीय अधिकारी व पत्रकार यांचा सत्काराचे आयोजन करण्यात आले आहे. तर प्रभागातील चार नगरसेवकांनाच का डावळले आहे अशी उलट सुलट चर्चा सिडकोतील ज्येष्ठ नागरिकात चालू असल्याचे ऐकावयास मिळते. सदरील जयंती महोत्सवात विद्रोही प्रबोधनकार कैलास दादा राऊत यांच्या प्रबोधनात्मक गायनाचा कार्यक्रम सायंकाळी ५:३० वाजता आसुन या कार्यक्रमाचा लाभ परिसरातील समाज बांधवांनी घ्यावा असे आव्हान करण्यात आले आहे. सदरील जयंती महोत्सव पार पाडण्यासाठी चॅरिटेबल ट्रस्टचे अध्यक्ष गौतम भोळे, उपाध्यक्ष अशोक ढवळे, सचिव भगवान जमदाडे, तसेच चंद्रकांत लांडगे, प्रभाकर कांबळे, माया सोनकांबळे, विशाखा जमदाडे, शोभाबाई चावरे, कबीरदास राक्षसे, गौतम जमदाडे, भीमराव जमदाडे हे परिश्रम घेत आहेत.


## हदगांव नगर परिषद हदगांव

ता. हदगाव जि. नांदेड

०२४६८ ऑफिस २२२४०८

Email-id-cohadgaongmail.com | स्थापना १९५४

ह.न.प.जा.क्र.न.प.सा.नि./५५६४/२०२५६ | दिनांक १३/०२/२०२६

**जाहिरात**

नगर परिषद कार्यालय हदगाव च्या वतीने नगर परिषद हदगाव क्षेपातील दिव्यांगाना सूचित करण्यात येते की, साल सन २०२५-२६ या आर्थिक वर्षातील दिव्यांगासाठी राखीव असलेली अर्थसंकल्पिय तरतूदितील निधीचा लाभ देण्यात देणार आहे तरी त्यानी मगर परिषद कार्यालयात दिनांक १०/०३/२०२६ पर्यंत स्वतः अथवा आपल्या पाल्या मार्फत अनश्यक त्वा कागद पत्रासह नगर परिषद कार्यालयात दाखल करावे

नोटः- अधिक माहिती साठी लेखाविभाग, नगरपरिषद हदगाव यांच्याची संपर्क करावा.

**मुख्याधिकारी**
**नगरपरिषद हदगाव**

# थोडक्यात...

## व्हॅलेंटाइन्स डे निमित्त 'इंडियाज लव्ह लँग्वेज' हा विशेष उपक्रम

**छत्रपती संभाजीनगर :** &TVने व्हॅलेंटाइन्स डे निमित्त 'इंडियाज लव्ह लँग्वेज' हा विशेष उपक्रम राबवला आहे. भारतीय कुटुंबांमध्ये शब्दांपेक्षा कृतीतून व्यक्त होणाऱ्या प्रेमभावनेला अधोरेखित करण्याचा या मोहिमेचा उद्देश आहे. विशेषत: पुरुषांच्या नि:शब्द आपुलकीला साजरे करत साध्या हावभावांतून प्रेम व्यक्त करण्याचे आवाहन करण्यात आले. दिल्लीतील प्रत्यक्ष उपक्रमात गुलाब देण्याच्या कृतीतून संदेश पोहोचविण्यात आला. मालिके भाबीजी घर पर है! २.०मधूनही हा भावनिक आशय प्रभावीपणे मांडला जाणार आहे. प्रेक्षकांनी हा विशेष भाग ढत आणि नएए५वर पाहावा, असे आवाहन करण्यात आले.

## झी सिनेमा घेऊन येत आहे 'एक दिवाने की दीवानियत'

**मुंबई :** या व्हॅलेंटाइन्स डे निमित्त झी सिनेमा प्रेमरंगाचा उत्सव साजरा करण्यासाठी घेऊन येत आहे 'एक दिवाने की दीवानियत' या चित्रपटाचा वर्ल्ड टेलिव्हिजन प्रीमिअर, शनिवार १४ फेब्रुवारी रोजी रात्री ८ वाजता. प्रेमातील वेडेपणा, विरह आणि निःस्वार्थपणा यांचा भावपूर्ण प्रवास दाखवणारे हे एक उत्कट रोमँटिक नाट्य आहे. मिलाप झवेरी दिग्दर्शित आणि हर्षवर्धन राणे व सोनम बाजवा यांच्या प्रमुख भूमिकांनी सजलेला हा चित्रपट अशा काळात प्रेक्षकांसमोर येत आहे, जेव्हा उत्कट प्रेमकथांना प्रचंड प्रतिसाद मिळत आहे. त्यामुळेच व्हॅलेंटाइन्स डेच्या दिवशी 'एक दिवाने की दीवानियत'च्या प्रीमिअरची उत्सुकता अधिक वाढली आहे.

## मेडिकव्हर हॉस्पिटल मध्ये व्हेरिकोज वेन्स ची अद्यावत उपचार पद्धती उपलब्ध

**छत्रपती संभाजीनगर :** व्हेरिकोज वेन्स म्हणजे पायांमधील शिरा सुजणे, वाकडे-तिकडे दिसणे व त्वचेखाली निळसर/जांभळ्या रंगात ठळकपणे दिसणे होय. हा विकार प्रामुख्याने दीर्घकाळ उभे राहणे, बसून काम करणे, लठ्ठपणा, गर्भधारणा, वंशपरंपरा आणि वाढते वय यांमुळे आढळतो. प्रमुख लक्षणे: पायांमध्ये जडपणा व वेदना सूज येणे ,रात्री पायात गोळे येणे, त्वचेवर खाज, काळपटपणा गंभीर अवस्थेत जखमा (अल्सर) वेळेवर उपचार न केल्यास हा त्रास वाढू शकतो. त्यामुळे सुरुवातीच्या अवस्थेतच तज्ज्ञ डॉक्टरांचा सल्ला घेणे आवश्यक आहे.

## ग्राहकांसाठी बचत देत सर्वात जलद डिलीव्हरी दिली

**छत्रपती संभाजीनगर :** ॲमेझॉनने आज जाहीर केलं की, २०२५ हे प्राइम सदस्यांसाठी आतापर्यंतचं सर्वात जलद डिलिव्हरीचं वर्ष ठरलं, ज्यामध्ये ५५ कोटींपेक्षा अधिक उत्पादने त्याच दिवशी किंवा दुसऱ्या दिवशी पोहोचवली गेली – यामध्ये मागील वर्षीच्या तुलनेत ४०% वाढ नोंदवली गेली. २०२५ मध्ये भारतातील प्राइम सदस्यांनी वार्षिक प्राइम मेंबरशिपच्या खर्चाच्या सरासरीपेक्षा दुप्पटहून अधिक बचत केली, ज्यातून देशभरातील ग्राहकांना प्राइम खरोखर काहीतरी देत असल्याचे लक्षात येते. प्राइम सदस्यांपैकी सर्वोत्तम १०% सदस्यांनी त्यांच्या प्राइम मेंबरशिपच्या खर्चाच्या आठपटाहून अधिक बचत केली असून, भारतातील प्राइम ग्राहकांना मोफत व जलद डिलिव्हरीसोबतच अनेक रिवॉर्ड्स, खास डील्स, ऑफर्स आणि कॅशबॅक्सद्वारे खरेदी करताना अधिक बचत करण्यात मदत करत आहे.

# श्री.वासुपुज्य दिगंबर जैन मंदिर बाभुळगांव बु. येथे वार्षिक यात्रा महोत्सवाचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**

**छत्रपती संभाजीनगर, दि. १३ फेब्रुवारी :** श्री १००८ वासुपुज्य दिगंबर जैन अतिशय क्षेत्र बाभूळगाव बु छत्रपती संभाजीनगर येथे सोमवार दिनांक १६ फेब्रुवारी २०२६ रोजी वार्षिक यात्रा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले यावेळी भगवान वासुपुज्य यांच्या जन्म तप कल्याणक महोत्सव आयोजित करण्यात आले आहे. संपूर्ण कार्यक्रम आचार्य हेमसागर महाराज यांच्या आर्शिवादाने होत असून सकाळी ७.३० वाजता शोभायात्रा तदनंतर भगवतांचा पंचामृत अभिषेक विधान पुजा होईल सर्व प्रथम ध्वजारोहण शकुंतला शांतीलाल पाटणी सौ.अनिता सुशिलकुमार पाटणी सौ.कविता मनोजकुमार पाटणी शुभम हितेश उत्कर्ष सी.ए.आदर्श प्रतिक्षा पाटणी परिवार मनुरवाला यांचा हस्ते होनार आहे. तसेच दुपारी १ वाजता भगवान वासुपुज्य विधान होणार आहे. संध्याकाळी ७ वाजता भगवंताची संगीतमय आरती व भजन संध्या होणार आहे.




यावेळी सौधर्म इंद्र चा मान सौ.किर्ती वर्धमानजी पाटणी, वर्धमानजी शिखरचंदजी पाटणी परिवार लोणीवाला यांना मिळाला यावेळेस उपस्थित भाविकाना ११ वाजता श्रीमती.नगीनाबाई बबनललाल अजमेरा नितीनकुमार सौ.रिना अजमेरा, निलेशकुमार सौ.रैतिका अजमेरा, मिताली ईशान नियती मनोजकुमार सौ. निता तेजल रौनक कासलीवाल यांचा वतीने महाप्रसाद देण्यात येनार आहे. पंचरंगी पत्रिकेसाठी श्रीमती.पुष्पलता धन्नालाल अजमेरा भरतकुमार सौ.प्रिती शितलकुमार सौ.सोनल सोहम ओम विमा परम अजमेरा परीवार नेहाडोगरीवाला यांचे सहकार्य मिळाले तरी सकल जैन समाजबांधवानी उपस्थित रहावे असे आवाहन दीपचंद अजमेरा शांतीलाल झांझरी प्रकाश अजमेरा दीलीप अजमेरा जितेंद्र अजमेरा पवन झाझंरी भरत अजमेरा सुनील झांझरी पारस झांझरी सतीश अजमेरा नवल कुमार झंझरी रितीक अजमेरा आंनद अजमेरा यांनीकेले आहे अशी माहीती प्रचार प्रसार संयोजक नरेंद्र अजमेरा पीयूष कासलीवाल यानी दिली.

कार्यकमासाठी प्रतिष्ठाचार्य म्हणुन नंदकुमार सदावर्ते हे लाभले आहे तर संगीतकार म्हणुन सौ.रैपाली रावका छत्रपती संभाजीनगर हे संगीतमय भगवंताची पुजा, अभिषेक करणार आहे. यात्रा महोत्सवासाठी छत्रपती संभाजीनगर, कन्नड, वेरैळ, जालना,वैजापुर, शिवुर, कचनेर, पैठण आदी ठिकाणाहुन हजारो भक्त उपस्थित राहणार आहे.

# मुख्य रस्त्यावरच साचले शेवाळ, पाण गवत; उद्यान गेट जवळ अपघातात वाढ

**तभा वृत्तसेवा**

**पैठण , दि. १३ फेब्रुवारी :** पैठण छत्रपती संभाजीनगर या मुख्य रस्त्यावर संत ज्ञानेश्वर उद्यान गेट दुर्गा गार्डन समोर सिमेंट रस्त्यावर मोठया प्रमाणात पाणी साचल्याने याठिकाणी शेवाळ तसेच पाणगवत उगल्याने वाहनाच्या अपघातात वाढ झाली आहे.या गंभीर प्रकारावर नगर परिषद प्रशासनाने लक्ष द्यावे अशी मागणी करण्यात येत आहे.



पैठणसाठी दळणवळणाचा हा मुख्य रस्ता असून याठिकाणी अनेक महिन्यांपासून शहराला पाणी पुरवठा करणाऱ्या जलवाहिनीचे तसेच चारीचे पाणी साचत आहे. परिणामी रस्तावर शेवाळ व पाणगवत झाल्याने याठिकाणी आपोआप गाड्या घसरून तीर्थक्षेत्र पैठणला येणारे भाविक तसेच संत ज्ञानेश्वर उद्यान, नाथसागर धरणावर येणारे पर्यटक व स्थानिक नागरिकांना अपघाताला सामोरे जावे लागत आहे.

याठिकाणी भेट देऊन नेमके रस्त्यावर पाणी का साचत आहे. याची माहिती घेऊन रस्ताचे पॅच वर्क तसेच रस्ता पाणी मुक्त करून देऊ.अशी प्रतिक्रिया नगर परिषदचे बांधकाम अभियंता पंकज पवार यांनी दिली आहे.

# जागतिक मूत्रपिंड दिना निमित्त कृतज्ञता समारंभ

**तभा वृत्तसेवा**

**छत्रपती संभाजीनगर, दि. १३ फेब्रुवारी :** 'जागतिक मूत्रपिंड दिन' निमित्त ओरिऑन सिटी केअर सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल, बर्नेला किडनी केअर आणि इंडियन मेडिकल असोसिएशन, छत्रपती संभाजीनगर यांच्या संयुक्त विद्यमाने कृतज्ञता समारंभ व स्नेहसंमेलनाचे आयोजन करण्यात येत आहे. कार्यक्रमाच्या पार्श्र्वभूमीवर पत्रकार परिषदेत उपक्रमाची रूपरेषा जाहीर करण्यात आली.

मूत्रपिंडाच्या आजारांबाबत जनजागृती करणे, अवयवदानाचे महत्त्व अधोरेखित करणे आणि 'अवयवदान म्हणजे जीवनदान' हा संदेश व्यापक स्तरावर पोहोचवणे, हा या उपक्रमाचा प्रमुख उद्देश आहे. अवयवदात्यांच्या निःस्वार्थ कार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करणे तसेच प्रत्यारोपणानंतर नवजीवन लाभलेल्या रुग्णांना प्रोत्साहन देणे यावर भर देण्यात येणार आहे. हा कार्यक्रम औपचारिक वैद्यकीय परिसंवाद नसून सामाजिक बांधिलकी व आरोग्य सजगता वृद्धिंगत करणारा उपक्रम असल्याचे आयोजकांनी स्पष्ट केले.

पत्रकार परिषदेत डॉ. प्रवीण सोनवतीकर, डॉ. आशिष देशपांडे, डॉ. योगेश वरगंटवार, डॉ. श्रीगणेश बर्नेला, डॉ. अनुपम टाकळकर, डॉ. शिरीष देशमुख, डॉ. सुनील जाधव, डॉ. विरेंद्र वडगावकर, डॉ. पांडुरंग बट्टमबार, डॉ. योगेश देवगिरीकर, डॉ. राजकुमार घुमरे आदी उपस्थित होते.

देशात सुमारे पाच लाख रुग्णांना विविध अवयवांची गरज असताना केवळ ०.१ टक्केच नागरिक अवयवदानासाठी पुढे येतात, अशी माहिती आयएमएचे अध्यक्ष डॉ. अनुपम टाकळकर यांनी दिली. जनजागृतीअभावी व गैरसमजांमुळे ही दरी निर्माण होत असल्याचे त्यांनी नमूद केले. आयएमएतर्फे आतापर्यंत बारा कार्यशाळा घेण्यात आल्या असून जनजागृती मोहिम पुढेही सातत्याने राबविण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

# एलजी इलेक्ट्रॉनिक्स इंडिया लिमिटेडची निर्यातवाढीवर रणनीतिक घोषणा

**तभा वृत्तसेवा**

**छत्रपती संभाजीनगर, दि. १३ फेब्रुवारी :** एलजी इलेक्ट्रॉनिक्स इंडिया लिमिटेडने आर्थिक वर्ष २०२६ च्या तिसऱ्या तिमाहीचे निकाल जाहीर करताना देशांतर्गत बाजारातील नेतृत्व कायम राखत निर्यातवृद्धीला चालना देणारा स्पष्ट व्यवसाय आराखडा सादर केला. कंपनीने सदर तिमाहीत ४१.१४ अब्ज रुपयांचा महसूल नोंदवला असून ४.८ टक्के ईबीआयटीडीए मार्जिन प्राप्त केले आहे. सणासुदीनंतर ग्राहक मागणीत अपेक्षेपेक्षा मंदी असतानाही होम अप्लायन्सेस व होम एंटरटेनमेंट या प्रमुख विभागांत ब्रँडने आपले अग्रस्थान अबाधित ठेवले.

व्यवस्थापकीय संचालक हाँग जू जिओन यांनी स्पष्ट केले की, बदलत्या बाह्य आर्थिक वातावरणातही कंपनीची मजबूत मूलभूत तत्त्वे, नवोपक्रमावर आधारित उत्पादन धोरण आणि दीर्घकालीन स्थैर्याभिमुख दृष्टीकोन यामुळे सातत्यपूर्ण कामगिरी साध्य झाली. बीईई-रेटेड उत्पादनांना ग्राहकांकडून सकारात्मक प्रतिसाद मिळत असून आगामी उन्हाळी हंगाम लक्षात घेता प्रीमियम तसेच 'एलजी एसेन्शियल' या द्विस्तरीय धोरणातून कॉम्प्रेसर-आधारित उत्पादनांची मागणी वाढवण्यावर कंपनीचा भर राहणार आहे. उच्च-नफा देणाऱ्या एएमसी व्यवसायाचा विस्तार व बीटूबी पायाभूत सुविधा क्षेत्रातील संधींचा लाभ घेण्यावरही कंपनी लक्ष केंद्रीत करत आहे.

अमेरिका व युरोपमधील अनुकूल व्यापार परिस्थितीचा लाभ घेत 'मेक इन इंडिया' अंतर्गत उत्पादित प्रीमियम उत्पादनांच्या आधारे पुढील वर्षात निर्यात दुप्पट करण्याचे उद्दिष्ट कंपनीने निश्र्चित केले आहे. श्री सिटी येथील तिसऱ्या प्रकल्पाद्वारे उत्पादन क्षमता वाढ व स्थानिकीकरणाला गती देणे हा आगामी धोरणात्मक प्राधान्यक्रम राहणार आहे.

**संत एकनाथ महाराज शिक्षक सहकारी पतसंस्था मर्या,पैठण**
नाथ कॉलनी , ता.पैठण जि.छत्रपती संभाजीनगर

**पाहिजे**

पैठण मधील संत एकनाथ महाराज शिक्षक सहकारी पतसंस्था मर्या, पैठण ता.पैठण जि. छत्रपती संभाजीनगर सेवक पदाकरीता अर्ज मागविण्यात येत आहे.

| अ.क. | पदाचे नाव | शैक्षणिक पात्रता | जागा |
| --- | --- | --- | --- |
| १ | सेवक | किमान ७ वी पास | १ |

मुलाखतीसाठी उमेदवारांनी दि.२३/०२/२०२६ रोजी खालील दिलेल्या पत्यावर मुळ कागदपत्रासह सकाळी / दुपारी ११ ते २ च्या दरम्यान स्वखर्चाने उपस्थित राहावे,इच्छुक उमेदवारांनी जाहीरात प्रसिध्द झाल्यापासुन ८ दिवसाच्या आत आपली माहीती असलेला अर्ज एक फोटो व शैक्षणिक पात्रतेच्या सत्य प्रती खालील पत्यावर पाठवाव्यात

चेअरमन
संत एकनाथ महाराज शिक्षक सहकारी पतसंस्था मर्या , पैठण
नाथ कॉलनी, पैठण ता. पैठण जि. छत्रपती संभाजीनगर

वरील पदांकरीता नेमनुकीचा पुर्ण अधिकार संस्था व्यवस्थापन राखुन ठेवत आहे.

# व्यापाऱ्यांच्या विरोधानंतर अतिक्रमण हटाव मोहिमेला तूर्तास ब्रेक

**तभा वृत्तसेवा**

**पैठण, दि. १३ फेब्रुवारी :** नाथषष्टी यात्रेच्या अनुषंगाने शहरातील कोर्ट रोड काळी पिवळी पॉईंट जवळ काढण्यात येणाऱ्या अतिक्रमण ठिकाणी एका व्यापाऱ्याचा नगरपरिषद अतिक्रमण हटाव पथक तथा पोलीस पथकासोबत झालेल्या वादाचा व्यापारी संघटनेने विरोध दर्शवत पैठण बंद केले असता न.प.च्या वतीने अतिक्रमण हटाव मोहिमेला शुक्रवार आठवडी बाजारासोबत एकादशी आल्याने दोन दिवसांचा ब्रेक दिला. तिसऱ्या दिवशी मात्र ही मोहीम अधिक तीव्र करण्यात येणार असल्याची माहिती मुख्याधिकारी डॉ पल्लवी अंभोरे यांनी दिली. व्यापारी बांधवांनी आपापले अतिक्रमण काढून घ्यावे असे आवाहन ही डॉ अंभोरे यांनी केले आहे.



राज्यातील क्रमांक दोनची सर्वात मोठी यात्रा म्हणून नाथषष्टी यात्रा प्रसिद्ध असून मार्च ९ ते ११ कालावधीत यात्रा मोहोत्सवाला सुरुवात होत आहे. शांतिब्रम्ह श्री संत एकनाथ महाराज समाधी दर्शन तसेच पवित्र गंगा गोदावरीत स्नानासाठी यात्रेत लाखो भाविक, वारकरी वैष्णव भक्त यात्रेत सहभागी होतात. यात्रा काळात रहदारी तसेच ईतर गोष्टींना अडथळा ठरणाऱ्या अतिक्रमणावर न.प च्या वतीने बुधवारी व गुरुवारी कारवाई करण्यात आली. यात्रा परिसरासह मेन रोड, डॉ बाबासाहेब आंबेडकर स्मारक ते नाथ मंदिर, खंडोबा मंदिर ते नाथ मंदिर, गागाभट्ट चौक ते मंदिर, छत्रपती शिवाजी महाराज चौक, हुतात्मा स्मारक परिसर, नाका टू नाका, जिप मुलांची शाळा रोडवरील अतिक्रमण काढून घ्यावे करीता शहरात ५ फेब्रुवारी पासून ध्वनीक्षेपा मार्फत सूचना देण्यात येत होत्या त्यावरून बुधवारी प्रत्यक्ष रित्या पोलीस बंदोबस्तात जिसेबी, ट्रॅक्टरच्या साहाय्याने अतिक्रमण निष्काशीत करण्यास सुरुवात करण्यात आली होती. गुरुवारी ही मोहीम बसस्थानक परिसर कोर्ट रोड, नाका टू नाका भागात सुरु असतांना कोर्ट रोडवरील मधुसूदन मुंदडा यांच्या किराणा दुकानासमोरील पत्राचे शेड काढणं असतांना त्यांचा व अतिक्रमण हटाव पथक व पोलिसांचा वाद सुरु झाला या वादात पोलिसांनी अती केल्याचा ठपका ठेवत व्यापारी संघटनेने शहरात फिरून पैठण बंद करत अतिक्रमण मोहिमेला तीव्र विरोध केला. हे प्रकरण पैठण पोलिसांत ही गेले होते.अतिक्रमण हटाव मोहिमेला आमचा विरोध नसून न.प.अतिक्रमण हटाव पथक गाईडलाईन सोडून लोकांच्या खासकी जागेत अतिक्रमण असल्याचे सांगत कारवाई करत आहे.मुळात व्यापारी बांधवांनी आपल्या जागेतच आस्थापाना मागे घेऊन त्यापुढे पार्किंकची सोय केली आहे. तसेच प्रशासनाने प्रतिष्ठित व्यापारी मुधुसूदन मुंदडा यांना दिलेल्या वागणूकीचा आम्ही विरोध करत असल्याची प्रतिक्रिया व्यापारी संघाचे अध्यक्ष स्वदेश पांडे यांनी दिली आहे.

न.प.च्या अतिक्रमण पथकात मुख्याधिकारी डॉ पल्लवी अंभोरे, उप मुख्याधिकारी नागेश खोडवे, उप मुख्याधिकारी सोमनाथ गर्जे,सहाय्यक पोलिस निरीक्षक पवार,अभियंता पंकज पवार, लेखापाल राहुल डांगे,नगर रचनाचे तुषार वाकले,व्यँकटी पापुलवार, सौरभ हालमारे, स्वच्छता प्रमुख गवांदे, ललित महाजन, संकेत तांगडे,जोंधळे, विजय पैठणे, चंद्रकांत पगारे, अशोक पगारे,अमोल शेजूळ प्रितेश घोडके आदींचा सहभाग होता.


## रस्ता सुरक्षा जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन केले

**नाशिक:** तरुण रस्ते वापरकर्त्यांमध्ये सुरक्षित रस्ता वापराला प्रोत्साहन देण्यासाठी सुरू असलेल्या प्रयत्नांचा भाग म्हणून, होंडा मोटरसायकल आणि स्कूटर इंडिया यांनी महाराष्ट्रातील नाशिक येथे रस्ता सुरक्षा जनजागृती कार्यक्रमात सहभाग घेतला. या उपक्रमाद्वारे शरद पवार आंतरराष्ट्रीय शाळेतील २४०० हून अधिक विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचण्यात आले असून, जबाबदार रस्ता वर्तन आणि मूलभूत वाहतूक नियमांविषयी जनजागृतीवर विशेष भर देण्यात आला.

# अजिंठा लेणीच्या परिसरात गुलाबी फुलांच्या नाजूक छटांनी डोंगररांगांना एक वेगळीच कोमलता बहाल केली

**तभा वृत्तसेवा**

**सोयगाव, दि. १३ फेब्रुवारी :** अजिंठा लेणीच्या परिसरात सध्या निसर्ग एका अद्भुत सोहळ्याच्या उत्कर्षाला पोहाचला आहे.सातमाळ्याच्या या रांगड्या डोंगरदऱ्यांनी जणू आपल्या अंगाखांद्यावर रंगांची मुक्त उधळण करून घेतली आहे. खान्देशच्या मातीतील त्या कडक उन्हाच्या झळांनी अद्याप रौद्र रूप धारण केले नसले, तरी निसर्गाची पावले मात्र वसंताच्या दिशेने वेगाने पडू लागली आहेत.अजिंठा घाटातून प्रवास करताना वाटेत उभी असलेली पळसाची झाडे म्हणजे जणू भूमीतून उमललेल्या भगव्या अग्नीच्या ज्वालाच भासतात. त्या गर्द केशरी फुलांच्या झुपक्यांनी अवघा घाट परिसर एखाद्या मंगल सोहळ्यासाठी सजल्यासारखा वाटतो आहे.





पळसाच्या या भगव्या विखाऱ्यासोबतच,ठिकठिकाणी उमललेल्या गुलाबी फुलांच्या नाजूक छटांनी डोंगररांगांना एक वेगळीच कोमलता बहाल केली आहे.भगवा आणि गुलाबी रंगांचा हा अनोखा संगम पाहून असे वाटते, की जणू सृष्टीने आपल्या लाडक्या अजिंठ्यासाठी रंगांचा मखमली गालिचाच अंथरला आहे.डोंगराच्या कडेकपारीत, पाषाणांच्या भेगांतून डोकावणारी ही रानफुले जेव्हा वाऱ्याच्या मंद झुळकीसोबत तालात डोलतात,तेव्हा पाहणाऱ्याच्या मनातील थकवा क्षणात मावळून तिथे प्रसन्नतेचा झरा वाहू लागतो.

वर अथांग पसरलेले स्वच्छ निळे आकाश आणि खाली जमिनीवर पडलेला या रंगीबेरंगी फुलांचा सडा,या दोन टोकांमधील हे निसर्गदृश्य अजिंठ्याच्या सौंदर्याला एका वेगळ्याच उंचीवर नेऊन ठेवते.मानवाच्या अजरामर कौशल्यातून साकारलेल्या या प्राचीन लेणी आणि निसर्गाची ही क्षणभंगूर पण नयनरम्य फुलांची दुनिया,यांचा हा अपूर्व मेळ डोळ्यांचे पारणे फेडणारा आहे.काळ्या पाषाणातील कलेला निसर्गाच्या या सळसळत्या रंगांची मिळालेली ही साथ फक्त आणि फक्त याच ऋतूत अनुभवता येते,जे पाहून मन तृप्त होते.प्रवास करीत असतात सोयगाव शहरातील सामाजिक कार्यकर्ते मंगेश सोहनी यांनी लिहलेल्या पळसा विषयी माहिती आहे



## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायधिश साहेब 'कनिष्ठ स्तर' न्यायालय गंगापूर जि. छ. संभाजीनगर**

सिव्हील एम. ए. नं. १०५ / २०२६

अर्जदार:- १. भिकन बालाजी मोगल, वय ८३ वर्ष धंदा. शेती २. रूखमणबाई भिकन मोगल, वय ७८ वर्ष धंदा. शेती ३मंदाबाई हरिचंद्र मोगल, वय ५१ वर्ष धंदा. शेती ४ रामनाथ हरिचंद्र मोगल, वय २३ वर्ष धंदा. शेती २५ वर्ष धंदा. शेती ५.दत्तात्रय हरिचंद्र मोगल, वय १ ते ५ रा. औरंगपूर ता. गंगापूर जि. छ.संभाजीनगर ६ सुरेखा गोकुळ काळे वय ३८ वर्ष धंदा. शेती रा. मांडवा ता. गंगापूर जि. छ. संभाजीनगर ७ सुवर्णा संदीप मूळे वय ३४ वर्ष धंदा. शेती रा. ७४ जळगांव, पो. ढाकेफळ ता. पैठण ८ सुनंदाबाई संतोष शेळके वय ३० वर्ष धंदा. शेती रा. मुलानी वाडगांव, ता. पैठण ९ कल्पना नवनाथ म्हस्के वय. २९ वर्ष धंदा. शेती १० पूजा नवनाथ कोन्हाळे वय २६ वर्ष धंदा. शेती९ व १० रा. तांदुळवाडी, ता. गंगापूर जि. छ. संभाजीनगर

-: विरूद्ध :-

गैरअर्जदार :- निरंक

प्रकरण :-कलम २ बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत

ज्याअर्थी अर्जदार यांना त्यांचे वकील श्री. ॲड.डि.ई. पानकडे यांचे मार्फत कलम २ बॉम्बे रेगयुलेशन ॲक्ट नुसार वारसाचे प्रमाणपत्र मिळणे कामी अर्ज सादर केला आहे व कथन केला आहे की, असे की, अर्जदार क्र. १ व २ यांचा मुलगा तसेच अर्जदार क्र. ३ यांचे पती व अर्जदार क्र. ४ ते १० यांचे वडिल नामे हरिचंद्र भिकन मोगल हे दि. ०२/०१/२०२६ रोजी मौजे औरंगपूर ता. गंगापूर जि. छ. संभाजीनगर येथे मयत झाले आहे. मयत हरिचंद्र भिकन मोगल यांचे वारस प्रमाणपत्राची अर्जदार शासकीय योजनांचा लाभ मिळविण्याकामी व इतर शासकीय कामासाठीआवश्यकता आहे.असे की, तहसिलदार गंगापूर यांचे प्रस्ताव क्रमांक २००१ / पुरवठा / स्वधान्य नुसार मा. अपर जिल्हाधिकारी औरंगाबाद यांची मान्यता दिनांक १२/०९/२००१ व जिल्हा पुरवठा अधिकारी कार्यालय, छ. संभाजीनगर यांचे पत्र जा.क्र.२००१/ पुरवठा/स्वधादु / कावि दिनांक १२/०९ / २००१ अन्वये मयत हरिचंद्र भिकन मोगल यांना औरंगपूरता. गंगापूर येथील स्वस्त धान्य दुकानाचा परवाना मिळालेला असून सदर परवाना हा वारसा आधारे अर्जदार नं. ४रामनाथ हरिचंद्र मोगल यांच्या नावे करणेकामी अर्जदारांना मयत हरिचंद्र भिकन मोगल यांच्या वारस प्रमाणपत्राचीकार्यालयीन कामासाठी आवश्यकता आहे.त्याअर्थी सर्व जनतेस सुचित करण्यात येते की, मयत हरिचंद्र भिकन मोगल यांचे अर्जदार यांना

वारसप्रमाणपत्र देण्यास कोणाचाही कुठल्याही प्रकारचा आक्षेप असल्यास त्यांनी सदरील आपला आक्षेप जाहिर प्रगटनप्रसिध्द झाल्या पासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात लेखी स्वरूपात दाखल करावा मुट्टीत आक्षेप नआल्यास अर्जदार यांना मयत हरिचंद्र भिकन मोगल यांचे वारस असल्याचे वारसप्रमाणपत्र देण्यात येईल व मुदूतीनंतर येणार अक्षेप ग्राहय धरला जाणार नाही करीता सदरील जाहिर प्रगटन कोर्टाच्या सही व शिक्क्या निशी दिले .

पुढील तारीख २७/०३/२०२६

**कनिष्ठ लिपिक.** **आदेशावरून**
**सहाय्यक अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय क स्तर गंगापूर**

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधिश साहेब. क स्तर न्यायालय गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर**

कि. दि. अर्ज क्र.११२/२०२६

अर्जदारः१) प्रशांत अण्णासाहेब पाटील वय ४९ वर्ष धंदा डॉक्टर रा. एम. एस.इ.बी. जवळ समतानगर गंगापूर ता. गंगापूर जि. छत्रपती संभाजीनगर २) अविनाश अण्णासाहेब पाटील वय ५२ वर्ष धंदा शेती रा. एम. एस. इ. बी. जवळ समतानगर, गंगापूर ता. गंगापूर जि. छत्रपती संभाजीनगर ३) अभिलाषा अभय शेळके वय ४७ वर्ष धंदा घरकाम रा. नगर मंगल रस्ता, न्यू इंग्लिश शाळा,निघोज, शिर्डी जि. अहिल्यानगर ४) संगीता साहेबराव ठोंबरे वय ४६ वर्ष धंदा घरकाम रा. प्लॉट न. १४० गणेश किराणा जनरल स्टोअर जवळ, गजानन कॉलनी जि. छत्रपती संभाजीनगर ५) पुष्पा अण्णासाहेब जाधव पाटील वय ७९ वर्ष धंदा घरकाम रा. एम. एस. इ.बी. जवळसमतानगर गंगापूर ता. गंगापूर जि. छत्रपती संभाजीनगर

विरुध्द

गैर अर्जदार:-निरंक

प्रकरण :- हेअरशिप प्रमाणपत्र (वारसप्रमाणपत्र) मिळणे बाबत.

मयत अण्णासाहेब शामराव जाधव हे गंगापूर येथील रहिवाशी होते ते दिनांक २१/११/२०२० रोजी अल्पशा आजाराने विठाई हॉस्पिटल नवीन बस स्टैंड रोड, गंगापूर येथे मयत झाले. अर्जदार क्र. १ ते ४ हे त्यांचे मुले व मुली असून अर्जदार क्र. ५ ह्या मयत अण्णासाहेब शामराव जाधव यांच्या पत्नी आहे. आता मयत अण्णासाहेब शामराव जाधव यांना अर्जदार क्र १ते ५ हेच कायदेशीर वारसदार असुन अर्जदाराच्या व्यतिरिक्त मयत अण्णासाहेब शामराव जाधव यांना इतर कोणीही कायदेशीर वारसदार नाहीत. नमूद केलेल्या व्यक्तींव्यतिरिक्त मृताला इतर कोणताही कायदेशीर वारस नाही. मयत अण्णासाहेब शामराव जाधव यांची आई ४० वर्षापूर्वीच मयत झाली आहे. अर्जदार यांनाशासकीय-निमशासकीय व इतर कार्यालयीन कामाकरीता मयत अण्णासाहेब शामराव जाधव यांचे वारस प्रमाणपत्राची(हेअरशिप सर्टिफिकीट) ची आवश्यक असल्याने अर्जदार यांनी प्रस्तुतचा अर्ज मा. न्यायालयात दाखल केला आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, अर्जदाराचा अर्जास व त्यातील मागणीस कोणाचा काही आक्षेप उजर असेल तर संबन्धीतानी त्यांचा असलेला आक्षेप उजर या मा. न्यायालयात व्यक्तिश अथवा विधीज्ञ मार्फत हे जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसाच्या आत नोंदवावा मुदतीनंतर आलेला आक्षेप उजर गृहीत धरला

जाणार नाही. व हे न्यायालय अर्जदाराच्या हक्कात मागणी प्रमाणे वारस प्रमाणपत्र जारी करील. करिता हे जाहीर प्रगटन माझे सही व शिक्क्याने आज दिनांक १३/०२/२०२६ रोजी दिले.

**कनिष्ठ लिपिक.** **आदेशावरून**
**सहाय्यक अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय क स्तर गंगापूर**

## जाहीर प्रगटन/सायटेशन

**मा. श्री. एम. ए. शेख, २ रे सह. दिवाणी न्यायाधिश, (क. स्तर) न्यायालय गंगापूर**

सिव्हील एम. ए. क्रं. १०१/२०२६

अर्जदार १) वैष्णवी राजू विधाटे वय १८ वर्षे, धंदा – शिक्षण रा. नविन बस स्थानक जवळ, साई नगर, गंगापूर, ता. गंगापूर जि. छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) वरून राजू विधाटे वय १५वर्षे, धंदा शिक्षण रा. नविन बस स्थानक जवळ, साई नगर, गंगापूर, ता. गंगापूर जि. छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) ( अ.पा.क. अर्जदार क्रं. १ बहिण )

// विरूध्द //

गैरअर्जदार :-निरंक

प्रकरण:- बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट VIII 1827 अन्वये लिगल हेअरशिप सर्टिफिकेट मिळणेबाबत.

सर्व जनतेस कळविण्यात येते उपरोक्त अर्जदारांनी या न्यायालात ॲड. आफताब एस. शेख रा. गंगापूर, ता.

गंगापूर जि. औरंगाबाद यांच्या मार्फत बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट VIII 1827 अन्वये लिगल हेअरशिप सर्टिफिकेट / वारस प्रमाणपत्र मिळणेकामी अर्ज सादर केला आहे की, अर्जदार क्रं. १ व २ हे वरील नमुद ठिकाणचे कायमस्वरूपी राहणारे असून अर्जदार क्रं. १ व २ हे आपसात सख्खे भाऊ बहिण आहे. अर्जदार क्रं. १ व २ यांची आई नामे संगीता राजू विधाटे दिनांक २६/०१/२०२० रोजी शासकिय वैद्यकिय महाविद्यालय व रूग्णालय, छत्रपती संभाजीनगर, ता. जि. छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) येथे मयत झालेले आहे. तसेच अर्जदार क्रं. १ व २ यांचेवडील नामे राजू दत्तू विधाटे हे दिनांक१४/०४/२०२० रोजी शासकिय वैद्यकिय महाविद्यालय व रुग्णालय, छत्रपतीसंभाजीनगर, ता. जि. छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) येथे मयत झालेले आहे. मयत संगीता राजू विधाटे यांनाअर्जदार क्र. १मुलगी व अर्जदार क्रं. २ मुलगा या नात्याने कायदेशीर वारसदार असून मयतास अर्जदार क्रं. १ व २यांच्या व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारसदार नाही. मयत संगीता राजू विधाटे यांच्या मृत्युमुळे अर्जदारांनाशासकिय, निमशासकिय व इतर कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने अर्जदारांनी सदरचा अर्ज मा. न्यायालयात दाखल केलेला असून वारस प्रमाणपत्राची मागणी केलेली आहे. सबब सदर प्रकरणी कोणाचाही

कोणत्याही प्रकारचा आक्षेप किंवा उजर असल्यास त्यांनी प्रस्तुत जाहिर प्रगटन प्रसिद झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात नोंदवावा. त्यानंतर आलेल्या उजर, आक्षेपाचा विचार केला जाणार नाही व अर्जदारांच्या मागणीप्रमाणे त्यांच्या हक्कात वारस प्रमाणपत्र देण्यात येईल. करीता जाहीर प्रगटन. आज दिनांक १३/०२/२०२६ रोजी माझ्या सहिने व या न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले. प्रकरणात पुढील तारीख २३/०३/२०२६

**कनिष्ठ लिपिक** **आदेशावरून**
**सहाय्यक अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय क स्तर गंगापूर**